**Meeting No.** 87 **Meeting Date** 09-Apr-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १९ मार्च १९९० रोजी झालेल्या ८६ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1778

विषय : वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याची श्री. मा. आ. चव्हाण, माजी मुख्य अभियंता/प्राधिकरण यांची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. मा. आ. चव्हाण, यांच्या आतापर्यंतच्या उत्तम सेवेची दखल घेऊन व ते जळगावहून पुणे येथे कार्यालयीन कामाची (दिनांक १३ व १४-१२-१९८९ रोजी आयोजित केलेल्या प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी) येत असताना हृदयविकाराचा झटका आला होता ही परिस्थिती विचारात घेऊन त्यांचा पुनर्नेमणूकीचा कालावधी एक वर्षाहून कमी झालेला असला तरी त्यांना स्वतःसाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची परतफेड 'खास बाब' म्हणून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 3 **Resolution No.** 1779

विषय : मागासवर्गीय उमेदवार मुलाखतींना उपस्थित राहिल्यावर त्यांना प्रवासखर्चाची प्रतिपूर्ती करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शासनाच्या आदेशानुसार सरलसेवा भरतीचा मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढण्यासाठी मुलाखतीस/चाचणीस बोलाविलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना प्रवासखर्चापोटी रु. ४४८४.५० च्या रकमेएवढी प्रतिपूर्ती करण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे याबाबतच्या शासकीय नियमाच्या अधिन राहून यापुढे मुलाखतीसाठी/चाचणी परीक्षेत बोलाविलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 4 **Resolution No.** 1780

विषय : मेघवाडी, जोगेश्वरी (पूर्व), येथील संजयनगर झोपडपट्टीस वीजपुरवठा करण्यासाठी सबस्टेशन बांधण्याकरिता भूखंड देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मेघवाडी, जोगेश्वरी (पूर्व) येथील संजयनगर झोपडपट्टीस वीजपुरवठा करण्याच्या दृष्टीने सबस्टेशन बांधण्याकरिता ४०' बाय ४०' फूट मापाचा भूखंड बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रीक सप्लाय लिमिटेड यांना प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमत विषयक धोरणानुसार जमिनीची प्रत्यक्ष किंमत आणि त्यावर दरवर्षी एक टक्का दराने भाडेपट्टी आकारून आणि भाडेपट्ट्याच्या नेहमीच्या इतर अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.** 1781

विषय : हुडको अर्थसहाय्यित भुसावळ - जळगाव येथील अल्प उत्पन्न गट - २ अंतर्गत १६५ भूखंडाच्या योजनेस हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत (योजना क्रमांक ७०८८)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, हुडको अर्थसहाय्यित भुसावळ, जिल्हा - जळगाव येथील अल्प उत्पन्न गट - २ अंतर्गत १६५ भूखंड विकसित करण्याच्या योजनेस हुडकोकडून रु. ५.६१ लक्ष (रु. पाच लाख एकसष्ट हजार मात्र) कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.** 1782

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रु. ८२.३७ लक्ष (रु. ब्याऐंशी लक्ष सदतीस हजार मात्र) कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

**Item No. 7 Resolution No. 1783**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे कांदिवली (प.) सर्व्हे क्रमांक १५७ व मुलुंड (पूर्व), सर्व्हे क्रमांक ३८६ येथील विकसित भूखंडाच्या वाटपाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कांदिवली (प.) सर्व्हे क्रमांक १५७ व मुलुंड (पूर्व) सर्व्हे क्रमांक ३८६ येथील विकसित भूखंडाच्या विक्रीकरिता मागविण्यास आलेल्या निविदेपैकी खाली निर्दिष्ट केलेल्या अधिक बोलीच्या निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| ठिकाण | उत्पन्न गट | भूखंड क्रमांक | नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेचे नाव | मुख्य प्रवर्तकाचे नाव | एफ.एस.आय.चा प्रति चौरस मीटरचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १.कांदिवली (प.) | उच्च उत्पन्न | १ | उत्सव सहकारी गृहनिर्माण संस्था | श्री. प्रवीणराव जीवनाथ लाटे | रु. ५५५२/- |
| २.कांदिवली (प.) | उच्च उत्पन्न | ५ | - | श्री. मनोहर रंगूशेट मलबारी | रु. ५५००/- |
| ३. मुलुंड (पूर्व) | उच्च उत्पन्न गट | १ | गणेशदर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था | श्री. हिरालाल लालचंद सोनार | रु. ५०००/- |

**Item No. 8 Resolution No. 1784**

विषय : वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स ब्लॉक 'सी' मधील सर्व्हे क्रमांक ७ आणि ८ ही जमीन श्री. सी. डी. शहा यांना भाडेपट्ट्याने देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. सी. डी. शहा यांना जमिनीची किंमत भरण्यासाठी दिनांक ६-४-१९९० पर्यंत मुदतवाढ देण्याची कार्यवाही करण्यास आली आहे त्यास मान्यता देण्यात येते.
श्री. सी. डी. शहा यांना जमिनीची किंमत भरण्यासाठी अंतिम मुदतवाढ म्हणून आणखी ७ दिवसांचा कालावधी देण्यात यावा. ही मुदतवाढ आधी दिलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात यावी. यापुढे मुदतवाढ देण्यात येऊ नये.

**Item No.** 9 **Resolution No.** 1785

विषय : १) महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि गाळ्यांची अदलाबदल) विनियम, १९८१ मध्ये सुधारणा.
२) महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास (जमिनींचे वाटपपत्र) विनियम, १९८२ मध्ये सुधारणा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि गाळ्यांची अदलाबदल) विनियम, १९८१.
२) महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास (जमिनींचे वाटपपत्र) विनियम, १९८२

या दोन्ही विनियम समुच्चयांत बाब टिप्पणीस जोडलेल्या मसुद्याप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 10 **Resolution No.** 1786

विषय : रमाबाईनगर, घाटकोपर (पूर्व) येथे संक्रमण शिबीरासाठी बांधलेल्या ४२० गाळ्यांचे वाटप

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, रमाबाईनगर, घाटकोपर (पूर्व) येथे संक्रमण शिबीरासाठी बांधलेल्या ४२० गाळ्यांच्या बांधकामावर झालेला खर्च दुरुस्ती व पुनर्रचना निधीमध्ये जमा करून हे गाळे सर्वसाधारण गृहनिर्माण योजनेत परिवर्तीत करण्यास व जाहिरात देऊन, अर्ज मागवून एकरकमी विक्री पद्धतीवर त्याचे वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 11 **Resolution No.** 1787

विषय : कन्नमवार नगर, विक्रोळी येथे कल्याण केंद्रासाठी (वेल्फेअर सेंटर) राखून ठेवलेला भूखंड अभय शिक्षण केंद्र या संस्थेस देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, अभय शिक्षण केंद्र या संस्थेस ठराव क्र. १५७१ दिनांक ३०-८-१९८८ अनुसार कन्नमवार नगर विक्रोळी येथे १००० चौ. मीटर जमीन भाडेपट्ट्याने देण्यात आली आहे, त्याच अटींवर उपरोक्त भूखंडापैकी उरलेली १५०० चौ. मी. जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक भवन बांधण्यासाठी त्या संस्थेस देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 12 **Resolution No.** 1788

विषय : सोलापूर अधिसूचित क्षेत्रासाठी तयार करण्यात आलेल्या नियोजन आराखड्यात तसेच विकास नियंत्रण नियमात सुधारणा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेऊन, खालील प्रमाणे बदल करावेत आणि त्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) अन्वये जरूर ती कार्यवाही करावी.

बदल दर्शविणारे परिशिष्ट -

अ) खालील आरक्षित केलेल्या जमिनी आरक्षणातून वगळणे व रहिवास वापराकरिता दर्शविणे.
आरक्षण क्रमांक : ६, १७, २०, २६, २९, ३९, ४० व ४१

ब) खालील आरक्षित केलेल्या जमिनीपैकी भाग जमिनी आरक्षणातून वगळणे व रहिवासी वापराकरिता दर्शविणे.
आरक्षण क्रमांक : ३, ४, १९, २१, २२, २३ व २५

क) मंजूर अधिन्यासातील रस्ता रुंदीकरणाचे आणि सर्व्हे क्रमांक ३१२ मधील भूखंड क्रमांक ७१, ७२, ७५ व ७६ मधून दर्शविलेला नवीन रस्ता वगळणे व ही जमीन रहिवासी वापरासाठी दर्शविणे.

ड) आरक्षित केलेल्या जागेमध्ये खालीलप्रमाणे बदल करणे.

१) आरक्षणाचे भाग क्षेत्र मूळ आरक्षण क्र. ८ मधून वगळणे व नवीन आरक्षण क्र. १७ अन्वये शैक्षणिक सुविधा या नावाने आरक्षित करणे.

२) आरक्षण क्रमांक ५२ वगळणे व आरक्षण - ५२ चे क्षेत्र आरक्षण ५१ मध्ये समाविष्ट करणे.

३) आरक्षण क्रमांक ३१ व ३२ वगळणे व हे क्षेत्र आरक्षण क्रमांक ३० मध्ये समाविष्ट करणे.

४) सोलापूर - विजापूर रस्ता ते २५ मी. (दक्षिण - उत्तर) स्पाईन रोडपर्यंतचा ३० मी. रुंद स्पाईन रोडची, जागेवर बांधलेल्या रस्त्याप्रमाणे आखणी दर्शविणेकरिता ३० मी. रस्त्याच्या उत्तरेकडील आरक्षित व रहिवास वापराच्या जमिनीपैकी भाग जमिनी ३० मी. रस्त्याकरिता दर्शविणे तसेच दक्षिणेकडील रस्त्याकरिता दर्शविलेल्या जमिनी रहिवास वापर, आरक्षण क्रमांक १६ व १२ मी. रस्त्याकरिता दर्शविणे.

५) आरक्षण क्रमांक २७ व २८ च्या दक्षिण हद्दीलगतचा रस्ता १२ मी. ऐवजी ९ मी. असा दर्शविणे व उर्वरीत जमीन रहिवास वापर अशी दर्शविणे. तसेच आरक्षण क्र. ४२ व ४३ मधील रस्ता व आरक्षण क्र. ४१ च्या पूर्वेकडील रस्ता १२ मी. ऐवजी ९ मी. रुंद मोजणे व उर्वरित जमीन रहिवास वापर अशी दर्शविणे.

६) आरक्षण क्रमांक १८, १९ व २१ वगळणे व भाग जमीन नवीन आरक्षण क्रमांक १८, १९ व २१ अन्वये अनुक्रमे निमवाणिज्य वापर सामाजिक सुविधा व सार्वजनिक सुविधाकरिता आरक्षित तसेच आरक्षण क्रमांक २३, २४ व २५ वगळणे व भाग जमीन नवीन आरक्षण क्रमांक २३ व २४ अन्वये अनुक्रमे खुली करमणूक सुविधा व निम वाणिज्य वापराकरिता आरक्षित अशी दर्शविणे.

इ) आरक्षित केलेल्या सर्व जमिनी प्रत्येक आरक्षित जमीन त्याच प्रकारच्या परंतु विविध वापरासाठी आवश्यकतेनुसार वापरण्याकरिता खालील

तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सर्वसामान्य नावाने आरक्षित करणे.

| अ.क्र. | मंजूर नियोजन आराखड्यातील प्रयोजन | नव्याने करावयाचे प्रयोजन |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १) | उद्योग क्रिडांगण आणि खुल्या जागा. | खुली करमणूक जागा |
| २) | प्राथमिक शाळा, प्राथमिक व माध्यमिक शाळा किंवा माध्यमिक शाळा व महाविद्यालय. | शैक्षणिक सुविधा |
| ३) | सिनेमागृह | वाणिज्य वापर |
| ४) | बस स्थानक, म. रा. वि. मं. उपकेंद्र. मुंबई आणि पोस्ट व तारखाते | निम वाणिज्य वापर |
| ५) | पोलीस स्टेशन व अग्नी शामक दल | सार्वजनिक सुविधा |
| ६) | सांस्कृतिक व सामाजिक केंद्र धार्मिक स्थळ | सार्वजनिक सुविधा |
| ७) | रुग्णालय | वैद्यकीय व आरोग्य सुविधा |

क) सोलापूर महानगरपालिकेने तिच्या हद्दीकरिता लागू असलेले विकास नियंत्रण नियम उक्त अधिनियमांचे कलम ३७ खालील तरतुदीनुसार सुधारित केले आहेत. सुधारित विकास नियंत्रण नियमास शासनाच्या नगर विकास विभागाने निर्णय क्रमांक टिपीएस - १७८७/१६७२/सीआर - २०१/पुडी - १३ दिनांक २५-१०-१९९० अन्वये मंजूरी दिली असून हे विकास नियंत्रण नियम शासनाचे दिनांक १६ मार्च १९८९ राजपत्र भाग - १ पुणे विभाग पुरवणी पान ४५५ ते ४७२ वर प्रसिद्ध केले आहेत. हे विकास नियंत्रण नियम विशेष नियोजन प्राधिकरण - १ सोलापूरला लागू करणे.

वरीलप्रमाणे मंजूर नियोजन आराखड्यात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) खाली किरकोळ फेरबदल करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

१) किरकोळ फेरबदल करणेच्या इराद्याबाबत नागरिकांकडून ३० दिवसांच्या

कालावधीत सूचना/हरकती मागविणेकरिता शासनाच्या राजपत्रातून व स्थानिक वर्तमान पत्रातून इंग्रजी व मराठी भाषेतून सूचना प्रसिद्ध कराव्या लागतील.

२) शासनाच्या राजपत्रातून सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या कालावधीसाठी सूचना/हरकती मागविणेकरिता किरकोळ फेरबदल दर्शविणारा नियोजन आराखडा कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवावा लागेल.

३) फक्त किरकोळ फेरबदल करण्यात आलेल्या जमीनधारकांना व संबंधितांना सूचना/हरकती दाखल करणेसाठी व म्हणणे (हिअरींग) समक्ष ऐकून घेणेसाठी लेखी नोटिसा देणे व सूचना/हरकती नोंदवून घेणे.

४) दाखल झालेल्या सूचना/हरकती विचारात घेऊन प्राधिकरणाचा अंतिम ठराव घेणे व प्रस्ताव शासनाच्या नगर विकास विभागात सादर करणे व प्रति संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे, उपसंचालक, नगर रचना, पुणे विभाग पुणे व सहाय्यक संचालक नगर रचना, सोलापूर यांना अभिप्राय शासनास सादर करण्यास द्यावा लागतील.

संबंधित जमीनधारकांना नोटीसा देणे व जमीन धारकांचे म्हणणे ऐकूण घेणे, नागरिकांकडून आलेल्या सूचना/हरकती विचारात घेऊन अहवाल सादर करणे इत्यादी कामे मुख्याधिकारी, पुणे मंडळ यांचेकडे सोपवावीत असे मत आहे. तरी नियोजन आराखड्यात सोबतच्या नकाशात दर्शविलेल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे आणि या संदर्भात जरूर ती कार्यवाही करावयाचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

| Item No. | 13 | Resolution No. | 1789 |
|---|---|---|---|

विषय : चंद्रपूर नजिकच्या १३६५ हेक्टर क्षेत्राकरिता म्हाडाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून झालेली नेमणूक आणि त्या संदर्भातील पुढील कार्यवाही.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) समंत्रकाकडून ऑगस्ट १९८९ मध्ये मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये समंत्रक शुल्कामध्ये अतिशय तफावत आढळल्याने समंत्रकांना कामाच्या स्वरूपाबाबत सविस्तर माहिती देणे आवश्यक वाटते. ह्याच कारणास्तव सध्या प्राप्त झालेल्या निविदा रद्द करण्यात याव्यात व त्या कामासाठी निविदा पुन: मागविण्यात याव्यात.

२) कार्यवाही लवकर व्हावी आणि केवळ योग्य समंत्रकाकडून निविदा प्राप्त व्हाव्यात म्हणून पूर्वी दिलेल्या समंत्रकांकडून योग्य समंत्रकांची निवड करण्यात यावी आणि केवळ त्यांचेकडूनच सुधारित निविदा मागविण्यातन प्राधिकरण मंजूरी देत आहे.

३) अशी समंत्रकांची निवड करण्यासाठी व प्राप्त होणाऱ्या निविदांमधून योग्य निविदेची निवड होण्यासाठी शिफारस करण्यासाठी तसेच पुन: निविदा मागविताना कामाचे स्वरूप समजावून घेण्यास अडचणी निर्माण होऊ नयेत, तफावत असे नये म्हणून नियोजन विषयक टिप्पणी तयार करण्यासाठी प्राधिकरण खालील सभासदांची उपसमितीची नेमणूक करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्ही. जी. बडवे, | सदस्य/प्राधिकरण |
| २. | श्री. पी. जी. बोरवणकर, | संचालक/नगररचना |
| ३. | श्री. पी. एस. आपटे, | समंत्रक/प्राधिकरण |
| ४. | श्री. एस. जी. धारप, | मुख्य अभियंता/प्राधिकरण |
| ५. | श्री. व्ही. के. फाटक, | मुख्य नियोजन विभाग/बीएमआरडीए |
| ६. | श्री. अनिल दारशेतकर, | वास्तुशात्रज्ञ/प्राधिकरण सदस्य/सचिव |

| Item No. | 14 | Resolution No. | 1790 |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ, मुंबई (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या हुडको अर्थसहाय्यित सोलापूर जिल्ह्यातील बेघर भूमीहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी रु. १५.३६ लक्ष (रु. पंधरा लक्ष छत्तीस हजार मात्र) कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर मा. अध्यक्षांचे परवानगीने खालील प्रस्ताव आयत्यावेळी प्राधिकरणाच्या विचारार्थ घेण्यात आले.

**Item No.** 15 **Resolution No.** 1791

विषय : मुंबई येथील कचऱ्याच्या व्यवस्थापनाचे (सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट) प्रथमदर्शक प्रकल्पासाठी प्राधिकरणाची मालवणी येथील जमीन भाडेपट्ट्याने देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई येथील कचऱ्याच्या व्यवस्थापनाचे (सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट) प्रथमदर्शक प्रकल्पासाठी प्राधिकरणाची मालवणी येथील सुमारे २००० चौ. मी. क्षेत्रफळाची जमीन केंद्र शासनाच्या विकास व तंत्रज्ञान विभागाने नियुक्त केलेल्या संस्थेस खालील अटींवर देण्यास मान्यता देण्यात येते.
१) जमिनीची आणि जमिनीच्या विकासाची प्रत्यक्ष किंमत आणि किंमतीच्या १ टक्का वार्षिक भाडेपट्टी आकारण्यात यावी.
२) प्रकल्पाच्या कक्षेत येणाऱ्या प्राधिकरणाच्या जमिनीवरील झोपडपट्ट्यांतील शौचालयांची देखभाल आणि पुनर्बांधणी करण्याचे संस्थेवर बंधनकारक राहील.
त्याचप्रमाणे प्राधिकरणाच्या जमिनीवरील झोपडपट्टीतील शौचालयांची बांधणी, पुनर्बांधणी आणि देखभाल करण्यास त्या संस्थेस 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 16 **Resolution No.** 1792

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कार्यालयातील उपहारगृहाचा चालू असलेला ठेका रद्द करणे व नवीन ठेकेदार निवडण्यासाठी निविदा मागविणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सचिव/प्राधिकरण व कर्मचारी संघटना प्रतिनिधी यांनी संयुक्तपणे पुढील कार्यवाही करावी व त्यांनी केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या कार्यालयासाठी उपहारगृहाचा सध्या चालू असलेला ठेका रद्द करण्यात यावा व नवीन ठेकेदार निवडण्याकरिता निविदा मागविण्यासाठी बाब टिप्पणांत दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून नव्या उपहारगृहाच्या निविदांची छाननी करणे, निविदा स्वीकारून ठेकेदार नेमणे याबाबतचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

**Item No.** 17 **Resolution No.**

विषय : मुंबईतील बैल्या, भाडेतत्वावर दिलेल्या गाळ्यांची विक्री.

ठराव :

**Meeting No.** 88 **Meeting Date** 24-Apr-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ९-४-१९९० रोजी पुणे येथे झालेल्या ८७ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.** 1793

विषय : वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्समधील ब्लॉक 'सी' मधील सर्वे क्रमांक ७ आणि ८ ही जमीन श्री. सी. डी. शहा यांना भाडे पट्ट्याने देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) श्री. सी. डी. शहा यांना जमिनीची किंमत भरण्यासाठी दिनांक १९-४-१९९० ते दिनांक २७-४-१९९० पर्यंत, आधी ज्या अटींवर मुदतवाढ दिली होती त्याच अटींवर, मुदतवाढ देण्यात यावी.
२) श्री. सी. डी. शहा, यांना जमिनीची किंमत भरण्यासाठी दिनांक २४-४-१९९० नंतर आणखी मुदतवाढ देऊ नये व त्या अनुषंगाने श्री. सी. डी. शहा यांची निविदा रद्द करण्याची पुढील कार्यवाही करण्यात यावी.
३) संबंधित भूखंडाचा विकास प्राधिकरणाने स्वत: करून त्यावर भारतात आदर्शवत असे व्यापारी केंद्र उभारण्यात यावे असे मत सर्व सदस्यांनी व्यक्त केले. त्यासाठी जरूर वाटल्यास आराखडा तयार करणेसाठी नामवंत अशा वास्तुशास्त्रज्ञांची मदत घेण्यात यावी. तथापि प्राधिकरणाचे असे स्पष्ट मत आहे की शक्य तो या भूखंडाचा आराखडा प्राधिकरणाच्या वास्तुशास्त्रज्ञामार्फतच तयार करण्यात यावा.

---

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेखाली उपलब्ध होणारे जादा गाळे.

जादा गाळ्यांच्या विक्रीबाबत.

ठराव :

---

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेखाली उपलब्ध होणारे जादा गाळे.

जादा गाळ्यांच्या विक्रीबाबत.

ठराव :

---

**Item No.** 4 **Resolution No.** 1794

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत नागरी नूतनीकरण योजनेतील मिठाईवाला चाळ जी/एन वॉर्ड काकासाहेब गाडगीळ मार्ग टप्पा - १ येथील पूर्ण झालेल्या इमारतीच्या रक्षणाकरिता सहा महिन्यापलीकडील कालावधीत झालेल्या पहारेकऱ्यांच्या खर्चाला मंजूरी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मिठाईवाला चाळ या पुनर्रचित इमारतीच्या रक्षणाकरिता सहा महिन्यापलिकडील कालावधीत पहारेकऱ्यांच्या खर्चाच्या रकमेस मंजूरी देण्यात येत आहे.

बैठकीपुढील प्रस्ताव संपल्यानंतर माननीय अध्यक्षांनी सुचविले की, मुंबई मंडळाच्या सभापती पदावर नव्याने नेमणूक झालेले श्री. विजय कांबळे हे आज कार्यालयात उपस्थित नसल्याने त्यांचे स्वागत करण्याची संधी प्राधिकरणास प्राप्त झाली नाही तथापि सचिव/प्राधिकरण यांनी प्राधिकरणाच्या शुभेच्छा त्यांची स्वतः भेट घेऊन कळवाव्यात.

यानंतर माननीय अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** **Special** **Meeting Date** **02-May-1**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २४-४-१९९० रोजी झालेल्या ८८ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.** **1795**

विषय : जुलै १९८९ मध्ये पूर व अतिवृष्टीने बाधीत झालेल्या लोकांना घरांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी रोख कर्ज उपलब्ध करून देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, 'म्हाडा' कायदा १९७७ मध्ये प्राधिकरणाच्या जमिनीवरील योजनांव्यतिरिक्त इतरांस 'प्राधिकरण निधी' मधून कर्ज देण्याची तरतूद नसल्याने व रायगड जिल्हयातील पूरग्रस्त लोकांना घरबांधणीसाठी रोख कर्जाची तातडीने आवश्यकता असल्याने हा प्रस्ताव शासनाकडे विशेष मंजूरीसाठी पाठवावा व शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करावी.

**Item No.** **3** **Resolution No.** **1796**

विषय : म्हाडातर्फे राबविण्यात येणारा गृहनिर्माण महाप्रकल्प

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. अवधेश प्रसाद सिन्हा यांनी उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाची धुरा समर्थपणे सांभाळून प्राधिकरणाच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी अतिव परिश्रम घेऊन त्यांनी जी प्राधिकरणाची उल्लेखनीय कामगिरी केली त्याची प्राधिकरण कृतज्ञतापूर्वक नोंद घेत आहे.
यानंतर माननीय अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 89 **Meeting Date** 11-May-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २-५-१९९० रोजी झालेल्या खास बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.** 1797

विषय : श्री. यशवंत गणेश परळेकर, वरिष्ठ सहाय्यक/प्राधिकरण यांच्या पत्नीसाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला की,

१. श्री. यशवंत गणेश परळेकर, वरिष्ठ सहाय्यक/प्राधिकरण यांना त्यांच्या पत्नीस कर्करोगाच्या आजारामुळे झालेल्या वैद्यकीय खर्चापैकी अनुज्ञेय खर्चाच्या ७५ प्रतिशत परंतु अधिकाधिक रु. ७५००/- मर्यादेपर्यंत खास बाब म्हणून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. मात्र वैद्यकीय नियमावलीच्या परिच्छेद २ (इ) (२) व (३) मध्ये बाब टिप्पणीत सुचविण्यात आलेली दुरुस्ती करण्यासाठी शासनाच्या मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.

---

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : म्हाडातर्फे राबविण्यात येणारी गृहनिर्माण महाप्रकल्प.

ठराव :

---

**Item No.** 4 **Resolution No.** 1798

विषय : मुंबई, ठाणे व पुणे येथील भाडेतत्वावर दिलेल्या बैठ्या गाळ्यांची विक्री योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, चेंबूर येथील सहकार नगर, विभाग २ मधील बैठ्या गाळ्याच्या बाबतीत शासनाने मंजूर केलेली मुंबई, ठाणे व पुणे येथील बैठ्या गाळ्यांच्या विक्री योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. मात्र तसे करताना या भागातील चटईक्षेत्र निर्देशांक यापुढील काळात वाढविला गेल्यास जादा चटईक्षेत्र निर्देशांकाचा वापर करण्याचा अधिकार प्राधिकरणास राहील या अटीवर या वसाहतीच्या बाबतीत विक्री योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी.

---

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : धारावी 'जी नॉर्थ' क्षेत्राचे नियोजन खाजगी जमीन मालकांना 'ना हरकत प्रमाणपत्र'.

ठराव :

---

**Item No.** 6 **Resolution No.** 1799

विषय : नोकरी करणाऱ्या एकट्या महिला व त्यांची मुले यांच्याकरिता वसतीगृह बांधण्यासाठी भूखंडाचे वितरण करण्यासंबंधी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, जागतिक बँक प्रकल्पातर्फे वेगवेगळ्या ठिकाणी सोयीसह भूखंड योजना राबविण्यात येत आहेत अशा ठिकाणी शासनाच्या समाज कल्याण खात्याने शिफारस केलेल्या स्वयंसेवी संस्थांना जमिनीची किंमत व विकासासाठी झालेला खर्च घेऊन नोकरी करणाऱ्या महिला व त्यांची मुले यांच्यासाठी वसतीगृहे बांधण्यासाठी वाटप करण्यास संमती देण्यात येत आहे, अशा वसतीगृहामध्ये साधारणत: दोन हजार महिलांची सोय होईल, इतकी जमीन टप्प्याटप्प्याने आरक्षित करण्यास हरकत नाही.

भूखंडाचे वितरण करण्यापूर्वी जमिनीच्या अधिमूल्याची ५० टक्के रक्कम वसूल करावी व उरलेली ५० टक्के रक्कम वीस वर्षांच्या कालावधीत समान मासिक हप्त्यात १२ टक्के व्याजाने वसूल करावी.

या भूखंडावर वार्षिक भुईभाडे अधिमूल्याच्या एक टक्का इतके राहील.

भूखंडाचे वाटप ज्या संस्थांना केले जाईल, त्या संस्थेच्या कार्यकारी मंडळावर प्राधिकरणाचा अधिकारी नेमणे संस्थेवर बंधनकारक राहील.

**Item No.** 7 **Resolution No.** 1800

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणांस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रु. २०५.९१ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 8 **Resolution No.** 1801

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ, मुंबई (हडको) यांनी विहित केलेल्या अटींवर बाब टिप्पणास जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या हुडको अर्थसहाय्यित नाशिक, नागपूर व औरंगाबाद जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण रु. ७६.३८ कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यास देण्यात येते.

विषयसूचीवरील प्रस्ताव संपल्यानंतर मा. अध्यक्षांचे परवानगीने खालील विषयांचे प्रस्ताव आयत्यावेळी प्राधिकरणाच्या विचारार्थ ठेवण्यात आले.

**Item No.** 9 **Resolution No.** 1802

विषय : प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वी आजूबाजूचा परिसर हरित करण्याबाबत.

उपवन अधिकाऱ्याचे पद निर्माण करून त्यावर प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या आस्थापनेवर उपवन अधिकारी (सहाय्यक वनरक्षक) या दर्जाचे रु. २२००-७५-२८००-द.रो.-१००-३७०० या वेतनश्रेणीमध्ये एक पद निर्माण करण्यात यावे व त्यावर वन विभागाकडून किंवा इतर शासकीय खात्यामधून प्रतिनियुक्तीवर योग्य अशी व्यक्ती मागवून त्याची नियुक्ती करावी किंवा शासनाच्या सेवेतून गेल्या एक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची एक वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने पुनर्नेमणूक करावी व त्यांना आवश्यक लागणारा कर्मचारीवर्ग उपलब्ध कर्मचाऱ्यांमधून व इतर आवश्यक सुविधा पुरविण्यात याव्यात.

**Item No.** 10 **Resolution No.** 1803

विषय : वर्सोवा सर्व्हे नं. १२० आणि मुलुंड सर्व्हे नं. ३८६ या क्षेत्राच्या कंत्राटदारास मालमत्तेच्या देखरेखीच्या क्षेत्र राखण व पहारा करण्याच्या कामाचा मोबदला पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वर्सोवा सर्व्हे नं. १२० या क्षेत्रासाठी पुढील सहा महिन्यासाठी म्हणजेच दिनांक १-४-१९९० ते दि. ३०-९-१९९० पर्यंत व वर्सोवा सर्व्हे नं. ३८६ या क्षेत्रासाठी दिनांक १४-२-१९९० ते दि. १३-८-१९९० पर्यंत राखण व पहारा यासाठी होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 11 **Resolution No.** 1804

विषय : जुलै, १९८९ मध्ये पूर व अतिवृष्टीने बाधीत झालेल्या लोकांसाठी प्राधिकरणातर्फे हाती घेतलेल्या घरबांधणीसाठी वित्तीय संस्थेकडून कर्ज उपलब्ध करून घेण्यासाठी अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत दर्शविलेल्या गृहनिर्माण योजनांसाठी एच.डी.एफ.सी. या वित्तीय संस्थेकडून रु. ३४.०६ लाख (रु. चौतीस लाख सहा हजार मात्र) कर्ज, ७ टक्के व्याजाने व ११ वर्षे व ३ महिने या मुदतीने घेण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** **12** **Resolution No.** **1805**

विषय : जुलै, १९८९ मध्ये पूर व अतिवृष्टीने बाधीत लोकांना घराचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी रोख कर्ज वित्तीय संस्थेकडून घेण्यासाठी अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, जिल्हाधिकारी, रायगड यांनी केलेल्या विनंतीनुसार रायगड जिल्ह्यातील १९४९ पूरग्रस्तांस घराचे उर्वरित बांधकाम पूर्ण करण्यासाठी प्रत्येकी रु. ६०००/- प्रमाणे रोख कर्ज म्हणून एच. डी. एफ. सी. या वित्तीय संस्थेकडून रु. १,२१,४९,०००/- (रु. एक कोटी एकवीस लक्ष एकोणपन्नास हजार मात्र) कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते. व्याजाचा दर व परतफेडीची मुदत एच. डी. एफ. सी. व प्राधिकरण यांनी ठरवावा.
यानंतर मा. अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 90 **Meeting Date** 02-Jul-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ११-५-१९९० रोजी झालेल्या ८९ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.** 1806

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी १९९० पासून सुधारित दराने महागाई भत्ता देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना, दिनांक १ जानेवारी १९९० पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याच्या बाबतीत केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** 3 **Resolution No.** 1807

विषय : प्राधिकरणाच्या निविदा सूचना, नोकरीविषयक व गाळे वितरणाविषयक जाहिराती, जाहिरात संस्थेमार्फत प्रसिद्ध करण्याबाबत विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या मुंबईतील सर्व कार्यालयाच्या जाहिराती मे. जॉर्ज जॉन ॲडव्हरटाईजिंग जाहिरात संस्थेमार्फत जाहिरात दरात ५ टक्के रोख सूट स्वीकारून घ्यावयाच्या (ठराव क्रमांक १७७४ दिनांक २२-२-१९९०) निर्णय रद्द करण्यात येऊन पूर्वी ज्याप्रमाणे प्राधिकरणाच्या जाहिराती देण्यात येत असत त्याप्रमाणेच देण्यात याव्यात.

---

**Item No.** 4 **Resolution No.** 1808

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सुधारित दराने घरभाडे भत्ता देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सुधारित दराने घरभाडे देण्याच्या बाबतीत केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय :
१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि गाळ्यांची अदलाबदल) विनियम. १९८१ मधील विनियम १६ मध्ये सुधारणा.
२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ मधील विनियम १६ मध्ये सुधारणा.

ठराव :

---

**Item No.** 6 **Resolution No.** 1809

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण वाळूंज औरंगाबाद रचनात्मक आराखडा प्रसिद्ध करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, वरील नकाशा महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ११५ (२) नुसार लोकांच्या सूचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यास मंजूरी देण्यास येत आहे.
या संदर्भात जरूर ती पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

---

**Item No.** 7 **Resolution No.** 1810

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेखाली उपलब्ध होणारे जादा गाळे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या नागरी नूतनीकरण योजनेत उपलब्ध होणाऱ्या जादा गाळ्यांची विक्री बाब टिप्पणांत नमूद केलेल्या सुधारित कार्यपद्धतीत अनुसरून तात्पुरत्या स्वरूपात करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
या प्रकल्पांतर्गत यापुढे राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेखाली उपलब्ध होणारे जादा गाळे बाजारभावाने विकणेसाठी तशी तरतूद करणे आवश्यक आहे, असे अध्यक्षांनी सूचित केले.

---

**Item No.** 7 **Resolution No.** 1810

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेखाली उपलब्ध होणारे जादा गाळे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या नागरी नूतनीकरण योजनेत उपलब्ध होणाऱ्या जादा गाळ्यांची विक्री बाब टिप्पणांत नमूद केलेल्या सुधारित कार्यपद्धतीत अनुसरून तात्पुरत्या स्वरूपात करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
या प्रकल्पांतर्गत यापुढे राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेखाली उपलब्ध होणारे जादा गाळे बाजारभावाने विकणेसाठी तशी तरतूद करणे आवश्यक आहे, असे अध्यक्षांनी सूचित केले.

---

**Item No.** 8 **Resolution No.** 1811

विषय : धारावी जी नॉर्थ क्षेत्राचे नियोजन

---

खाजगी जमीन मालकांना 'ना हरकत प्रमाणपत्र' देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या 'धारावी जी नॉर्थ क्षेत्रामध्ये' खाजगी जमीन मालकांना त्यांच्या जमिनीचा विकास करण्यासाठी बाब टिप्पणांत नमूद केलेल्या पद्धतीनुसार, खाजगी जमीन मालकांना पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे आवश्यक असलेले 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १६-६-९० रोजी झालेल्या अनौपचारिक बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 1812

विषय : धारावी मंजूर विकास आराखड्यामध्ये करावयाचे फेरबदल
पर्यायी रस्ता नागरी नूतनीकरण योजनेखाली २९ सी कंथारिया चाळ, प्लॉट सी. एस. नं. ३१४ (भाग) धारावी, मुंबई.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, धारावी पुनर्विकास योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या इमारतींची पुनर्बांधणी करण्यासाठी याआधी मंजूर केलेल्या नकाशामध्ये ९.१५ मीटर रुंदीच्या रस्त्यांची आखणी सुधारित नकाशात अंशतः बदलण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 11 **Resolution No.** 1813

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे धारावी येथे बांधण्यात आलेल्या ७२ निवासी व ८ अनिवासी गाळ्यांच्या इमारतीची विक्री करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार व शासनाने सुचविल्याप्रमाणे इमारतींची किंमत आकारून इमारतींची विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 12 **Resolution No.** 1814

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे कांदिवली (पश्चिम) व मुलुंड (पूर्व) येथील विकसित भूखंडाच्या वाटपाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणाच्या पृष्ठांकन तीन वरील परिच्छेद २ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे व बाब टिप्पणात जोडलेल्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या भूखंडनिहाय निविदांचा विचार करण्यात येऊन त्यामध्ये जास्तीत जास्त दर देऊ केलेल्या निविदा उतरत्या क्रमाने अनुक्रमे प्रत्येकी तीन पर्यंत विचारात घेण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 13 **Resolution No.** 1815

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत उमरखाडी येथील इमारत क्रमांक ६१-७१ उमरखाडी रोड व इमारत क्रमांक ४०-४२ उमरखाडी १ ला रोड 'ब' विभाग येथील पूर्ण इमारतींच्या रक्षणासाठी सहा महिन्यापलिकडील कालावधीत झालेल्या पहारेकऱ्यांच्या खर्चास मंजूरी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, इमारत क्रमांक ६१-७१ उमरखाडी रोड व इमारत क्रमांक ४०-४२ उमरखाडी १ ला रोड ह्या पुनर्रचित इमारतीच्या रक्षणाकरिता सहा महिन्यापलिकडील कालावधी झालेल्या पहारेकऱ्यांच्या खर्चाच्या रकमेस मंजूरी घेण्यात येत आहे.
विषयसूचीवरील प्रस्ताव संपल्यानंतर मा. अध्यक्षांचे परवानगीने खालील प्रस्ताव आयत्यावेळी प्राधिकरणाच्या विचारार्थ घेण्यात आहे.

---

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : ज्ञानेश्वर नगर, शिवडी, वडाळा येथील माडेकरांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस भूखंड घेण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : अंधारचाळ क्रमांक १८-२२-२६-३० अनंत गणपत पवार, मार्ग काळाचौकी येथील पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत होणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेचे काम निविदा व मागविता नागरी नूतनीकरण योजना कामाठीपूरा ११-१२-१३ बी-गल्ली, टप्पा क्रमांक ३ ई वॉर्ड या कामाच्या बदल्यात ह्या कामाचे कंत्राटदार मे. राहुल कन्स्ट्रक्शन कंपनी, मुंबई यांना देण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 16 **Resolution No.** 1816

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास कायदा १९७६ मधील विभाग-६ मधील तरतूदींची अंमलबजावणी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाचे व आम जनतेचे हितसंबंध लक्षात घेऊन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर अपील अधिकाऱ्यांचे १ जादा पद व त्यावर होणारा खर्च प्राधिकरणाच्या फंडातून भागवावयास १ वर्षाच्या कालावधीसाठी मान्यता देण्यात येते. तसेच शासनाच्या अशा प्रकारचे अपील अधिकाऱ्याचे एक अधिक पद कायम स्वरूपात निर्माण करावे व त्याकरिता पुढे येणारा खर्च शासनाने सोसावा अशी विनंती शासनाकडे करावी असेही ठरविण्यात आले.

---

**Meeting No.** 91 **Meeting Date** 31-Aug-1

**Item No.** 1 **Resolution No.** 1818

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक - २-७-१९९० रोजी झालेल्या ९० व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई मंडळाच्या अभियांत्रिकी कार्यपद्धतीचा अभ्यास करून ती सुकर करण्याच्या हेतूने सूचना करण्यासाठी पुढील प्रमाणे एक उपसमिती नेमावी.

१. श्री. बडवे, सदस्य/प्राधिकरण
२. डॉ. खेडेकर, सदस्य/प्राधिकरण
३. श्री. मांजरेकर, सदस्य/प्राधिकरण

मुंबई मंडळाचे मुख्य अभियंता श्री. वाणी या समितीचे निमंत्रक रहातील.
कार्यवृत्ताबद्दल आणखी काही सूचना अथवा सुधारणा सुचविण्यात आली नाही व वरील भरीसह सदरहू कार्यवृत्त स्थायी करण्यात आले.

**Item No.** 2 **Resolution No.** 1819

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्प विभागात सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ व तात्पुरते अतिरिक्त पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्प विभागात सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञाचे १ अतिरिक्त पद जानेवारी १९८८ ते फेब्रुवारी १९८८ या दोन महिन्याच्या कालावधीसाठी निर्माण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : अभ्युदयनगर काळाचौकी येथील इमारत क्र. ३८ व २८ च्या मागील बाजूस असलेल्या झोपडीधारकांना पर्यायी जागा देणे.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.** 1820

विषय : गोराई रोड, बोरिवली (पश्चिम) येथील दुकानाच्या २२ गाळ्यांच्या इमारतींची विक्री महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळास करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गोराई रोड, बोरिवली (पश्चिम) येथील दुकानांच्या २२ गाळ्यांच्या इमारतीची महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळास रु. १७ लाख किंमतीस विक्री करण्याबाबत अध्यक्ष/प्राधिकरण ह्यांनी निर्णय घ्यावा असे ठरले.

**Item No.** 5 **Resolution No.** 1821

विषय : इलेक्ट्रीक सबस्टेशन किंवा ट्रान्सफॉमरसाठी जमीन भाडेपट्टयाने देण्याचे अधिकार प्रादेशिक मंडळास देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, इलेक्ट्रीक सबस्टेशनसाठी किंवा ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, बी. ए. एस. टी. उपक्रम, बॉम्बे सबर्बन, इलेक्ट्रीक सप्लाय लिमिटेड किंवा अन्य वीजपुरवठा कंपनी यांच्याकडून भूखंड मिळण्याची विनंती केली गेल्यास असा भूखंड रेखांकित करून देता येण्यासारखा असल्यास या वापरासाठी त्याचे वाटप करण्याचे अधिकार प्रादेशिक मंडळाला देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.
या संदर्भात जरूर ती पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार प्रादेशिक मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांना देण्याचे एकमताने ठरले.

**Item No.** 6 **Resolution No.** 1822

विषय : सर्व्हे क्रमांक १२० अ (नवीन स. क्रमांक १२० ब) येरवडा, पुणे येथील ३२३७५ चौ. मी. जमीन पुणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, येरवडा पुणे येथील सर्व्हे क. १२० अ (नवीन सर्व्हे क. १२० ब) येथील सुमारे ३२३७५ चौ. मी. जमीन कर्मचाऱ्यांकरिता घरबांधणीसाठी पुणे महानगरपालिकेस, जमिनीची प्रत्यक्ष किंमत आणि दरवर्षी नाममात्र भाडेपट्टी रु. १/- आकारून दिनांक २४-७-१९८७ रोजी हस्तांतरीत करण्यास त्याचप्रमाणे ती जमीन कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना पोटभाड्याने देण्यास महानगरपालिकेस परवानगी देण्याच्या कार्यवाहीस औपचारिक मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 7 **Resolution No.** 1823

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रु. ६०.९६ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.** 1824

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ, मुंबई (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर बाब टिप्पणास जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या हुडको अर्थसहाय्यित जळगाव, बुलढाणा, परभणी, नांदेड व वर्धा जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता ग्रमीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण रु. ६२.०७ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पाखाली सर्व्हे नं. १३८ मानखुर्द येथील गलिच्छ वस्ती पुनर्वसन योजनेखाली बांधलेले गाळे.
अतिरिक्त गाळ्याविषयीचे धोरण.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 1825

विषय : श्री. एस. सांबामूर्ती, मुख्य लेखाधिकारी, जागतिक बँक प्रकल्प यांचा पुनर्नेमणूकीचा कालावधी वाढवून देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. एस. सांबामूर्ती, मुख्य लेखाधिकारी, जागतिक बँक प्रकल्प/प्राधिकरण यांचा पुनर्नेमणूकीचा कालावधी १ महिन्यापुरता दिनांक १-९-१९९० पासून ते दिनांक ३०-९-१९९० पर्यंत वाढविण्यास मंजूरी देण्यात आली आहे.
पुढील कालावधी दि. ३१-८-१९९१ पर्यंत वाढविण्याबाबत प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत विचार विनिमय करण्यासाठी सादर करावा असे ठरले.

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : भूनवेश्वरी एज्युकेशन सोसायटीस माध्यमिक शाळेसाठी वाटप केलेल्या कांदिवली (पूर्व) येथील भूखंडाचा विकास करून मिळणे किंवा अधिमूल्याचा दर कमी आकारणे याबाबत संस्थेची मागणी.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : भूनवेश्वरी एज्युकेशन सोसायटीस माध्यमिक शाळेसाठी वाटप केलेल्या कांदिवली (पूर्व) येथील भूखंडाचा विकास करून मिळणे किंवा अधिमूल्याचा दर कमी आकारणे याबाबत संस्थेची मागणी.

ठराव :

**Item No.** 12 **Resolution No.** 1826

विषय : धारावी मंजूर विकास आराखड्यामध्ये करावयाच्या फेरबदलाबाबत.

नवीन रस्ता तयार करण्याबाबत धारावी पुनर्बांधणी योजनेअंतर्गत कल्याणवाडी 'अ' ते धारावी मेन रोडपर्यंत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, धारावी पुनर्विकास योजनेअंतर्गत कल्याणवाडी 'अ' पासून धारावी मेन रोडपर्यंत नकाशात ११.०० मीटर रुंदीचा विकास आराखड्यामधील रस्त्यास मान्यता देण्यात आली.

**Item No.** 13 **Resolution No.** 1827

विषय : नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत मूकर क्र. २०२०, २०२१ मांडवी विभाग उमरखाडी टप्पा - १ उत्तर भाग - २ येथील इमारतीच्या रक्षणासाठी सहा महिन्याच्या पलिकडील कालावधीत झालेल्या पहारेकऱ्यांच्या खर्चाला मंजूरी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत मूकर क्र. २०२०, २०२१ मांडवी विभाग उमरखाडी टप्पा - १ उत्तर भाग - २ येथील इमारतीच्या रक्षणासाठी अतिरिक्त पंधरा महिन्यासाठी म्हणजे १-१०-८९ ते ३१-१२-९० पर्यंतच्या कालावधीसाठी होणाऱ्या खर्चाला मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 14 **Resolution No.** 1828

विषय : उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण व उपमुख्य अधिकारी (प्रशासन)/मुंबई मंडळ या पदावर कंत्राटी पद्धतीवर नेमणूका करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. दंडवते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण ह्यांच्या नेमणूकीस त्यांनी २०-७-९० रोजी कार्यभार स्वीकारल्यापासून एक वर्षासाठीच्या पुनर्नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 14 **Resolution No.** 1828

विषय : उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण व उपमुख्य अधिकारी (प्रशासन)/मुंबई मंडळ या पदावर कंत्राटी पद्धतीवर नेमणूका करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. दंडवते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण ह्यांच्या नेमणूकीस त्यांनी २०-७-९० रोजी कार्यभार स्वीकारल्यापासून एक वर्षासाठीच्या पुनर्नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 15 **Resolution No.** 1829

विषय : वर्सोवा सर्व्हे नं. १२० आणि मुलुंड सर्व्हे नं. ३८६ या क्षेत्रांच्या कंत्राटदारास मालमत्तेच्या देखरेखीच्या क्षेत्ररक्षण व पहारा करण्याच्या कामाचा मोबदला पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, राखण व पहारा संबंधीच्या पुढील सहा महिन्यासाठी म्हणजेच दिनांक १-१०-९० ते ३१-३-९१ पर्यंत वर्सोवा सर्व्हे. १२० क्षेत्रासाठी दिनांक १४-८-१९९० ते १३-८-१९९१ पर्यंत मुलुंड सर्व्हे नं. ३८६ क्षेत्रासाठी तत्वतः मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 16 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या मजासवाडी येथील गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या निविदाबाबत.

ठराव :

**Item No.** **17** **Resolution No.**

विषय : पुनर्रचित इमारतीतील निवासी/अनिवासी सदनिकांच्या अनधिकृत हस्तांतरणाबाबत.

ठराव :

**Item No.** **18** **Resolution No.** **1830**

विषय : गंगापूर सहकारी साखर कारखाना मर्यादित गंगापूर जिल्हा-औरंगाबाद यांची विविध उत्पन्न गटातील कर्मचाऱ्यांकरिता घरबांधणी योजना प्राधिकरण सहाय्य, सेवा व प्रस्ताव कार्यरत करण्याच्या प्रकियेबाबत प्राधिकरण शुल्क २ टक्के आकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गंगापूर सहकारी साखर मर्यादित गंगापूर जिल्हा-औरंगाबाद मार्फत राबविल्या जाणाऱ्या गृहनिर्माण योजनेत अत्यावश्यक ती सहाय्य, सेवा व प्रस्ताव कार्यरत करण्यास प्राधिकरणातर्फे पुरविले जाईल व या प्रक्रीयेबद्दल २ टक्के फी आकारणी गंगापूर सहकारी साखर कारखाना प्राधिकरणाला देईल, तसे करारपत्र विधी विभागाच्या सल्ल्याने प्राधिकरणातर्फे मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ व गंगापूर सहकारी साखर कारखाना यांचे मध्ये केला जाईल. तसेच हुडकोकडून प्राप्त होणाऱ्या कर्ज परतफेडीची कुठलीही हमी वा जबाबदारी प्राधिकरणाकडे राहणार नाही.

सर्वसाधारण :

विषय सूचीवरील विषय संपल्यानंतर, बैठकीमध्ये माननीय अध्यक्षांनी कोकण मंडळ व इतर प्रादेशिक मंडळे यांना जमिनी हस्तगत करण्याबाबत ज्या अडचणी येतात त्याबाबत मा. गृहनिर्माण मंत्री व मा. मुख्यमंत्री यांना पत्र लिहून नागरी कमाल जमीन धारणाकायद्याखाली जमिनी हस्तगत करण्याबाबत सदरहू कायद्याखाली जमिनी उपलब्ध होणाऱ्या जमिनीचे वितरण करण्यासाठी जिल्हाधिकारी स्थरावर असलेल्या समितीवर प्रादेशिक मंडळाच्या सभापतीस सदस्य म्हणून घ्यावे अशी विनंती करावी. या संदर्भात प्राधिकरणाच्या पुणे येथील बैठकीनंतर मा. मुख्यमंत्री यांनी उपरोक्त विनंती मान्य केली होती. तथापि, याबाबत कार्यवाही झाली नसल्याने मा. मुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री यांच्या निदर्शनास आणून द्यावे असे अध्यक्ष/प्राधिकरण ह्यांनी सुचविले व तसे पत्र माननीय मुख्यमंत्री व मा. गृहनिर्माण मंत्री ह्यांना अध्यक्षांचे वतीने द्यावे असे सुचविले.

यानंतर मा. अध्यक्षांचे आभार मानून ह्या बैठकीचे कामकाज संपले.

**Meeting No.** 92 **Meeting Date** 10-Sep-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३१-८-१९९० रोजी झालेल्या ९१ बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : विभागीय मंडळाला भूसंपादन करण्याबाबत येणाऱ्या अडचणी.
अ) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७५ अन्वये जमीन संपादन करणेबाबत.
ब) नागरी कमाल जमीन धारणाखाली उपलब्ध होणारी जमीन.
क) वाटाघाटीने उपलब्ध होणाऱ्या खाजगी जमिनी.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : पुर्नरचित इमारतीतील निवासी/अनिवासी सदनिकांच्या अनधिकृत हस्तांतरणाबाबत.

ठराव :

**Meeting No.** 93 **Meeting Date** 25-Sep-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १०-९-१९९० रोजी झालेल्या ९२ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : ऑल इंडिया फ्रीडम फायटर्स फोरम या स्वातंत्र्य सैनिकांच्या संघटनेला स्वातंत्र्य सैनिक भवन बांधण्यासाठी मुंबईमध्ये भूखंड देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 1831

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवर विशेष कार्य अधिकाऱ्याचे एक पद निर्माण करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवर भारतीय प्रशासन सेवेमधील अथवा तत्सम श्रेणीतील रु. ३२००-१००-३७००-१२५-४७०० या वेतनश्रेणीमध्ये विशेष कार्य अधिकाऱ्याचे एक पद एक वर्षाच्या कालावधीसाठी निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ह्या पदाच्या निर्मितीसाठी शासनाची रितसर मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. वेतन, अन्य भत्ते, प्रतिनियुक्ती भत्ते, प्रवास भत्ता, वाहन, वाहनचालक, स्वीय सहाय्यक, कार्यालयीन सेवानिवासस्थान वगैरे बाबींवरील खर्च दुरुस्त व पुनर्रचना फंडातून भागविण्यात यावा असे ठरविण्यात आले.

**Item No.** 4 **Resolution No.** 1832

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मधील गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी देण्याच्या संबंधातील तरतूदी विकसित भूखंडाच्या हस्तांतरणास परवानगी देण्याच्या बाबतीत लागू करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मधील गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी देण्याच्या बाबतीत लागू करण्याची तरतूद जमीन वाटप विषयक विनियमात करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी देण्यासाठी प्राधिकरणाच्या धोरणात्मक निर्णयानुसार जे अधिमूल्य आकारले जाते त्याच धर्तीवर भूखंडाच्याह बाबतीतही आकारण्यात यावे असे ठरविण्यात आले.

**Item No.** 5 **Resolution No.** 1833

विषय : पंतनगर घाटकोपर येथे ११ महिन्याच्या लिव्ह अँड लायसेन्स तत्वावर पिठाच्या गिरणीसाठी दिलेल्या भूखंडाची मुदत वाढविले व त्या भूखंडालगतचा भूखंड त्याच भूखंडधारकास देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. यादव यांना देण्यात आलेला सध्याचा भूखंड (१३० चौ. मी.) दिनांक १ जून, १९७५ पासून भाडेपट्ट्याने देण्यात यावयाच्या कालावधीपर्यंतच्या काळासाठी भाडे अधिक सेवाआकार घेऊन विनियमित (रेग्युलेट) करण्यास मान्यता देण्यात येते.
२) श्री. यादव यांना सध्या दिलेला १३० चौ. मी. मापाचा भूखंड आणि मुंबई मंडळाने प्रस्तावित केलेला १२४ चौ. मी. मापाचा जादा भूखंड मिळून एकूण २५४ चौ. मी. मापाचा भूखंड श्री. यादव यांना ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने पिठाची गिरणी चालविण्याच्या वापराकरिता, नेहमीच्या अटींवर देण्यात मान्यता देण्यात येते. त्यासाठी प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतविषयक धोरणानुसार निवासी वापराच्या बाजारभावाच्या दुप्पट दराने अधिमूल्य आणि अधिमूल्याच्या एक टक्का दराने वार्षिक भाडेपट्टी आकारण्यात यावी.

---

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : व्यापारी उपयोगासाठी दिलेल्या गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी देण्यासाठी आकारावयाच्या फीचा दर ठरविणे.

ठराव :

---

**Item No.** 7 **Resolution No.** 1834

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत, नागरी नूतनीकरण योजनेतील २४-२४ डी, २८-२८ सी 'वाच्छा बिल्डींग' ना. म. जोशी मार्ग, जी/दक्षिण विभाग, मुंबई टप्पा क्रमांक १ येथील पूर्ण झालेल्या इमारतीच्या रक्षणाकरिता सहा महिन्यापलिकडील कालावधीत झालेल्या पहारेकऱ्यांच्या खर्चाला मंजूरीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत, नागरी नूतनीकरण योजनेतील २४-२४ डी, २८-२८ सी 'वाच्छा बिल्डींग' ना. म. जोशी मार्ग, जी/दक्षिण विभाग, मुंबई टप्पा क्रमांक १ येथील पूर्ण झालेल्या इमारतीच्या रक्षणाकरिता पहिल्या सहा महिन्यापलिकडील होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** **8 a** **Resolution No.** **1836**

विषय :

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

पोईसर येथील गृहनिर्माण महाप्रकल्पासाठी फक्त दोनच विकसकांनी विहित मुदतीत सीलबंद निविदा सादर केल्या आहेत व दोन्हीही विकसकांनी दिलेले दर हे वाजवी नसून बाजारभावापेक्षा बरेच जास्त आहेत. निम्नतम विकसकांशी वाटाघाटी करून त्यांनी दिलेला अंतिम दर हाही वाजवी दरापेक्षा खूपच जास्त असल्याने दोन्ही विकसकांच्या निविदा न स्वीकारता नामंजूर करण्यात येत आहेत.

तथापि, वरील महाप्रकल्पाचे काम तातडीने हाती घेऊन पूर्ण करणे आवश्यक आहे यास्तव प्राधिकरणाच्या ठराव क्र. १६६० अनुसार १९ पूर्वपात्र विकसकांकडून १५ दिवसांची अल्प मुदतीची नोटीस देऊन फेरनिविदा मागवाव्यात असे ठरले.

विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर मा. अध्यक्षांनी श्री. एस. सांबामूर्ती, मुख्य लेखाधिकारी, जागतिक बँक प्रकल्प यांच्या पुनर्नेमणूकीचा कालावधी वाढविण्याबाबत चर्चा घडवून आणली.

**Item No.** 8 **Resolution No.** 1835

विषय : प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या मजासवाडी येथील गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या निविदाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण महाप्रकल्पातील मजासवाडी, येथील प्रकल्पासाठी युनिटी कन्स्ट्रक्शन कंपनीची निम्नतम दराची व अंतिम वाटाघाटीनंतर आणखी कमी केलेल्या किंमतीची निविदा खालील तपशीलानुसार स्वीकारण्यात यावी. टप्पा - १ मध्ये बांधावयाच्या अल्प उत्पन्न गटातील प्रत्येक गाळ्याच्या दर रु. ६४,२००/- (रु. चौसष्ट हजार दोनशे फक्त) व प्रत्येक दुकानासाठी दर रु. ९६,०६९/- (रु. शहाण्णव हजार एकोणसाठ फक्त) राहील. तसेच जमीन विकास व बाह्य सुविधांचा दर खालील तपशीलानुसार राहील.

| | | |
|---|---|---|
| १. जमिनीचा विकास | रु. | ४८,८९,४५१/- |
| २. रस्ते व बाजूची गटारे | रु. | ३५,०७,०७०/- |
| ३. बहिस्थ पाणीपुरवठा | रु. | ७,६४,५३२/- |
| ४. सुवरेज | रु. | २१,१५,६९८/- |
| ५. इलेक्ट्रीक सबस्टेशन | रु. | १३,९१,२७१/- |
| ६. सबस्टेशन पासून इमारतीपर्यंतचे सर्विस केबलिंगचे काम (मीटरसुद्धा) | रु. | २८,८९,२२१/- |
| एकूण | रु. | १,५५,५७,२४३/- |

टप्पा - १ मध्ये सुमारे २२५० अल्प उत्पन्न गटातील गाळे (बदलक्षम) व २४ दुकाने बांधावयाची आहेत. गाळे, दुकाने व वरीलप्रमाणे बाह्य सुविधा यांची वाटाघाटीचे निविदेनुसार टप्पा - १ च्या बांधकामाची निविदेची किंमत रु. १६,२३,१२,८९९/- (रुपये सोळा कोटी तेवीस लक्ष बारा हजार आठशे नव्याण्णव फक्त) राहील. (बदलक्षम) योजनेचा भू-अभिन्यास व इमारत नकाशे मुंबई महानगरपालिकेने मान्य करताना विकास नियंत्रण नियमावलीतील गाळ्यांच्या घनतेच्या प्रमाणानुसार जर अल्प उत्पन्न गटातील काही गाळे मध्यम उत्पन्न गटात रुपांतरित करावे लागले तर टप्पा - १ मध्ये अशा मध्यम उत्पन्न गटातील प्रत्येक गाळ्याचा दर रु. १,२८,४००/- (रु. एक लक्ष अठ्ठावीस हजार चारशे फक्त) राहील व अशा प्रत्येक मध्यम उत्पन्न [illegible] गाळ्यांसाठी दोन स्वयंपाकाचे ओटे व २ टॉयलेट ब्लॉक बांधावयाचे आहेत. भावी काळात प्राधिकरणास टी.डी.आर.चा लाभ झाल्यास टप्पा - २ मधील कामासाठी अल्प उत्पन्न गटातील सुमारे ५९४ गाळे बांधावयाचे आहेत व यातील प्रत्येक गाळ्याचा दर रु. ६५,९४८/- (रुपये पासष्ट हजार नऊशे अठ्ठेचाळीस फक्त) राहील व टप्पा - २ मधील कामाची किंमत रुपये ३,९१,७३,११२/- (रुपये तीन कोटी एक्याण्णव लक्ष त्र्याहत्तर हजार एकशे बारा फक्त) राहील. (बदलक्षम) टप्पा - २ मधील कामाच्या दरात फक्त टप्पा - २ मधील इमारतींसाठी खास लागणारे जादा बाह्य सुविधांच्या खर्चाचा समावेश आहे. तसेच टप्पा - १ प्रमाणे, टप्पा - २ मधील अल्प उत्पन्न गटातील काही गाळे मध्यम उत्पन्न गटात रुपांतरित करावयाचे झाल्यास अशा मध्यम उत्पन्न गटातील प्रत्येक गाळ्याचा दर रु. १,३१,८९६/- (रुपये एक लक्ष एकतीस हजार आठशे शहाण्णव फक्त) राहील. तसेच अशा मध्यम उत्पन्न गटातील गाळ्यांसाठी दोन स्वयंपाक घराचे ओटे व २ टॉयलेट ब्लॉक्स बांधावयाचे आहेत.

टप्पा - २ मधील कामाचा वरील दर ६ महिन्यांसाठी बंधनकारक राहील व निर्णय मिळण्यास त्यापेक्षाही अधिक उशीर झाल्यास त्यानंतर व पुढील प्रत्येक ६ महिन्यांस प्रत्येकी ६ टक्के दरवाढ देण्यात येईल.

गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या प्रस्तावावर चर्चा करताना माननीय अध्यक्षांनी पोईसर, कांदिवली येथील महाप्रकल्पाच्या प्रस्तावाची माहिती सांगितली. त्यावर बैठकीत चर्चा करण्यात आली व आलेल्या निविदा नामंजूर करण्याचा व १५ दिवसांच्या अल्प मुदतीने फेरनिविदा बोलाविण्याबाबत निर्णय घेण्यात आला व प्राधिकरणाने,

**Item No.** 9 **Resolution No.** 1837

विषय : श्री. एस. सांबामूर्ती, मुख्य लेखाधिकारी/जा. बँ. प्र. यांचा पुनर्नेमणूकीचा कालावधी वाढवून देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. एस. सांबामूर्ती, मुख्य लेखाधिकारी/जा. बँ. प्र. यांचा पुनर्नेमणूकीचा कालावधी दिनांक १.१०.१९९० पासून दिनांक ३०.११.१९९० पर्यंत आणखी दोन महिन्यांसाठी वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

प्राधिकरणाच्या बैठकीच्या विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर माननीय मंत्रीमहोदय (गृहनिर्माण) यांनी खालील बाबींवर प्राधिकरणाचे लक्ष वेधून आढावा घेतला.

१. पुनर्रचित इमारतीतील गाळे :

पुनर्रचित इमारतीतील १५५० गाळे बांधून पडलेले आहेत त्यांचे वितरण अद्याप झालेले नाही. ९३५ पुनर्रचित गाळ्यांमध्ये घुसखोरी झालेली आहे. मास्टर लिस्ट तयार झालेली असतानाही गाळे वितरण झालेली नाही. ते पुढे म्हणाले की, इमारती तयार होऊनही गाळे वाटप वेळच्यावेळी का होत नाही याची दखल घेतली गेली पाहिजे. १५-२० वर्षांपासून संक्रमण गाळ्यात राहणाऱ्या भाडेकरूंना आपण अद्याप पुनर्रचित इमारतीत जागा देऊ शकलो नाही, ही खेदाची बाब आहे. घुसखोरी किंवा अनधिकृत भाडेकरूंना संबंधित कर्मचाऱ्यांकडून सहकार्य होते.

२. संक्रमण शिबिरातील गाळे :

संक्रमण शिबिरात गाळे रिकामे झाले आहेत पण ते अनधिकृत भाडेकरूंनी बळकावले असल्याच्या अनेक तक्रारी येतात व या तक्रारीत काही तथ्य असल्याचे मी स्वतः पाहिले आहे. याबाबत त्यांनी कुलाबा संक्रमण शिबिराचे उदाहरण दिले. संबंधित पहारेकरी आपली ड्युटी प्रामाणिकपणे पार पाडीत नाहीत असे दिसून येते. त्यामुळे हे काम कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने किंवा तत्सम परिणामकारक उपाययोजनेतून करण्याची गरज आहे. संक्रमण शिबिरातील रिकाम्या गाळ्यांची माहिती चुकीची दिली जाते. याबाबत निश्चित उपाययोजना योजण्यासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलण्याची गरज आहे.

मास्टर लिस्ट प्रमाणे जुन्या भाडेकरूंना पुनर्रचित इमारतीत करावयाचे गाळे वाटप बहुतांशी २० ऑक्टोबर १९९० पर्यंत पूर्ण करण्यात येईल असे बैठकीत सांगण्यात आले.

मूळ गाळेधारकांची सत्यता पडताळून पाहताना अशा खऱ्या भाडेकरूंना खूपच त्रास सहन करावा लागतो असे श्री. विजय कांबळे, सभापती/मुंबई मंडळ यांनी नमूद केले.

पुनर्रचित इमारतीत पुरेसे पाणी नसेल, वीज तात्काळ उपलब्ध नसेल परंतु भाडेकरू गाळे वाटप घेण्यास तयार असतील तर अशा गाळ्यांचे वाटप त्वरेने करण्यात कोणतीच अडचण असू नये असे उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी सूचित केले.

कामातील अक्षम्य दिरंगाई, गाळ्यांची अनधिकृत प्रकरणे ज्या अधिकाऱ्यांच्या अखत्यारित झालेली आहेत त्यांचे विरुद्ध ताबडतोब

कारवाई सुरू केली पाहिजे असेही मत बैठकीत व्यक्त करण्यात आले.

पुनर्रचित इमारतीतील रिकाम्या गाळ्यातून प्राधान्याने कोणाला गाळे वाटप करावे याविषयी यापूर्वी शासनानेही काही सूचना केलेल्या होत्या त्याही तपासून पहाण्यात याव्यात. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा अंतर्भाव होता.

१) जे भाडेकरू १० वर्षांपासून संक्रमण शिबिरात रहातात.

२) ज्यांच्या इमारती होणार नाहीत.

३) जे लोक दुसऱ्या पुनर्रचित इमारतीत जाण्यास तयार आहेत, इत्यादी.

वरील बाबतीलही बैठकीत लक्ष वेधण्यात आले.

वरील स्वरुपाच्या वेगवेगळ्या अडचणी दूर करण्यासाठी पुढील स्वरुपाची उपाययोजना करण्याची गरज आहे असे उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी सूचित केले.

१) रिपेर्स, रिकन्स्ट्रक्शन आणि डिमॉलिशन यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा (ऑफिस) असावयास हवे.

२) संक्रमण शिबिरातील गाळ्यांसाठी देखील यंत्रणा निश्चित करावी.

३) मर्यादित गाळे अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली ठेवणे.

यावर श्री. मांजरेकर, सदस्य/प्राधिकरण यांनी लक्ष वेधले की, पूर्वी २०,००० गाळ्यांसाठी १७ भाडेवसूलीकार होते आता फक्त ८ भाडेवसूलीकार आहेत. सतत बदल करीत रहाण्याच्या कामाच्या पद्धतीमुळे अधिकाधिक अडचणी निर्माण होतात.

४. सोसायट्यांच्या हस्तांतरणाची (कन्व्हेयन्स) असंख्य प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. जुन्या गाळ्यांच्या किंमती निश्चित होत नाहीत. याविषयी निश्चित कार्यवाही काय योजावी याचा विचार करण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती नेमण्यात आली.

१. उपाध्यक्ष/प्राधिकरण

२. मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ

३. वित्त नियंत्रक/प्राधिकरण

४. उपमुख्य अधिकारी (मि. व्य.) - श्री. कदम - निमंत्रक

तथापि, हस्तांतरणाची एकूण किती प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांची सविस्तर माहिती उपमुख्य अधिकारी (मि. व्य.) श्री. कदम, यांनी दिनांक २६.९.१९९० रोजी अध्यक्ष/प्राधिकरण यांना सादर करावी अशा सूचना देण्यात आल्या. या माहितीची एक प्रत सभापती/मुंबई मंडळ यांनाही देण्यात यावी.

वरील समितीने तयार केलेल्या अहवालाचे आधारे माननीय मंत्री (गृहनिर्माण) यांचे उपस्थितीत एक बैठक घेण्याचे ठरविण्यात आले.

५. खातेनिहाय चौकशीची एकूण १७३ प्रकरणे आहेत त्याचाही निपटारा त्वरेने होणे आवश्यक असल्याचे माननीय मंत्री (गृहनिर्माण) यांनी सांगितले. त्याचबरोबर याविषयी उत्तम प्रशासकीय कार्यवाही योजिण्याची देखील नितांत गरज आहे असेही मंत्रीमहोदय म्हणाले.

६. महसूल विभागाला गृहनिर्माण भवनात १,५०० चौ. फूटाची जागा उपलब्ध करून देण्याविषयी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता त्वरेने होण्यासाठी मुंबई मंडळ, जागतिक बँक प्रकल्प आणि पंतप्रधान अनुदान प्रकल्प तीन कार्यालयांच्या प्रमुखांनी प्रत्येकी ५०० चौ. फूट क्षेत्रफळाची जागा तात्काळ उपलब्ध करून द्यावी अशा सूचना अध्यक्ष/प्राधिकरण यांनी दिल्या.

७. सक्षम प्राधिकारी, अपिलेट ऑफिसर यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचीही माननीय मंत्री महोदयांनी माहिती जाणून घेतली. याबाबत आवश्यक तो अधिकारी वर्ग

नेमण्याचीही गरज प्रतिपादन केली. अपिलेट अधिकारी यांचेकडे २००० प्रकरणे प्रलंबित असल्याचे सांगण्यात आले.

मंत्री महोदयांनी विचारणा केल्यावरून उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी माहिती दिली की, सुमारे २ महिन्यांपूर्वी प्राधिकरणाच्या बैठकीत ८६ जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या जागी नवीन ३० इमारती बांधण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. या प्रकल्पामध्ये उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त गाळ्यांपैकी ५०० ते ६०० गाळे ज्यांच्या इमारती होणार नाहीत व अनेक वर्षापासून जे लोक संक्रमण शिबिरात रहात आहेत त्यांना देण्याची योजना आहे व त्या खेरीज उरणारे अतिरिक्त गाळे हे गाळ्यांची मागणी करणाऱ्या वित्तीय संस्थांना देण्याची योजना आहे. याबाबत वित्तीय संस्थांच्या वरिष्ठांबरोबर नुकतीच एक बैठक घेण्यात आली असता जी.आय.सी.ने सुमारे २०० गाळे व देना बँकेने १०० गाळे विकत घेण्याची तयारी दर्शविली आहे.

वरील प्रकल्पाचे संदर्भात खाजगी मालक कदाचित स्थगिती मागण्यासाठी आले तर या प्रकल्पाचा उद्देश विशेष विचारात घेतला जावा अशी विनंती प्राधिकरणातर्फे माननीय मंत्री (गृहनिर्माण) यांना करण्यात आली.

खालील विषयावर चर्चा करण्यासाठी प्राधिकरणाची बैठक दिनांक ६.१०.१९९० रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्याचे ठरले.

१. गृहनिर्माण योजनेतील विविध वसाहतीमधील गाळ्यांचे हस्तांतरण.
२. वरील वसाहतीतील शिल्लक असलेल्या चटई क्षेत्राबाबत.
३. भाडे तत्वावर वितरित करण्यात आलेल्या बैठ्या गाळ्याची विक्री.

प्राधिकरणाच्या गाळ्यांचे संदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याकडे होणाऱ्या हिअरींगच्या वेळी विधी शाखेच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याविषयी यापूर्वी ठरलेले आहे त्याची सत्वर अंमलबजावणी सुरू करण्यात यावी अशा सूचना देण्यात आल्या.

संक्रमण शिबिराचे एकूण सुमारे २०,००० गाळे एकाच वेळी तपासून घेण्याची कार्यवाही योजावी व अनधिकृत भाडेकरूंवर कडक कारवाईची उपाययोजना करावी असेही बैठकीत सुचविण्यात आले.

नागरी जमीन कमालधारणेच्या संदर्भात असलेल्या प्रलंबित प्रकरणांबाबत लक्ष पुरविण्याविषयी मंत्री महोदयांना विनंती करण्यात आली.

पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत असलेल्या मोईवाडा येथील पुनर्बांधणी योजनेबाबत असलेल्या अडचणी जाणून घेऊन यासंदर्भात त्वरेने नगरविकास मंत्री महोदयांचे लक्ष वेधण्याचे निश्चित झाले.

वीजपुरवठा, पाणीपुरवठा व मलनि:स्सारण या सोईसुविधांचे अभावी अनेक गाळे प्रदीर्घ काळ बंद पडून राहतात याबाबतही माननीय मंत्री महोदयांनी नोंद घेतली.

मा. अध्यक्षांचे व मा. मंत्रीमहोदयांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपविण्यात आले.

**Meeting No.** 94 **Meeting Date** 06-Oct-19

**Item No.** 1 **Resolution No.** 1838

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २५ सप्टेंबर, १९९० रोजी झालेल्या ९३ व्या बैठकीचे कार्यवृत्ती स्थायी करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई आदर्शनगर, वरळी येथे पहाणी करण्यात आलेल्या नियोजित भूखंडावर (५०० चौ. मी. क्षेत्रफळ) म्हाडाची मालमत्ता म्हणून 'स्वातंत्र्य सैनिक भवनाचे' बांधकाम मुंबई मंडळामार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सैनिक भवनाचा आराखडा/अंदाजपत्रक वगैरे बाबी तयार करण्याची कार्यवाही त्वरित पूर्ण करण्यात यावी व शासनाकडून तसेच महानगरपालिकेकडून वरील प्रस्तावास मंजूरी मिळवून बांधकाम त्वरित हाती घेण्यास प्रक्रिया सुरू करावी असेही ठरविण्यात आले.

**Item No.** 2 **Resolution No.** 1839

विषय : गृहनिर्माण योजनेतील विविध वसाहतींमधील गाळ्यांच्या अभिहस्तांतरणाबाबत.

ठराव : खालील बाबतीतही मुख्यत्वे करून निर्णय घेण्यात आले.

१) अभिहस्तांतरण करण्यासाठी जर खरेदीदार भाडेकरूंनी बेकायदेशीर बांधकामे केली असतील तर त्यावरील निर्णय मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी घ्यावा. त्यांस योग्य वाटले तर अशा बांधकामासहीत इमारत सोसायटीला द्यावी व बेकायदेशीर कामे काढण्याची कार्यवाही सोसायटीने करावी. जर काही बाबतीत अशी बेकायदेशीर कामे काढून टाकावीत अशा निष्कर्षांवर मुख्य अधिकारी मुंबई मंडळ आल्यास, त्याप्रमाणे निर्णय घेण्याचा व कार्यवाही करण्याचा पूर्ण अधिकार त्यांचा असावा.

२) ज्या रहिवाश्यांनी खरेदीची पूर्ण रक्कम भरलेली आहे अशा प्रकरणी अभिहस्तांतरण कार्यवाही प्रथम करण्यात यावी.

३) कन्नमवार नगर येथील ३,००० गाळे (३५ इमारती) व त्याशिवाय इतर वसाहतीमधील रहिवाश्यांनी विक्रीची पूर्ण रक्कम भरलेली आहे परंतु सेवाशुल्काचा दर वाढविण्यात आलेला आहे व व्याजाची आकारणी केलेली आहे. यासंबंधात व्याज कमी करणे व रद्द करणे यांचे अधिकार मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांना देण्यात आलेले आहेत.

सेवा शुल्काचा दर कमी करणे अथवा व्याज कमी करण्यापूर्वी सबळ कारणे मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांना द्यावीत.

४) अकृषीकर व भुईभाडे यांच्या वसुलीसाठी व्याजाची आकारणी करण्यात येते; ही व्याजाची आकारणी कमी करणे अथवा रद्द करणे यांचे अधिकार मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांना देण्यात आलेले आहे.

हे व्याज कमी करावयाचे असल्यास सबळ कारणे मुख्य अधिकारी मुंबई मंडळ यांना द्यावीत.

५) मुंबई मंडळाबाहेर गाळ्यांची अंतिम विक्री किंमत ठरविण्यासाठी विभागवार समित्या नेमण्यात याव्यात असे ठरले. त्यांचे या समितीचे अध्यक्ष स्थानिक मंडळाचे सभापती रहातील, तसेच त्या क्षेत्रामधील प्राधिकरणाचे सदस्यही या समितीचे सदस्य रहातील. सभापती महोदयांत इतर कोणत्याही सभासदास सहयोगी करण्याचा अधिकार असेल.

६) जाहिरातीमध्ये किंवा गाळ्याचे वितरण करताना निश्चित केलेली गाळ्याची विक्री किंमत ही नंतर अंतिम व स्थायी करताना बदलण्यात येते, अशा वेळी गाळेधारक/सहकारी संस्था फरकाच्या रकमा भरण्यामध्ये वाद उत्पन्न करतात व इमारतीच्या मालकीच्या अभिहस्तांतरणासाठी पुढे येत नाहीत व अशी प्रकरणे खोळंबून रहातात. या विषयावर चर्चा झाली असता असे ठरविण्यात आले की, अशी वादग्रस्त प्रकरणे मुख्य अधिकारी यांनी पहावीत व अशा प्रकरणांचा त्यांनी फेरविचार करून निर्णय घ्यावा.

७. इमारतीच्या मालकीचे हस्तांतरणाचे काम मुंबई मंडळाकडून युद्धपातळीवर ६ महिन्यांत पूर्ण केले जाईल व त्याचा प्रगती अहवाल दर १५ दिवसांनी उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांना सादर केला जाईल.

**Item No.** 3 **Resolution No.** 1840

विषय : प्राधिकरणाच्या बहुमजली इमारतींच्या वसाहतीमधील उपलब्ध असलेल्या चटईक्षेत्राबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बहुमजली इमारतीतील उर्वरित चटईक्षेत्र वापरण्याबाबत बाब टिप्पणाच्या पृष्ठांकन ३ वर नमूद केलेल्या मुद्याचा विचार करून बहुमजली इमारतीच्या वसाहतीमधील एखाद्या फुटकळ भूखंड एकापेक्षा जास्त सहकारी संस्थांच्या जमिनीस लागून असल्यास तो कोणास द्यावा यावर मुख्य अधिकारी यांना सर्व परिस्थितीचा विचार करून निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. मुख्य अधिकारी यांचा निर्णय अंतिम असेल.

---

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : माडेतत्वावर वितरीत करण्यात आलेल्या बैठ्या गाळ्यांची विक्री करण्याबाबतचे धोरण.

ठराव :

---

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने दैनंदिन कामामध्ये वेगाने अंमलबजावणी होण्याकरिता नेमण्यात आलेल्या समित्यांची माहिती.

ठराव :

---

**Item No.** 6 **Resolution No.** 1841

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सन १९८९-९० या वित्तीय वर्षासाठी तदर्थ बोनस देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सन १९८९-९० या वित्तीय वर्षासाठी राज्य शासकीय कर्मचारी आणि इतर यांना २७ दिवसाच्या वित्तलब्धी एवढा शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना मंजूर केलेला तदर्थ बोनस प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या आदेशातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर बोनसची रक्कम अदा करण्यात यावी.
त्यानंतर मा. अध्यक्षांचे व मा. मंत्रीमहोदय ह्यांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपविण्यात आले.

**Meeting No.** 95 **Meeting Date** 03-Nov-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ६-१०-१९९० रोजी मुंबई येथे झालेल्या ९४ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1842

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्रमांक ९५४ मिरज येथील अल्प उत्पन्न गट - २ अंतर्गत १३२ गाळ्यांच्या नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून रुपये ३१.५३ (रु. एकतीस लक्ष त्रेपन्न हजार फक्त) लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 3 **Resolution No.** 1843

विषय : हुडकोकडून मंजूर झालेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ मुंबई (हुडको) यांनी विहीत केलेल्या अटींवर विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या हुडको अर्थसहाय्यित चंद्रपूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण रु. ३३.४२ लक्ष (रु. तेहतीस लक्ष बेचाळीस हजार फक्त) कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 4 **Resolution No.** 1844

विषय : खसरा क्रमांक ६१५/१, ६१५/२, ६१९/२, व ६२० मौजा नागपूर नंदनवन ले-आऊट आणि खसरा क्रमांक ९, २४, २५ ते २८ मौजा बीड पेठ, नागपूर येथील नागपूर सुधार प्रन्यासाचे विकसित भूखंड गृहनिर्माण योजनांसाठी मिळविणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे नंदनवन ले-आऊट येथील नागपूर सुधार प्रन्यासाने देऊ केलेले विकसित भूखंड क्रमांक ११२५ ते ११३५ प्रती चौ. मी. रु. ३५०/- या दराने व भूखंड क्र. ११९१ ते ११९९ प्रती चौ. मी. रु. ३२५/- या दराने प्रन्यासाकडून विकत घेण्यास व त्यावर योग्य ती योजना राबविण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 5 **Resolution No.** 1845

विषय : श्री. आर. डी. मालुष्टे, सहविधी सल्लागार, जागतिक बँक प्रकल्प यांचा पुनर्नेमणूकीचा कालावधी वाढवून देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. आर. डी. मालुष्टे, सहविधी सल्लागार, जागतिक बँक प्रकल्प यांच्या पुनर्नेमणूकीच्या सेवेचा कालावधी दिनांक १०-११-१९९० पासून ६ महिने मुदतीसाठी किंवा जागतिक बँक प्रकल्प कार्यान्वित असेपर्यंत यापैकी जो कालावधी कमी असेल तिथपर्यंत त्यांच्या नेमणूकीच्या मूळ अटी व शर्तींच्या अधीन राहून वाढविण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : विकास आराखड्यातील आरक्षणात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यासंबंधी दिलेल्या न्यायालयीन स्थगिती संदर्भात प्राधिकरणाच्या जागेवरील आरक्षण उठविण्यासाठी न्यायालयाकडे अपील करणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : भूकर पाहणी क्रमांक २४९, ताडदेव विभाग, डॉ. भडकमकर मार्ग ह्या मालमत्तेवरील इमारत क्रमांक ४५-एब्रीसी (गांजावाला कंपाउंड) च्या पुनर्विकासाकरिता 'ना हरकत' प्रमाणपत्र देण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवर विशेष कार्यकारी अधिकारी दर्जाचे पद निर्माण करणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 9 **Resolution No.** 1846

विषय : श्री. ए. एम. गोखले, उपमुख्य अधिकारी यांना सेवानिवृत्तीनंतर (३१-१०-९०) तीन महिने पुनर्नियुक्ती देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. एम. ए. गोखले यांच्या सेवानिवृत्तीमुळे (३१-१०-१९९० म. नं.) रिक्त होणाऱ्या उपमुख्य अधिकारी संवर्गातील खाजगी सचिव, अध्यक्ष/प्राधिकरण श्री. ए. एम. गोखले ह्यांना पदाच्या कामाचा अनुभव लक्षात घेऊन ह्या पदाची पर्यायी व्यवस्था होईपर्यंत दिनांक ५-११-१९९० पासून तीन महिन्यांकरिता कंत्राटी पद्धतीने, पुनर्नेमणूकीच्या अटी व शर्तींच्या अधिन राहून पुनर्नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : निर्मिती केंद्रास द्यावयाच्या प्राधिकरणाच्या जमिनीच्या अधिमूल्यांबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.** 1847

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण, वाळूंज

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार वरील प्रसिद्ध केलेल्या प्रारुप वाळूंज रचनात्मक आराखड्यांसंबंधी लोकांकडून आलेल्या सूचना व हरकती तसेच त्यांचे प्रत्यक्ष म्हणणे ऐकून घेऊन त्यावर अहवाल तयार करून प्राधिकरणाकडे सादर करण्यास्तव खालीलप्रमाणे समिती नेमण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. मा. अध्यक्ष/प्राधिकरण | अध्यक्ष |
| २. मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. | सदस्य |
| ३. श्री. व्ही. व्ही. बडवे | सदस्य |
| ४. सभापती, औरंगाबाद मंडळ | स्वीकृत सदस्य |
| ५. मुख्य अधिकारी, औरंगाबाद मंडळ | स्वीकृत सदस्य |

**Item No.** 12 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणातर्फे विकसित करण्यात आलेल्या वसाहतीमधील इमारतींना चटईक्षेत्रांतर्गत समाविष्ट न होणाऱ्या वाढीव क्षेत्राबाबत बांधकाम करण्यासाठी 'ना-हरकत' प्रमाणपत्र देण्याचे धोरण ठरविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 13 **Resolution No.** 1848

विषय : ओशिवरा, गोरेगाव येथील गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या निविदांबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मेसर्स बी. जी. शिर्के या कंत्राटदाराच्या रु. २९५/- प्रति चौ. फूट या दराने १,८२७ निवासी गाळे व १४ दुकानांचे बांधकाम करण्याची निविदा मंजूर करण्यास खालील मुद्दे विचारात घेऊन मान्यता देण्यात येते.

१. बिनव्याजी आगाऊ रक्कम प्राधिकरणातर्फे संबंधित कंत्राटदाराला द्यावयाचे मान्य करण्यात आले आहे.
२. बाकीच्या अटी आणि शर्ती या निविदाप्रमाणे राहतील हेही मान्य करण्यात आले आहे.
३. मुख्य अभियंता/मुंबई मंडळ यांनी संबंधित ठेकेदाराला प्राधिकरणाच्या सर्व अटी पूर्ण करण्यासाठी एक सविस्तर पत्र द्यावे, व त्याची अंमलबजावणी व्हावी.

**Item No.** 14 **Resolution No.** 1849

विषय : पवई येथील गृहनिर्माण महाप्रकल्प.

ठराव : बहुमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण महाप्रकल्पातील पवई येथील प्रकल्पासाठी मेसर्स बी. जी. शिर्के आणि कंपनी यांची वाटाघाटीनंतर आणखी कमी केलेल्या किंमतीची निविदा बाब टिप्पणात नमूद केलेल्या तपशिलानुसार स्वीकृत करण्यात मान्यता देण्यात येते.

**Item No.** 15 **Resolution No.** 1850

विषय : कांदिवली येथे राबविण्यात येणारा गृहनिर्माण महाप्रकल्प

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण महाप्रकल्पातील कांदिवली येथील प्रकल्पासाठी मे. अबोड कन्स्ट्रक्शन कंपनीच्या वाटाघाटीनंतर कमी केलेल्या दराची निविदा बाब टिप्पणात नमूद केलेल्या तपशिलानुसार स्वीकारण्यास मान्यता देण्यात येते.
यानंतर मा. अध्यक्षांचे उपस्थितांनी आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 96 **Meeting Date** 03-Jan-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणा दिनांक ३-११-१९९० रोजी मुंबई येथे आलेल्या ९५ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणा दिनांक ३-११-१९९० रोजी मुंबई येथे आलेल्या ९५ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.** 1851

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली मुंबई मंडळ व पुणे मंडळाच्या समापतीसाठी नवीन वाहने खरेदी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, समापती/मुंबई मंडळ व समापती/पुणे मंडळ कार्यालयीन वापरासाठी अनुक्रमे पेट्रोलवर चालणारी १ ॲम्बॉसिडर गाडी व डिझेलवर चालणारी १ ॲम्बॉसिडर गाडी खरेदी करण्यास व झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 2 **Resolution No.** 1851

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली मुंबई मंडळ व पुणे मंडळाच्या समापतीसाठी नवीन वाहने खरेदी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, समापती/मुंबई मंडळ व समापती/पुणे मंडळ कार्यालयीन वापरासाठी अनुक्रमे पेट्रोलवर चालणारी १ ॲम्बॉसिडर गाडी व डिझेलवर चालणारी १ ॲम्बॉसिडर गाडी खरेदी करण्यास व झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 3 **Resolution No.** 1852

विषय : श्री. एस. के. गांधी, लेखाधिकारी/पंतप्रधान अनुदान प्रकल्प यांच्या कंत्राटी पद्धतीवर नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. एस. के. गांधी, यांच्या सेवानिवृत्तीमुळे (दि. ३१-१-१९८९ म. नं.) रिक्त झालेल्या लेखाधिकारी, पंतप्रधान अनुदान प्रकल्प/प्राधिकरण या पदावर त्यांची दिनांक १-२-१९८९ पासून ते दिनांक ३१-१-१९९१ या दोन वर्षांच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीवरील केलेल्या पुनर्नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सन १९८९-९० या वित्तीय वर्षासाठी तदर्थ बोनस देण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **4** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सन १९८९-९० या वित्तीय वर्षासाठी तदर्थ बोनस देण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **5** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दिनांक १-७-१९९० पासून सुधारित दराने महागाई भत्ता देणे.

ठराव :

| **Item No.** | **6** | **Resolution No.** | **1853** |
|---|---|---|---|

विषय : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवर वाहन चालकाचे एक अधिसंख्य पद निर्माण करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवर रु. ९५०-२०-११५०-द. रो. - २५-१५०० या वेतनश्रेणीतील वाहन चालकाचे १ तात्पुरते अधिसंख्य पद दिनांक २-५-१९९० पासून १ वर्षाकरिता किंवा समापती/पुणे मंडळ या पदावर श्री. विठ्ठलराव लडकत आहेत तोपर्यंत, यापैकी जो कालावधी कमी असेल त्या कालावधीपर्यंत निर्माण करण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **7** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाने प्रत्यक्षपणे घरबांधणीचा कार्यक्रम राबविण्यापेक्षा खाजगी संस्थेमार्फत घरबांधणीस जमीन संपादन करून विकसित करण्याच्या कामावर भर देणे.

ठराव :

| **Item No.** | **8** | **Resolution No.** | **1854** |
|---|---|---|---|

विषय : निर्मिती केंद्रास द्यावयाच्या प्राधिकरणाच्या जमिनीच्या अधिमूल्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या दिनांक २५-४-१९८९ च्या १६६३ क्रमांकाच्या ठरावामधील क्रमांक २ चा रत्नागिरी येथील निर्मिती केंद्रासाठी द्यावयाच्या भूखंडाची किंमत गृहनिर्माण योजनेच्या लाभार्थीकडून वसूल करावी व तो भूखंड ३० वर्षाच्या मुदतीकरिता लायसेन्स पद्धतीवर देऊन व त्यासाठी दरवर्षी रु. १/- लायसेन्स फी आकारावी असे आहे. त्याऐवजी त्या जमिनीची प्रत्यक्ष किंमत व तिच्या विकासाचा खर्च एवढे अधिमूल्य आकारून ३० वर्षाच्या भाडेपट्टा कराराने वार्षिक रु. १/- नाममात्र भाडेपट्टी आकारून नेहमीच्या अटी व शर्तीवर करण्यास मान्यता देण्यात येते. अशाच प्रकारे इतर ठिकाणीही निर्मिती केंद्रासाठी द्यावयाच्या प्राधिकरणाच्या भूखंडाचे वाटप करावे यालाही मान्यता देण्यात येते.

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने ११ महिन्याच्या लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर पिठाच्या गिरणी, नित्य जीवनोपयोगी गरजेच्या वस्तूंचे स्टॉल्स इत्यादीसाठी वाटप केलेल्या भूखंडाबाबत.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : एअरसेट सहकारी गृहनिर्माण संस्थेस कोले कल्याण, सांताकुझ येथील जमीन देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.** 1855

विषय : सर्व्हे कमांक ४१ (हि) ओशिवरा, बृहन्मुंबई येथे भूखंड कमांक एच-४१ व एच-४२ मध्ये उच्च उत्पन्न गट अंतर्गत ८३ गाळे बांधणे - दोन गटात कामाचे विभाजन करून निविदा मागण्यासाठी प्राधिकरणाची मान्यता मिळण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे कमांक ४१ (हि) ओशिवरा, बृहन्मुंबई येथे भूखंड कमांक एच-४१ व एच-४२ मध्ये उच्च उत्पन्न गट अंतर्गत ८३ गाळे बांधण्याच्या कामाचे, पाईल फाऊंडेशन व सुपर स्ट्रक्चर अशा दोन गटात विभाजन करून निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 12 **Resolution No.** 1856

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनासाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रु. २१८.३० लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 13 **Resolution No.** 1857

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाचीअनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ, मुंबई (हडको) यांनी विहित केलेल्या अटींवर बाब टिप्पणास जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या हुडको अर्थसहाय्यित गडचिरोली व भंडारा जिल्ह्यातील बेघर भूमीहिनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण रु. ३.४८ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण वाळूज

ठराव :

**Item No.** 15 **Resolution No.** 1858

विषय : आदर्शनगर, वरळी, मुंबई येथे 'स्वातंत्र्य सैनिकासाठी भवन' बांधणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, 'स्वातंत्र्य सैनिक भवन' बांधण्याबाबत मुंबई महामंडळामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 16 **Resolution No.** 1859

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या व्यवस्थापन सल्लागारांना द्यावयाच्या मोबदल्याचे सुधारित अनुसूची (श्येड्यूल)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या व्यवस्थापन सल्लागारांना मिळणाऱ्या मोबदल्याच्या टप्प्यात बाब टिप्पणाच्या पृष्ठांकन ३ वर नमूद केल्याप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 17 **Resolution No.**

विषय : भूकर पाहणी क्रमांक २४९ ताडदेव विभाग, डॉ. भडकमकर मार्ग या मालमत्तेवरील इमारत क्र. ४५ - ए. बी. सी. (गांजावाला कंपाउंड) च्या पुनर्विकासाकरिता 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 18 **Resolution No.**

विषय : विकास आराखड्यातील आरक्षणात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यासंबंधी दिलेल्या न्यायालयीन स्थगिती संदर्भात प्राधिकरणाच्या जागेवरील आरक्षण उठविण्यासाठी न्यायालयाकडे अपील करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 19 **Resolution No.**

विषय : गोराई रोड (२) बोरिवली येथील बाकी राहिलेल्या भरावयाच्या कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 20 **Resolution No.** 1860

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत धारावी येथे गांधीनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी बांधण्यात येत असलेला २०० गाळ्यांच्या योजनेखाली हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, हुडकोने विहित केलेल्या अटींवर पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत धारावी पुर्नबांधणी योजनेखाली धारावी येथे गांधीनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी बांधण्यात येत असलेल्या २०० गाळ्यांच्या योजनेखाली (योजना क्रमांक ७३५२) हुडकोने क्रमांक एच/बीबी - आरवायओ/म्हाडा/७३५२/९०/७० दिनांक १९-४-१९९० च्या पत्रान्वये मंजूर केलेले रु. ४०.०० लाख कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

---

**Item No.** 21 **Resolution No.**

विषय : ९० फूट रस्ता धारावी येथे पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे चालू असलेल्या इ-१ व इ-२ प्रकारच्या पुनर्रचित इमारतींची संख्या कमी करण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 22 **Resolution No.**

विषय : नागरी नूतनीकरण योजना

कामाठीपुरा २ री व ३ री गल्ली (दुसरा टप्पा) योजनेतील पुर्नबांधणी 'ई' विभाग, इमारतींच्या बांधकामाच्या निविदा.

ठराव :

---

**Item No.** 23 **Resolution No.**

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पाखाली सर्व्हे नं. १३८, मानखुर्द येथील गलिच्छ वस्ती पुनर्वसन योजनेखाली बांधलेले गाळे अतिरिक्त गाळ्यांविषयी धोरण.

ठराव :

---

**Item No.** 24 **Resolution No.** 1861

विषय : धारावी मंजूर आराखड्यामध्ये करावयाचे फेरबदलाबाबत

धारावी येथे शाळा व महाविद्यालयाकरिता जागा देणेबाबत व इतर.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, धारावी पुनर्विकास योजनेच्या आराखड्यापर्यंत बाब टिप्पणात नमूद केलेल्या सुधारित प्रस्ताव क्रमांक ४, ५ व ६ यांना मान्यता देण्यात येते. यानंतर मा. अध्यक्षांचे उपस्थितांनी आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

---

**Item No.** 24 **Resolution No.** 1861

विषय : धारावी मंजूर आराखड्यामध्ये करावयाचे फेरबदलाबाबत

धारावी येथे श्शाळा व महाविद्यालयाकरिता जागा देणेबाबत व इतर.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, धारावी पुनर्विकास योजनेच्या आराखड्यापर्यंत बाब टिप्पणात नमूद केलेल्या सुधारित प्रस्ताव कमांक ४, ५ व ६ यांना मान्यता देण्यात येते. यानंतर मा. अध्यक्षांचे उपस्थितांनी आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 97 **Meeting Date** 18-Jan-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३-११-१९९० रोजी मुंबई येथे झालेल्या ९५ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे

ठराव :

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३-११-१९९० रोजी मुंबई येथे झालेल्या ९५ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ३ जानेवारी, १९९१ रोजी झालेल्या ९६ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 1862

विषय : श्री. बी. के. शिरगांवकर, मिळकत व्यवस्थापन/जागतिक बँक प्रकल्प यांचा कंत्राटी पद्धतीवरील पुनर्नेमणूकीचा कालावधी वाढविणे बाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. बी. के. शिरगांवकर, मिळकत व्यवस्थापन, जागतिक बँक प्रकल्प/प्रा. यांना दिनांक १६ जानेवारी, १९९१ पासून ६ महिने किंवा जागतिक बँक प्रकल्पाच्या कालावधीपर्यंत यापैकी जो कालावधी कमी असेल तोपर्यंत कंत्राटी पद्धतीने पुनर्नेमणूकीच्या पूर्वीच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 4 **Resolution No.** 1863

विषय : डॉ. ए. टी. वागळे, यांची रिटेनर पद्धतीने केलेल्या नेमणूकीची मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. ए. टी. वागळे, यांच्या रिटेनर पद्धतीने केलेल्या नेमणूकीस दिनांक १-१०-१९९० पासून ते दिनांक ३०-९-१९९१ पर्यंत एक वर्षाच्या कालावधीपर्यंत पूर्वीच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मुदतवाढीस मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 4 **Resolution No.** 1863

विषय : डॉ. ए. टी. वागळे, यांची रिटेनर पद्धतीने केलेल्या नेमणूकीची मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. ए. टी. वागळे, यांच्या रिटेनर पद्धतीने केलेल्या नेमणूकीस दिनांक १-१०-१९९० पासून ते दिनांक ३०-९-१९९१ पर्यंत एक वर्षाच्या कालावधीपर्यंत पूर्वीच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मुदतवाढीस मंजूरी देण्यात येते.

| **Item No.** | **5** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : पदोन्नतीमध्ये अत्युत्कृष्ट/उत्कृष्ट अहवाल असणाऱ्यांचा अंतर्भाव निवडसूचीमध्ये करताना ६/२ जागापर्यंतचे वरचे स्थान देण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **6** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजनेतील भूखंड क्रमांक ४७ चा श्री. अबुबकर हाजी अब्दुल्ला यांच्या नावे असलेला भाडेपट्टा श्री. के. डी. शेट्टी यांच्या नावे करणे.

ठराव :

| **Item No.** | **7** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : सोलापूर (विशेष नियोजन प्राधिकरणा - २) येथील भूखंड महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास ट्रान्सफॉर्मर व सब-स्टेशनकरिता देणे.

ठराव :

| **Item No.** | **8** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : गोराई रोड, बोरिवली (प.) येथील दुकानांच्या २२ गाळ्यांच्या इमारतींची विक्री, दि. कोकण प्रांत सहकारी बँक लि. ला करणेबाबत.

ठराव :

| **Item No.** | **9** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : सोलापूर येथील स्पेशल प्लॅनिंग ॲडमिनिस्ट्रेशनच्या अंतर्गत रस्त्याच्या पृष्ठभागावर ४० एमएम प्रिमिक्स बिटूमिनियसची (डांबरीकरण) तरतूद करण्याकरिता निविदा जप्त केलेली इसाऱ्याची रक्कम रु. १३,७०५/- मे. के. एन. मुदगल यांना परत करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **10** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : प्राधिकरणाचे १९९१-९२ चे अर्थसंकल्पिय अंदाज व सुधारित अंदाज १९९०-९१ तयार करणे

२) १९८९-९० चे वार्षिक लेखे तयार करणे.

ठराव :

| Item No. | 11 | Resolution No. | 1864 |
|---|---|---|---|

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना विभागाला तात्पुरती उचल देण्याबाबत (ब्रिजफायनान्स) (वित्तीय वर्ष - १९९०-९१ साठी)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात नमूद केलेली आर्थिक स्थिती विचारात घेता आणि मंजूरी दिलेल्या कार्यक्रमाची निकड लक्षात घेता आवश्यकतेनुसार इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमासाठी 'तात्पुरती उचल' (ब्रिज फायनान्स) म्हणून द. सा. द. शे. रु. १०/- दराने रक्कम प्राधिकरणाच्या निधीमधून उपलब्ध करून देण्यास व दिलेल्या उचल रकमेची १० वर्षांत व्याजासह इमारत दुरुस्ती व पुनर्रचना निधीतून वसूली करण्यास, त्याचप्रमाणे कार्यक्रम पूर्ण करण्यास कमी पडलेली रकमेची शासनाकडून मागणी करण्यास मंजूरी देण्यात येते.

| Item No. | 12 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : नगरपालिकांच्या गृहनिर्माण कार्यास प्राधिकरणामार्फत प्रस्ताव कार्यवाहीस येण्याचे दृष्टीने सहाय्य देणे व त्याकरिता प्रकल्पाच्या खर्चाच्या २ टक्के आकारणी लावण्याबाबत.

ठराव :

| Item No. | 13 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : गृहनिर्माण क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण विकास तसेच सुकरक (फॅसिलीटेटर) स्वरूपाची कार्यवाही करण्याकरिता संस्थेची (सोसायटी) स्थापना करणेबाबत.

ठराव :

| Item No. | 14 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या विविध योजनांसाठी वास्तुशास्त्रज्ञ व नियोजन सल्लागारांची नोंदणी करण्याबाबत.

ठराव :

| Item No. | 15 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणातर्फे विकसित करण्यात आलेल्या वसाहतीमधील इमारतींना चइटक्षेत्रांतर्गत समाविष्ट न होणाऱ्या वाढीव क्षेत्राबाबत बांधकाम करण्यासाठी 'ना-हरकत' प्रमाणपत्र देण्याचे धोरण ठरविण्याबाबत.

ठराव :

| Item No. | 16 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागातर्फे समुद्र आणि खाडी लगतच्या ५०० मी. जागेवरती विकास कामास प्रतिबंध.

ठराव :

**Item No.** 17 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणातर्फे 'मार्च ऑफ महाराष्ट्र' च्या प्रदर्शनात सहभाग घेण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 18 **Resolution No.**

विषय : झोपडपट्टी श्रेणीवाढ योजनेअंतर्गत झोपडीधारकांना पुनर्विकास करण्यासाठी परवानगी देणेबाबत.

ठराव :

**Item No.** 19 **Resolution No.** 1865

विषय : नागरी नूतनीकरण योजना :
कामाटीपुरा २ री व ३ री गल्ली (दुसरा टप्पा) योजनेतील पुनर्बांधणी 'ई' विभाग, इमारतीच्या बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत कामाटीपुरा २ री व ३ री गल्ली (दुसरा टप्पा) योजनेतील पुनर्बांधणी 'ई' विभाग ह्या इमारतीच्या कामासाठी 'मेसर्स स्वस्तीक कन्स्ट्रक्शन' यांजी अंदाजित रकमेपेक्षा (रु. ६७,६३,६२७/-) (रु. सदुसष्ट लाख त्रेसष्ट हजार सहाशे सत्ताविस फक्त) ३२.०० टक्के अधिक बोलीची निविदा मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 20 **Resolution No.** 1866

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पाखाली सर्व्हे नं. १३८, मानखुर्द येथील गलिच्छ वस्ती पुनर्वसन योजनेखाली बांधलेले गाळे. अतिरिक्त गाळ्यांविषयीचे धोरण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या सर्व्हे क. १३८ मानखुर्द येथील गलिच्छवस्ती पुनर्वसन योजनेखाली मानखुर्द-बेलापूर रेल्वे मार्गात येणाऱ्या झोपडपट्टीवासीयांसाठी बांधण्यात आलेल्या गाळ्यांचे वाटप झाल्यानंतर, वरील प्रकल्पात जे अतिरिक्त गाळे उपलब्ध होतील, त्याची बाजारभावाने बाब टिप्पणात नमूद केलेल्या पद्धतीने विक्री करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 21 **Resolution No.**

विषय : नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत इमारत क. २, २२ (कांगा बिल्डींग) 'ब' विभाग उमरखाडी टप्पा ३ (उत्तर) येथील इमारतीच्या रक्षणासाठी सहा महिन्याच्या पलिकडील कालावधीत झालेल्या पहारेकऱ्यांच्या खर्चाला मंजुरी.

ठराव :

**Item No.** 22 **Resolution No.**

विषय : एअरसेट सहकारी गृहनिर्माण संस्थेस कोले कल्याण, सांताक्रुझ येथील जमीन देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 23 **Resolution No.**

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना विभागाला वित्तीय वर्ष १९९०-९१ च्या कार्यक्रमाला कमी पडणारी रक्कम एच. डी. एफ. सी. या वित्तीय संस्थेकडून कर्जाऊ घेण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 24 **Resolution No.**

विषय : सोलापूर येथील विडी कामगारांच्या योजनेअंतर्गत गाळेधारकांकडून नियमाधीन वसुली होत नसल्यामुळे, प्राधिकरणास नुकसान होत असल्यास्तव प्राधिकरणाच्या माहितीसाठी बाब सादर.

ठराव :

**Item No.** 25 **Resolution No.**

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या दुरुस्ती व नवीकरण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव :

**Item No.** 26 **Resolution No.**

विषय : ओशिवरा येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत २८० गाळ्यांच्या बांधकामाची योजना (गट क्र. १) खालील १६० गाळ्यांच्या निविदा रद्द करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 27 **Resolution No.**

विषय : मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतीतील सामुहिक मुलभूत सुविधांमध्ये सुधारणा करणेबाबत.

मोतीलाल नगर, गोरेगाव येथील ३७०० गाळ्यांकरिता असलेल्या ए. पी. ब्लॉक्सचे डब्ल्यू. सी. मध्ये पूर्ण उद्धयन पद्धतीत रुपांतर करुन मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य मलनिःस्सारण वाहिनीला जोडणेबाबत.

ठराव :

**Item No.** 28 **Resolution No.**

विषय : नागरी नूतनीकरण योजना 'जे. पी. मार्केट', एस. एस. गायकवाड मार्ग 'सी' विभाग, टप्पा - १ इमारतीच्या जोत्यावरील बांधकामाच्या निविदा.

ठराव :

---

**Item No.** 29 **Resolution No.**

विषय : श्री. ल. रं. घाडगे, चौकशी अधिकारी यांना सचिव/प्राधिकरण या पदाचे अतिरिक्त वेतन मंजूर करणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 30 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या सर्व्हे क्र. १२० वर्सोवा येथे विकास कामे सुरू करण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 31 **Resolution No.** 1867

विषय : मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ ह्यांना भविष्य निर्वाह निधी नियम १५ व १७ अन्वये अग्रिम मंजूरीचे असलेले अधिकार त्यांच्या प्रशिक्षणाच्या कालावधीपर्यंत उपमुख्य अधिकारी (प्र)/मुंबई मंडळ यांना प्रदान करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांना भविष्य निर्वाह निधी नियम १५ व १७ अन्वये अग्रिम मंजूरीचे असलेले अधिकार त्यांच्या प्रशिक्षणाच्या कालावधीपुरते उपमुख्य अधिकारी (प्रशासन) यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 32 **Resolution No.** 1868

विषय : गोराई रोड (२), बोरीवली येथील बाकी राहिलेल्या भरावयाच्या कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मेसर्स मसीन ब्रदर्सच्या कामाच्या क्षमतेचा विचार न करता सर्वात कमी देकार असलेल्या मे. मसीन ब्रदर्सची ०.२०६ टक्के अधिक देकाराची म्हणजेच रु. ८५,७३,६००-०० ची निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येते.
विषयसूचीवरील व आयत्यावेळी विचारार्थ घेण्यात आलेले विषय संपल्यानंतर भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाचे माजी सभापती श्री. दत्तात्रय काशिनाथ उर्फ नानासाहेब कुंटे यांचे दिनांक १६ जानेवारी, १९९१ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यानिमित्त प्राधिकरणाच्या सभेत दु:खवट्याचा ठराव मांडण्यात आला. सदर ठराव श्री. ईश्वर भोसीकर, सभापती/औरंगाबाद मंडळ यांनी वाचून दाखविला तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. ठरावानंतर दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून कै. नानासाहेब कुंटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. व सदर ठराव कै. नानासाहेब कुंटे यांच्या कुटुंबियाकडे पाठविण्यात यावा, असे ठरले.

दु:खवट्याचा ठराव

श्रीयुत दत्तात्रय काशिनाथ उर्फ नानासाहेब कुंटे, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाचे माजी सभापती व विधान सभेचे माजी अध्यक्ष यांचे दिनांक १६-१-१९९१ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले, श्रीयुत कुंटे यांनी चारित्र्य संपन्न, मुल्याधिष्टीत राजकारण केले. आपल्या दीर्घ सामाजिक जीवनात त्यांनी अनेकविध जबाबदाऱ्या सांभाळल्या.
विधानसभेच्या अध्यक्षपदी असताना त्यांनी निर्भयपणे दिलेले निर्णय ऐतिहासिक असे ठरलेले आहेत. ते कुशल संसदपटू व रायगड जिल्ह्याचे सच्चे कार्यकर्ते होते.
महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाचे सभापती असताना त्यांनी गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतीतील रहिवाशांच्या विविध समस्या कुशलतेने सोडविण्यासाठी प्रयत्न केले.
श्रीयुत कुंटे यांच्या निधनाने एक कर्तबगार, वाकबगार, महान देशभक्त नेतृत्व हरपले आहे.
श्रीयुक्त नानासाहेब कुंटे यांच्या मृतात्म्यास चिरकाल शांती व सद्गती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.
कै. नानासाहेबांच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सर्व सहभागी आहोत.
यानंतर मा. अध्यक्षांचे उपस्थितांनी आभार मानल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 98 **Meeting Date** 22-Feb-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३ जानेवारी, १९९१ रोजी मुंबई येथे झालेल्या ९६ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १८ जानेवारी, १९९१ रोजी मुंबई येथे झालेल्या ९७ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 1869

विषय : पदोन्नतीमध्ये अत्यकृष्ट/उत्कृष्ट अहवाल असणाऱ्यांचा अंतर्भाव निवड सूचीमध्ये करताना ६/२ जागांपर्यंतचे वरचे स्थान देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, यापुढे शासनाच्या आदेशानुसार प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सर्व पदोन्नतीमध्ये अत्यूकृष्ट/उत्कृष्ट अहवाल असणाऱ्यांचा अंतर्भाव निवडसूचीमध्ये करताना ६/२ जागांपर्यंतचे वरचे स्थान देण्यात यावे. त्याचप्रमाणे शासकीय नियमांच्या अधीन राहून श्री. व्ही. व्ही. नावेलकर, अधीक्षक/प्राधिकरण यांचे गोपनीय अभिलेख उत्कृष्ट असल्याने त्यांना निवडसूचीत २ जागांपर्यंतचे वरचे स्थान देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 4 **Resolution No.** 1870

विषय : प्राधिकरणाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या ४ थ्या मजल्यावरील सभागृहासाठी स्लिप्ट पद्धतीने तीन वातानुकूलित यंत्रे बसविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मेसर्स फेडर्स लॉईड कंपनीकडून तीन नवीन स्लिप्ट पद्धतीची वातानुकूलीत यंत्रे बसविण्यासाठी व त्याकरिता येणाऱ्या रु. १,०९,५००/- (रु. एक लाख नऊ हजार पाचशे फक्त) या खर्चास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : श्री. ल. रं. घाडगे, चौकशी अधिकारी यांना सचिव/प्राधिकरण या पदाचे अतिरिक्त वेतन मंजूर करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.** 1871

विषय : वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दिनांक २९-४-१९८५ दि. १९-१०-१९८४ व दि. १-९-१९८७ शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे, प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांना लागू करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २९-४-१९८५, दि. १९-१०-१९८४ व दि. १-९-१९८७ मधील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती संबंधात ज्या सवलती शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय समजण्यात आल्या आहेत, त्या सर्व सवलती प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी वर्गांना लागू करण्यास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे प्राधिकरणाच्या दिनांक १-९-१९८४ च्या आदेशासोबत जोडलेल्या सहपत्र 'अ' मधील परिच्छेद ४ व ५ मध्ये बाब टिप्पणात ज्या सुधारणा करण्यात आल्या आहेत त्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 7 **Resolution No.** 1872

विषय : श्री. जी. एस. गुरव, उद्वाहक/मुंबई मंडळ यांची एक महिना जादा सेवा नियमित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. जी..एस. गुरव, सेवानिवृत्त उद्वाहक, मुंबई मंडळ यांना दिनांक ३०-६-१९९० रोजी मध्यान्ह नंतर सेवानिवृत्त करून त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरचा दिनांक १-७-१९९० ते दिनांक ३१-७-१९९० पर्यंतचा एक महिन्याच्या अधिक सेवेचा कालावधी पुर्वनियुक्ती म्हणून मानण्यात यावा. व त्या कालावधीसाठी त्यांना पुनर्नियुक्तीचे वेतन व इतर फायदे सुधारित नियमानुसार देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजनेतील भूखंड क्र. ४७ चा श्री. अबुबकर हाजी अब्दुल्ला यांच्या नावे असलेला भाडेपट्टा श्री. के. डी. शेट्टी यांचे नावे करणे.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.** 1873

विषय : सोलापूर (विशेष नियोजन प्राधिकरण - २) येथील भूखंड महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास ट्रान्सफॉर्मर व सब-स्टेशनकरिता देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास सब-स्टेशन बांधण्यासाठी ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी सोलापूर (विशेष नियोजन प्राधिकरण - २) येथे बाब टिप्पणात नमूद केलेल्या क्षेत्रफळाचा भूखंड खालील अटींच्या अधीन राहून देण्यास मान्यता देण्यात येते.

१. सोलापूर विशेष नियोजन प्राधिकरण - २ येथील भूखंड प्राधिकरणाच्या विहित धोरणानुसार ३० वर्षांच्या मुदतीने धोरणात नमूद केलेल्या अटींवर भाडेपट्ट्याने देण्यात यावा. मात्र ही भाडेपट्ट्याची मुदत गरजेनुसार विनियमातील तरतूदीप्रमाणे वाढविण्यात यावी.

२. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास सब-स्टेशनसाठी द्यावयाच्या भूखंडाची किंमत, प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमत विषयक धोरणानुसार म्हणजे जमिनीची प्रत्यक्ष किंमत, जमिनीच्या विकासाचा खर्च व त्यावरील व्याज मिळून येणारी रक्कम एवढी आकारावी व त्यावर १ टक्का दराने वार्षिक भाडेपट्टी वसूल करावी. मात्र अपवाद म्हणून ट्रान्सफॉर्मरसाठी द्यावयाचे भूखंड केवळ रु. १/- वार्षिक नाममात्र भाड्याने द्यावेत.

**Item No.** 10 **Resolution No.** 1874

विषय : गोराई रोड, बोरिवली (प.) येथील दुकानांच्या २२ गाळ्यांच्या इमारतीची विक्री दि. कोकण प्रांत सहकारी बँक लिमिटेडला करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गोराई रोड, बोरिवली (प.) येथील २२ दु[illegible] गाळ्यांची इमारत दि. कोकण प्रांत सहकारी बँकेस रु. २४.०० लक्ष रकमेस विक्री करण्यास मान्यता देण्यात येते.

सदर रक्कम एकरकमेने भरण्यास बँकेस ३० दिवसांची मुदत देण्यात यावी. जर कोकण प्रांत सहकारी बँकेने ३० दिवसांचे मुदतीत या रकमेचा भरणा केला नाही तर सहकारी बँकेचा देकार रद्द समजून हे २२ दुकानी गाळे महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळास मूळ ठरावानुसार रु. १७.०० लक्ष या किंमतीत विक्री करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : एअरमेट सहकारी गृहनिर्माण संस्थेस कोले कल्याण, सांताक्रुझ येथील जमीन देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 12 **Resolution No.** 1875

विषय : १) प्राधिकरणाचे १९९१-९२ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सुधारित अंदाज १९९०-९१.
२) १९८९-९० चे वार्षिक लेखे तयार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सन १९९१-९२ च्या अंदाजपत्रकाच्या कामासाठी प्राधिकरणाच्या वित्त नियंत्रक व अभियांत्रिकी विभागातील बाब टिप्पणात दर्शविलेल्या कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर काम करावे लागेल. अशा कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेऊन अतिरिक्त कामाचा 'विशेष भत्ता' म्हणून मोबदला देण्यासाठी त्यांच्या वेतनश्रेणीनुसार अंदाजे रु. ३७,०००/- एवढ्या खर्चास मंजूरी देण्यात येते. त्याचप्रमाणे प्रादेशिक मंडळाच्या लेखा विभागातील कर्मचाऱ्यांनाही ह्याच धर्तीवर 'विशेष भत्ता' मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 13 **Resolution No.** 1876

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना विभागाला वित्तीय वर्ष १९९०-९१ च्या कार्यक्रमाला कमी पडणारी रक्कम एच. डी. एफ. सी. या वित्तीय संस्थेकडून कर्जाऊ घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमासाठी त्या फंडामध्ये अपेक्षित असलेली जमा रक्कम विचारात घेता, कार्यक्रम पूर्ण करण्याकरिता लागणारी रक्कम रु. १० कोटी एच. डी. एफ. सी. या वित्तीय संस्थेकडून दरसाल दरशेकडा १४ दराने शासन हमीवर व शासनाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीनुसार घेण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 14 **Resolution No.** 1877

विषय : सोलापूर येथील स्पेशल प्लॅनिंग ॲडमिनीस्ट्रेशनच्या अंतर्गत रस्त्याच्या पृष्ठ भागावर ४० एच. एम. प्रिमिक्स बटुमिनियसची (डांबरीकरण) तरतूद करण्याकरिता निविदा जमा केलेली इसाऱ्याची रक्कम रु. १३,७०५/- मेसर्स के. एन. मुदगल यांना परत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात नमूद केलेले मुद्दे विचारात घेऊन मेसर्स के. एन. मुदगल, कन्स्ट्रक्शन कंपनी यांची सोलापूर येथील रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाकरिता भरलेली व पुणे मंडळाने जप्त करून महसूलात जमा केलेली इसाऱ्याची रक्कम रु. १३,७०५/- (रु. तेरा हजार सातशे पाच फक्त) महसुलामधून काढून सदर ठेकेदारास परत करण्याकरिता मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : नगरपालिकांच्या गृहनिर्माण कार्यास प्राधिकरणातर्फे प्रस्ताव कार्यवाहीत येण्याचे दृष्टीने सहाय्य देणे व त्याकरिता प्रकल्पाच्या खर्चाच्या २ टक्के आकारणी लावण्याबाबत.

ठराव :

| Item No. | 16 | Resolution No. | 1878 |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या दुरुस्ती व नवीकरण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, रामबाग कॉलनी व टीज रोड कॉलनी, नागपूर येथील अत्यल्प उत्पन्न गटांतर्गत गाळ्यांच्या दुरुस्ती व नवीकरण योजनेसाठी हुडकोकडून रु. ११.०० लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते. सदरहू कर्जासाठी व्याजाचा दर द.सा.द.शे. ६ टक्के या प्रमाणे राहील.

| Item No. | 17 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : सोलापूर येथील विडी कामगारांच्या योजनेअंतर्गत गाळेधारकाकडून नियमाधीन वसूली होत नसल्यामुळे प्राधिकरणा नुकसान होत असल्यास्तव प्राधिकरणाच्या माहितीसाठी बाब सादर.

ठराव :

| Item No. | 18 | Resolution No. | 1879 |
|---|---|---|---|

विषय : ओशिवरा येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत २८० गाळ्यांच्या बांधकामाची योजने (गट क्र. १) खालील १६० गाळ्यांच्या निविदा रद्द करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्र. ४१ (पैकी) ओशिवरा, बृहन्मुंबई येथे मध्यम उत्पन्न गटांतर्गत २८० गाळ्यांच्या बांधकामाच्या योजनेखालील गट क्र. १ मधील १६० गाळ्यांच्या निविदा रद्द करण्यास मान्यता देण्यात येते.

| Item No. | 19 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : गृहनिर्माण क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण विकास तसेच सुकरक (फॅसिलीटेटर) स्वरुपाची कार्यवाही करण्याकरिता संस्थेची (सोसायटी) स्थापना करण्याबाबत.

ठराव :

| Item No. | 20 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या विविध योजनांसाठी वास्तुशास्त्रज्ञ व नियोजक सल्लागारांची नोंदणी करण्याबाबत.

ठराव :

| Item No. | 21 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणातर्फे विकसित करण्यात आलेल्या वसाहतींमधील इमारतींना चटईक्षेत्रांतर्गत समाविष्ट न होणाऱ्या वाढीव क्षेत्राबाबत बांधकाम करण्यासाठी 'ना - हरकत' प्रमाणपत्र देण्याचे धोरण ठरविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 22 **Resolution No.**

विषय : मुंबईप्रमाणेच नागपूर, पुणे, औरंगाबाद व कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्यक्षेत्रात स्वातंत्र्य सैनिकांसाठी विश्रामगृहे बांधण्यासाठी निधीचा विचार करणे.

ठराव :

**Item No.** 23 **Resolution No.**

विषय : सर्व्हे क्र. ७ आणि ८ ब्लॉक 'सी' वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स या जमिनीच्या योजनेसाठी खाजगी वास्तुशास्त्रज्ञ नेमण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 24 **Resolution No.**

विषय : केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागातर्फे समुद्र आणि खाडी लगतच्या ५०० मीटर जागेवरती विकास कामास प्रतिबंध.

ठराव :

**Item No.** 25 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणातर्फे 'मार्च ऑफ महाराष्ट्र' च्या प्रदर्शनात सहभाग घेण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 26 **Resolution No.**

विषय : झोपडपट्टी श्रेणीवाढ योजनेअंतर्गत झोपडीधारकांना पुनर्विकास करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 27 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या सर्व्हे नं. १२०, वर्सोवा येथे विकास कामे सुरू करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 28 **Resolution No.** 1880

विषय : नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत इमारत क्र. २, २२ (कांगा बिल्डिंग) 'ब' विभाग उमरखाडी, टप्पा - ३ (उत्तर) येथील इमारतीच्या रक्षणासाठी सहा महिन्यांच्या पलिकडील कालावधीत झालेल्या पहारेकऱ्यांच्या खर्चाला मंजूरी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, उपरोक्त इमारतीच्या रक्षणासाठी दिनांक १.१०.१९८९ पासून दिनांक ३१.३.१९८१ पर्यंत या सहा महिन्यांपलिकडील कालावधीत होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 29 **Resolution No.** 1881

विषय : नागरी नूतनीकरण योजना 'अे. पी. मार्केट' एस. एस. गायकवाड मार्ग, 'सी' विभाग टप्पा - १ इमारतीच्या जोत्यावरील बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, नागरी नूतनीकरण योजना 'अे. पी. मार्केट', एस. एस. गायकवाड मार्ग, 'सी' विभाग, टप्पा - १ इमारतीच्या जोत्यावरील बांधकामासाठी मेसर्स साय कन्स्ट्रक्शन कंपनीची अंदाजित रकमेपेक्षा (रु. ६०,३६,४३९) २६.९ प्रतिशत अधिक बोलीची निविदा स्वीकृत करण्यास मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 30 **Resolution No.** 1882

विषय : सर्व्हे क्र. ३४३ (भाग) येथे नियोजित २४० गाळ्यांचे बांधकाम करण्यासाठी निविदा (फेज-२, भाग-१).

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्र. ३४३ (भाग) धारावी, कल्याणवाडी येथे नियोजित २४० गाळ्यांचे बांधकाम करण्यासाठी (फेज-२, भाग-१) मेसर्स सहानी कन्स्ट्रक्शन कंपनी यांची रु. १,०४,०४,२१३.०० (रु. एक कोटी चार लक्ष चार हजार दोनशे तेरा फक्त) ची बोली स्वीकृत करण्यास मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 31 **Resolution No.** 1883

विषय : नागरी नूतनीकरण योजना

१८-२२-२६-३० अंधार चाळ, अनंत गणपत पवार मार्ग/लेन, (टप्पा-१) योजनेतील पुनर्बांधणी 'ई' विभाग इमारतीच्या बांधकामाच्या निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, अंधार चाळीतील नागरी नूतनीकरण योजनेचे रु. ९४,४०,०१६/- इतकी अंदाजित रक्कम अधिक ४.६८ प्रतिशत जादा किंमतीचे काम मे. राहूल कन्स्ट्रक्शन कंपनीला बाब टिप्पणात त्यांनी मान्य केलेल्या टेकारासह मंजूर करण्यात येत आहे.

**Item No.** 32 **Resolution No.**

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत 'जरीवाला चाळ' डॉ. मडकमकर मार्ग, येथील नागरी नूतनीकरण योजनेच्या टप्पा-२ च्या कामाबाबत.

ठराव :

**Item No.** 33 **Resolution No.**

विषय : ९० फूट रस्ता, धारावी येथे पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे चालू असलेल्या इ-१ व इ-२ प्रकारच्या पुनर्रचित इमारतींची संख्या कमी करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 34 **Resolution No.** 1884

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्प विभागात वयोमर्यादेबाहेर नेमलेल्या काही कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीस मंजूरी देण्याबाबत व या नेमणूका सन १९९१-९२ मध्ये पुढे चालू ठेवण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात नमूद केलेले स्पष्टीकरण पंतप्रधान अनुदान प्रकल्प विभागातील कामकाजाचे हित लक्षात घेऊन खालील अधिकारी/कर्मचारी यांच्या कंत्राटी पद्धतीने केलेल्या नेमणूकीस दिनांक १.३.१९९१ पासून पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येते.

१. श्री. आर. बा. संख्ये कार्यकारी अभियंता
२. श्री. व्ही. के. पाटील कार्यकारी अभियंता
३. श्रीमती ठबासिंग वास्तुशास्त्रज्ञ
४. कु. व्ही. एम. राऊळ वरिष्ठ लिपिक (लेखा विभाग)

मूळ विषयसूचीवरील प्रस्ताव संपल्यानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने पुरवणी विषयसूचीवरील प्रस्ताव आयत्यावेळी प्राधिकरणाच्या विचारार्थ घेण्यात आले.

**Item No.** 35 **Resolution No.** 1885

विषय : वर्सोवा सर्व्हे नं. १२० आणि मुलुंड सर्व्हे नं. ३८६ या क्षेत्राच्या कंत्राटदारास मालमत्तेच्या देखरेखीच्या क्षेत्ररक्षण व पहारा करण्याच्या कामाचा मोबदला पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, रक्षण व पहारा करण्यासंबंधीची कालमर्यादा पुढील सहा महिन्यांसाठी म्हणजेच दिनांक १.४.१९९१ पासून दिनांक ३०.९.१९९१ पर्यंत वर्सोवा सर्व्हे नं. १२० क्षेत्रासाठी व दिनांक १४.२.१९९१ पासून दिनांक १३.८.१९९१ पर्यंत मुलुंड सर्व्हे नं. ३८६ या क्षेत्रासाठी वाढविण्यास मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 36 **Resolution No.** 1886

विषय : श्री. एन. एन. जोशी, सेवानिवृत्त सक्षम प्राधिकारी/प्राधिकरण यांची कंत्राट पद्धतीवर नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. एन. एन. जोशी यांची शासनाच्या अधिसूचनेनुसार सक्षम प्राधिकारी/प्राधिकरण या पदावर प्रारंभी १ वर्षाच्या कालावधीसाठी बाब टिप्पणीत नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार दिनांक २३.१.१९९१ पासून (म.पू.) पुनर्नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 37 **Resolution No.** 1887

विषय : श्री. व्ही. बी. गुंजोटीकर, अपील अधिकारी यांची कंत्राटी पद्धतीवर पुनर्नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. व्ही. बी. गुंजोटीकर यांची शासनाच्या अधिसूचनेनुसार अपील अधिकारी/प्राधिकरण या पदावर प्रारंभी १ वर्षाच्या कालावधीसाठी बाब टिप्पणात नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार दिनांक ९.११.१९९० पासून पुनर्नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 38 **Resolution No.** 1888

विषय : प्राधिकरणाच्या आस्थापनेवर भूमी-संपादन अधिकारी यांची तीन पदे प्रतिनियुक्तीवर घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील राखीव असलेल्या कार्यकारी अभियंता संवर्गातील ५ पदांपैकी ३ पदांची श्रेणी कमी करून त्यांचे रुपांतर 'भूमी-संपादन' अधिकारी या पदात करण्यास व भूमी-संपादन अधिकाऱ्यांची ३ पदे प्रथम एक वर्षासाठी निर्माण करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 39 **Resolution No.** 1889

विषय : श्री. ए. एम. गोखले, खाजगी सचिव, अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या कंत्राटी नेमणूकीचा कालावधी वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. ए. एम. गोखले, खाजगी सचिव, अध्यक्ष/प्राधिकरण यांना दिनांक ५.२.१९९१ पासून दिनांक ४.५.१९९१ पर्यंत या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीच्या पुनर्नेमणूकीच्या पूर्वीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यात मान्यता देण्यात येते.

**Item No.** 40 **Resolution No.** 1890

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता या पदावर कायम स्वरुपात सामावून घेण्यासाठी श्री. एम. ए. जेकब, मुख्य अभियंता, प्रं. प्र. अ. प्र. यांच्या विकल्पाबाबत.

ठराव : बहुमताने (६ विरुद्ध १) निर्णय घेतला की, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागातील प्राधिकरणात प्रतिनियुक्तीवर असलेले श्री. एम. ए. जेकब यांना मुख्य अभियंता या संवर्गात प्राधिकरणाच्या सेवेत कायम स्वरुपात सामावून घेण्यास मान्यता देण्यात येते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाची संजूरी घेण्यात यावी, असेही ठरविण्यात आले.

**Item No.** 41 **Resolution No.**

विषय : 'तुमचे घर तुम्ही स्वतःच मिळवा' या अल्प उत्पन्न गट योजनेअंतर्गत वधवली, चेंबूर येथील अनधिकृत गाळेधारकांना नियमित करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **42** | **Resolution No.** | **1891** |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ, मुंबई (हुडको शाखा) यांनी विहित केलेल्या अटींवर बाब टिप्पणास जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या हुडको अर्थसहाय्यित अकोला व रायगड जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण ३२.२२ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

| **Item No.** | **43** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्प, नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत पुनर्रचित 'कांगा' इमारत, उमरखाडी येथील दुकानाच्या वितरणाबाबत.

ठराव :

**Item No.** 44 **Resolution No.** 1892

विषय : ज्ञानेश्वर नगर-शिवडी, वडाळा येथील माडेकरूंच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, ज्ञानेश्वर नगर-शिवडी, वडाळा येथील तूर्त ८० माडेकरूंच्या नियोजित ज्ञानेश्वरनगर, रामन सहकारी गृहनिर्माण संस्थेस अंदाजे ३५१०.३६ चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड आणि रस्त्याखालील जागेचे क्षेत्रफळ ६०७.६८ चौ. मी. गृहनिर्माण योजना राबविण्यास खालील अटींच्या अधीन राहून वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.

१. जमीन आणि रस्त्याखालील जागेच्या चटईक्षेत्र निर्देशकांसाठी प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतविषयक धोरणानुसार अधिमूल्य आकारावे.
२. अधिमूल्याच्या रकमेवर दरवर्षी २.५ टक्के दराने भाडेपट्टी आकारण्यात यावी.
३. जमीन पोटभाड्याने देण्याच्या संबंधात भाडेपट्ट्याच्या इतर अटी लागू राहतील.
४. या भूखंडावर ८० माडेकरूंची निवासी व्यवस्था करून बैठे गाळे रिकामे करून घ्यावयाची जबाबदारी सहकारी संस्थेवर राहील.
५. ८० बैठ्या गाळेधारकांच्या ज्ञानेश्वर नगर रामन सहकारी गृहनिर्माण संस्थेला देऊ केलेल्या जागेवर बांधकाम केल्यानंतर सहकारी गृहनिर्माण संस्थेने ८० बैठ्या गाळ्यांमध्ये राहणाऱ्या गाळेधारकांना म्हणजेच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांनाच नवीन इमारतीत पर्यायी जागा दिली पाहिजे. अन्य व्यक्तींना जागा देता कामा नये. त्याचप्रमाणे रु. ५/- च्या स्टॅम्प पेपरवर सहकारी गृहनिर्माण संस्थेने स्वतः त्याचप्रमाणे प्रत्येक सभासदाकडून हमीपत्र सोसायटीने घ्यावे व ते मुंबई मंडळाकडे सादर करावे.
६. सहकारी गृहनिर्माण संस्थेने बांधलेल्या जागेमध्ये सभासदांना गाळ्याचा ताबा दिल्यानंतर बैठ्या गाळ्याचा ताबा कोणत्याही अटी व शर्ती न घालता मुंबई मंडळाला परत करावा लागेल. सदरहू गाळ्यांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची विक्री हस्तांतरण अन्य व्यक्तींना करता येणार नाही. वरील दोन्ही अटी हमीपत्रात नमूद करण्यात याव्यात.

मूळ विषयसूचीवरील व पुरवणी सूचीवरील विषय संपल्यानंतर महाराष्ट्र गृहनिर्माण सहकारी संघटनेने दिनांक १६.२.१९९१ चे पत्र प्राधिकरणाच्या माहितीसाठी ठेवण्यात आले, त्याची नोंद घेण्यात आली.
सर्वसाधारणपणे चर्चा करताना शरद दिघे, समितीचा अहवाल हा दुरुस्ती व पुनर्बांधणीसाठी अग्रक्रमाने पुणे, नागपूर आणि मुंबई उपनगरात मुंबई आयलँडप्रमाणे लागू करण्यात यावा. यासाठी शासनाने पत्र पाठविण्यात यावे, असे अध्यक्ष/प्राधिकरण यांनी सुचविले. मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनी या संदर्भात पुढील कार्यवाही करावी, असे ठरविण्यात आले.
यानंतर मा. अध्यक्षांचे उपस्थितांनी आभार मानल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** Special **Meeting Date** 28-Feb-19

**Item No.** 1 a **Resolution No.** 1893

विषय :

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, ठराव क्र. १८९०, दिनांक २२.२.१९९१ नुसार श्री. जेकब यांना प्राधिकरणाच्या सेवेत सामावून घेण्याचा घेतलेला रद्दबातल करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच श्री. जेकब यांनी पंतप्रधान अनुदान प्रकल्पामध्ये जी प्रशंसनीय सेवा बजावली आहे, त्याची नोंद प्राधिकरणाने घेतली. त्याप्रमाणे केंद्र सरकारला कळविण्यात यावे, असे ठरले.

दिनांक २२.२.१९९१ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ९८ व्या बैठकीचे कार्यवृत्त तयार नसल्याने, बैठकीत सादर करण्यात आले नाही. सबब त्यावर चर्चा होऊ शकली नाही.

**Item No.** 1 **Resolution No.** 1894

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन १९९०-९१ चा सुधारित व सन १९९१-९२ चा अर्थसंकल्प.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९९०-९१ या सुधारित व सन १९९१-९२ च्या अर्थसंकल्पास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 2 **Resolution No.** 1895

विषय : कर्मचारी आकृतीबंध

प्राधिकरण व संचालनालये यांच्याकरिता कर्मचारीवर्ग अनुसूची सन १९९१-९२.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या वितरण प्रपत्रामध्ये दर्शविण्यात आलेल्या सन १९९१-९२ या वित्तीय वर्षाकरिता प्रस्तावित करण्यात आलेल्या कर्मचारी आकृतीबंधाच्या अनुसूचीला मंजूरी देण्यात येते. त्याचप्रमाणे कर्मचारी अनुसूचीची अंमलबजावणी करताना कोणत्याही पदाची श्रेणीवाढ किंवा श्रेणी कमी करणे, पदे वळती करणे व त्यामध्ये किरकोळ बदल आवश्यक ठरल्यास ते करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यास मान्यता देण्यात येते.

यानंतर उपस्थितांचे माननीय अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Item No.** **2** **Resolution No.** **1895**

विषय : कर्मचारी आकृतीबंध

प्राधिकरण व संचालनालये यांच्याकरिता कर्मचारीवर्ग अनुसूची सन १९९१-९२.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या वितरण प्रपत्रामध्ये दर्शविण्यात आलेल्या सन १९९१-९२ या वित्तीय वर्षाकरिता प्रस्तावित करण्यात आलेल्या कर्मचारी आकृतीबंधाच्या अनुसूचीला मंजूरी देण्यात येते. त्याचप्रमाणे कर्मचारी अनुसूचीची अंमलबजावणी करताना कोणत्याही पदाची श्रेणीवाढ किंवा श्रेणी कमी करणे, पदे वळती करणे व त्यामध्ये किरकोळ बदल आवश्यक ठरल्यास ते करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यास मान्यता देण्यात येते.
यानंतर उपस्थितांचे माननीय अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| **Meeting No.** | **99** | **Meeting Date** | **08-Mar-19** |
| **Item No.** | **17 a** | **Resolution No.** | **1905** |

विषय :

ठराव : एकमताने खालील निर्णय घेतले,

१/- प्राधिकरणाच्या मालकीच्या मुंबई शहरातील ज्या जमिनीवर गलिच्छ वस्त्यांच्या झोपडपट्ट्या वसलेल्या आहेत, त्यांची तपशीलवार तपासणी करण्यात यावी. झोपडपट्टीचे सर्वेक्षण त्वरित हाती घेण्यात यावे, व हे काम दि. २४ मार्च, १९९१ पर्यंत पूर्ण करण्यात यावे. जागतिक बँक प्रकल्पामार्फत याबाबतची कार्यवाही थोड्याफार प्रमाणात करण्यात आली असून यथोचित माहिती गोळा करण्यात आली आहे, असे समजते. तरीसुद्धा त्याची पुन्हा फेरतपासणी करण्यात यावी, असे सुचविण्यात आले. तपासणीचे कार्य सर्वदृष्टीने परिपूर्ण असावे व त्यांचा अंतिम अहवाल २४ मार्च १९९१ पर्यंत पूर्ण करून सादर करावा.

२/- दिनांक १.५.१९९१ या महाराष्ट्र दिनी अशा प्रकारची योजना कार्यान्वित व्हावी.

३/- सुधारित डी. सी. रेग्युलेशनप्रमाणे चटईक्षेत्र निर्देशकात वाढ करून मिळाल्यामुळे या वाढीव निर्देशकांनुसार झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याची योजना राबविताना सध्याच्या रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात आल्यानंतर जो चटईक्षेत्र निर्देशक शिल्लक राहील, त्याचे बाजारभावाने विक्री करण्याबाबत शासनाकडून जरूर ते आदेश मागविण्यात यावेत.

४/- या योजनेनुसार पुनर्रचित करण्यात आलेल्या गाळ्यांचे सुधारित डी. सी. विनियमाप्रमाणे बांधकाम करण्यात यावे व सदर गाळा हा रु. २५००/- या किंमतीच्या सुलभ हप्त्याने देण्यात यावा.

५/- प्राधिकरण पुढे असाही निर्णय घेते की, ही संपूर्ण योजना मुख्य अभियंता/जागतिक बँक प्रकल्प यांचे अधिपत्याखाली राबविण्यात यावी व त्यासाठी त्यांच्या दिमतीला विशेष अधिकारी वर्ग देण्यात यावा.

यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Item No.** 17 a **Resolution No.** 1905

विषय :

ठराव : एकमताने खालील निर्णय घेतले,

१/- प्राधिकरणाच्या मालकीच्या मुंबई शहरातील ज्या जमिनीवर गलिच्छ वस्त्यांच्या झोपडपट्ट्या वसलेल्या आहेत, त्यांची तपशीलवार तपासणी करण्यात यावी. झोपडपट्टीचे सर्वेक्षण त्वरित हाती घेण्यात यावे, व हे काम दि. २४ मार्च, १९९१ पर्यंत पूर्ण करण्यात यावे. जागतिक बँक प्रकल्पामार्फत याबाबतची कार्यवाही थोड्याफार प्रमाणात करण्यात आली असून यथोचित माहिती गोळा करण्यात आली आहे, असे समजते. तरीसुद्धा त्याची पुन्हा फेरतपासणी करण्यात यावी, असे सुचविण्यात आले. तपासणीचे कार्य सर्वदृष्टीने परिपूर्ण असावे व त्यांचा अंतिम अहवाल २४ मार्च १९९१ पर्यंत पूर्ण करून सादर करावा.

२/- दिनांक १.५.१९९१ या महाराष्ट्र दिनी अशा प्रकारची योजना कार्यान्वित व्हावी.

३/- सुधारित डी. सी. रेग्युलेशनप्रमाणे चटईक्षेत्र निर्देशकात वाढ करून मिळाल्यामुळे या वाढीव निर्देशकांनुसार झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याची योजना राबविताना सध्याच्या रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात आल्यानंतर जो चटईक्षेत्र निर्देशक शिल्लक राहील, त्याचे बाजारभावाने विक्री करण्याबाबत शासनाकडून जरूर ते आदेश मागविण्यात यावेत.

४/- या योजनेनुसार पुनर्रचित करण्यात आलेल्या गाळ्यांचे सुधारित डी. सी. विनियमाप्रमाणे बांधकाम करण्यात यावे व सदर गाळा हा रु. २५००/- या किंमतीच्या सुलभ हप्त्याने देण्यात यावा.

५/- प्राधिकरण पुढे असाही निर्णय घेते की, ही संपूर्ण योजना मुख्य अभियंता/जागतिक बँक प्रकल्प यांचे अधिपत्याखाली राबविण्यात यावी व त्यासाठी त्यांच्या दिमतीला विशेष अधिकारी वर्ग देण्यात यावा.

यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

---

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २२.२.१९९१ रोजी मुंबई येथे झालेल्या ९८ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजनेतील भूखंड क्रमांक ४७ चा श्री. अबुबकर हाजी अब्दुला यांच्या नावे असलेला भाडेपट्टा श्री. के. डी. शेट्टी यांच्या नावे करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजनेतील भूखंड क्रमांक ४७ चा श्री. अबुबकर हाजी अब्दुला यांच्या नावे असलेला भाडेपट्टा श्री. के. डी. शेट्टी यांच्या नावे करणे.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : एअरसेट सहकारी गृहनिर्माण संस्थेस कोले कल्याण, सांताक्रुझ येथील जमीन देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.** 1896

विषय : 'तुमचे घर तुम्ही स्वतःच मिळवा' या अल्प उत्पन्न गट योजनेअंतर्गत वधवली, चेंबूर येथील अनधिकृत गाळेधारकांना नियमित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, 'तुमचे घर तुम्ही स्वतःच मिळवा' या अल्प उत्पन्न गट योजनेअंतर्गत असलेली ही घरे मंडळाने भूखंडासहित अर्जदारास वितरित करून त्यांचे विक्रीखत करून प्रत्येक घरमालकास कर्ज देऊन गहाणखत करून त्यांची संपूर्ण कर्जफेड झालेली असल्याचे लक्षात घेता गहाणखते मुक्त करून प्रत्यांतरण पत्र विलेख अंमलात आणण्यापूर्वी या योजनेतील सध्याच्या घरमालकास तसेच इतर व सहकारी संस्थांना (सध्याच्या घराचे वाढीव आकारमान विचारात घेऊन) चालू बाजारभावाच्या १० टक्के अधिमूल्य आकारून वारसा हक्काद्वारे करण्यास रु. १०००/- अधिमूल्य आकारून हस्तांतरणे नियमित करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : सोलापूर येथील विडी कामगारांच्या योजनेअंतर्गत गाळेधारकांकडून नियमाधीन वसूली होत नसल्यामुळे प्राधिकरणास नुकसान होत असल्यास्तव प्राधिकरणाच्या माहितीसाठी बाब सादर.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.** 1897

विषय : प्राधिकरणाच्या विकसित करण्यात आलेल्या वसाहती मधील इमारतींना चटई क्षेत्रांतर्गत समाविष्ट न होणाऱ्या वाढीव क्षेत्राबाबत बांधकाम करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे धोरण ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणातर्फे बांधण्यात आलेल्या इमारतींमधील रहिवाशांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्या सहकारी संस्थांना चटईक्षेत्रामध्ये अंतर्भूत न होणारे बांधकाम हाती घेण्यास बाब टिप्पणामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यास मान्यता देण्यात येते. असे ना हरकत प्रमाणपत्र देताना प्रशासकीय बाबींवर होणारा खर्च वसूल व्हावा आणि सदर प्रकरणांची जरूर ती छाननी व्हावयास हवी. या दृष्टीने खालील पद्धत अवलंबिणे योग्य ठरेल.

१. इच्छुक सहकारी संस्थेने चटईक्षेत्रात अंतर्भूत न होणारे बांधकाम स्वखर्चाने विकास नियंत्रण नियमानुसार महानगरपालिकेची परवानगी मिळवून हाती घेण्याबाबतचा ठराव सर्वसाधारण सभेत केल्यानंतर त्याच्या प्रती सोबत मंडळाकडे ना हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा.

२. मिळकत व्यवस्थापन विभागामार्फत सदर अर्जाची प्राथमिक छाननी करावी, तद्नंतर तांत्रिक छाननी तांत्रिक विभागाने करावी. त्यामध्ये खालील दरानुसार शुल्क वसूल करण्यात यावे.

३. निवासी उपयोगाखाली क्षेत्राकरिता रु. १००/- प्रति चौ. मी. अथवा त्याचा भाग आणि अशा प्रत्येक प्रस्तावासाठी कमाल शुल्क रु. २,०००/- इतके असावे.

अनिवासी व व्यापारी उपयोगाखालील क्षेत्राकरिता रु. ५००/- प्रति चौ. मी. अथवा त्याचा भाग आणि अशा प्रत्येक प्रस्तावासाठी किमान शुल्क रु. ५,०००/- इतके असावे.

टीप :-

सदर दरांमध्ये दरवर्षी १० टक्के वाढ करण्याची आवश्यकता आहे काय याची छाननी मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी वर्षाचे सुरुवातीस म्हणजेच एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात करून तद्नुसार सुधारित शुल्क आकारण्याचे आदेश जारी करावेत. ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकारी मंडळाचे मुख्य अधिकारी यांना राहतील.

४/- सदर ना हरकत प्रमाणपत्रामध्ये इमारतीचे सध्याचे क्षेत्र, उपलब्ध बाल्कनीकरिता प्रस्तावित क्षेत्र बांधकामाचा भाग पाडावयाचा असल्यास त्याखालील क्षेत्र, बांधकामाचा भाग पुन्हा बांधावयाचा असल्यास त्याखालील क्षेत्र, नवीन अथवा प्रस्तावित बांधकामाचे उपयोगावर क्षेत्र (प्रत्येक उपयोगासाठी स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावेत.) तसेच ना हरकत प्रमाणपत्र एकूण क्षेत्राकरिता देण्यात आले आहे इत्यादी बाबींचा स्पष्ट उल्लेख असावा.
तसेच सदर ना हरकत प्रमाणपत्र चटईक्षेत्राच्या गणनेत अंतर्भूत न होणाऱ्या बाबींबाबत असल्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

५/- ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर महानगरपालिकेकडून परवानगी मिळविण्याची जबाबदारी सर्वस्वी सहकारी संस्थेची राहील. अशा परवानगीची एक प्रत

सदर सहकारी संस्थेने मंडळास देणे आवश्यक राहील. सदर बांधकामाबाबत सदर सहकारी संस्था सर्व प्रकारे जबाबदारी राहील आणि मंडळावर कोणतीही जबाबदारी राहणार नाही अशा आशयाचे कायदेशीर हमीपत्र सदर सहकारी संस्थेने देणे आवश्यक आहे. महानगरपालिकेकडे याबाबत जरूर ते सर्व शुल्क भरावयाची जबाबदारी सदर सहकारी संस्थेची राहील आणि मंडळाकडे भरणा केलेल्या शुल्काचा कोणताही संबंध राहणार नाही.

६/- सदर सहकारी संस्थेस चटई क्षेत्रामध्ये अंतर्भूत होणारे कोणतेही बांधकाम वर प्रस्तावित बांधकामासोबत हाती घ्यावयाचे असल्यास दोन्ही बांधकामाबाबत स्वतंत्र परवानगी मिळविणे आवश्यक राहील आणि सदर प्रकरणी स्वतंत्र नकाशे सादर करणे अनिवार्य राहील.

७/- अशा प्रकारचे बांधकाम वैयक्तिक वापरासाठी देण्यात आलेल्या भूखंडाचे संदर्भात हाती घ्यावयाचे झाल्यास सहकारी संस्थेऐवजी संबंधित लाभधारकाने सदर कार्यवाही पुरी करणे आवश्यक राहील.

**Item No.** **7** **Resolution No.**

विषय : केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागातर्फे समुद्र आणि खाडी लगतच्या ५०० मीटर जागेवरती विकास कामास प्रतिबंध.

ठराव :

**Item No.** **8** **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या सर्व्हे नं. १२०, वर्सोवा येथे विकास कामे सुरू करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** **9** **Resolution No.** **1898**

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्प नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत पुनर्रचित इमारत, उमरखाडी येथील दुकानांच्या वितरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर दुकानदारांचे शिल्लक राहिलेल्या क्षेत्रफळाचे गाळे उमरखाडी टप्पा-४ (उत्तर) येथे बांधण्यात येऊन सदर दुकानदारांना वितरित करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** **10** **Resolution No.**

विषय : बालविकास विद्यामंदिर या संस्थेला मेघवाडी, जोगेश्वरी येथे देण्यात आलेल्या भूखंडाच्या अधिमूल्यावरील भरपाईची रक्कम कमी करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **11** | **Resolution No.** | **1899** |
|---|---|---|---|

विषय : मोतीलाल नगर, गोरेगाव या वसाहतीमधील ए. पी. ब्लॉक तोडून नवीन संडास बांधून भुयारी गटारे बांधणे व ती महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेस जोडणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मोतीलाल नगर, गोरेगाव या मुंबई मंडळाच्या वसाहतीतील ए. पी. ब्लॉक तोडून नवीन संडास बांधून भूमिगत गटारे योजना राबविण्याचा कामाच्या मे. चंदू कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या निविदेत दाखविलेल्या अंदाजित रकमेच्या (रु. २,२८,४७,५००/-) वाटाघाटीने आलेल्या १७ टक्के जास्त दराची (सतरा टक्के अधिक) म्हणजेच १९९०-९१ दरसूचीवर २.३७ टक्के कमी दराची निम्नतम निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येते. वाटाघाटीने आलेली निविदेची किंमत रु. २,६७,३१,५७५/- (रुपये दोन कोटी सदुसष्ट लाख एकतीस हजार पाचशे पंचाहत्तर फक्त) एवढी राहील.

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | **1900** |
|---|---|---|---|

विषय : सी. टी. एस. क्रमांत २०२७१ औरंगाबाद गृहनिर्माण भवन, औरंगाबाद जवळ उच्च उत्पन्न गटातील २४ गाळे बांधणे

निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सी. टी. एस. क्रमांक २०७२१ औरंगाबाद गृहनिर्माण भवन, औरंगाबाद जवळ उच्च उत्पन्न गटातील २४ गाळे बांधण्याच्या मे. अब्दुल मजीद आणि कंपनी यांच्या निविदेत दर्शविलेल्या रु. २९,९३,८६२ किंमतीपेक्षा १४.९५ टक्के अधिक (चौदा पूर्णांक पंच्याण्णव टक्के) दराच्या म्हणजेच १९९०-९१ दरसूचीवर ३.९० टक्के अधिक (तीन पूर्णांक नव्वद टक्के) दराची निम्नतम निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येते. निविदेची एकूण किंमत रु. ३४,४१,४४४/- (रु. चौतीस लक्ष एक्केचाळीस हजार चारशे चव्वेचाळीस फक्त) राहील.

| **Item No.** | **13** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्प योजनेअंतर्गत नागरी नूतनीकरण इमारत क्र. २५-२७, ३१-३३, उमरखाडी 'ब' विभाग टप्पा-३ (उत्तर) (भाग) या इमारतींच्या निविदांमध्ये एस्कलेशनचा अंतर्भूत करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **14** | **Resolution No.** | **1901** |
|---|---|---|---|

विषय : श्री. गुरुकृपा सह. गृ. नि. संस्था व निटी कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था यांना शासनाच्या स्वेच्छा निर्णयानुसार २ टक्के भूखंडाचे वाटप करण्याबाबत.

ठराव : असे ठरविले की, श्री. गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था व निटी कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था यांना शासनाने देऊ केलेल्या भूखंड क्रमांक एच-११ व एच-१२ बाबत शासनाचे जे अभिप्राय मागितले आहेत, ते बाब टिप्पणात नमूद केल्याप्रमाणे कळविण्यात यावेत.

**Item No.** **15** **Resolution No.** **1902**

विषय : विदर्भ मंडळाने सन १९६७-६८ ते १९७०-७१ मध्ये बँकेत गुंतवणूक केलेल्या रकमेवरील व्याजातून बँकेचे परस्पर वसूल केलेले आयकर रु. ५९,५२९/- परत न मिळाल्याने निर्लेखित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात नमूद केल्याप्रमाणे विदर्भ मंडळाने १९६७-६८ ते १९७०-७१ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीवरील व्याजातून बँकेने परस्पर वसूल केलेले आयकर रु. ५९,५२९/- (रुपये एकोणसाठ हजार पाचशे एकोणतीस फक्त) आता आयकर खात्याकडून परत मिळणे अशक्य असल्यामुळे सदर रक्कम वार्षिक लेखामधून निर्लेखित करण्यास मंजूरी देण्यात येते.

**Item No. 16 Resolution No. 1903**

विषय : प्राधिकरणाच्या विविध योजनांसाठी वास्तुशास्त्रज्ञ व नियोजक सल्लागारांची नोंदणी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या विविध योजनांसाठी वास्तुशास्त्रज्ञ व नियोजन सल्लागारांची नोंदणी करण्यास मान्यता देण्यात येते. त्यादृष्टीने खालील मार्गदर्शक सूत्रांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१. प्रत्येक वर्ग-१ शहरांसाठी स्वतंत्र पॅनेल तयार करण्यात यावे. मुंबई मंडळाच्या कार्यवाहीसाठी इमारत दुरुस्ती व पुनर्रचना यासाठी स्वतंत्र पॅनेल तयार करण्यात यावीत.

२. याकरिता जाहिरात देऊन खाजगी व्यावसायिक वास्तुशास्त्रज्ञांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात यावेत.

३. अ) गृहनिर्माण क्षेत्रात किमान ५० लाखांचे काम करण्यात आलेले असावे/ किमान ५ वर्षे व्यावसायिक कामाचा अनुभव असावा. ७५० घरांचे काम केलेले असावे/किमान २ अनुभवी (क्लासिफाईड) वास्तुशास्त्रज्ञ सेवेत असावे/कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर मध्ये वास्तुशास्त्रज्ञ म्हणून नोंदणी झालेली असावी. इमारत दुरुस्ती व पुनर्रचना क्षेत्रातील पॅनेलकरिता अट क्र. ३ (ब).

ब) इमारत दुरुस्ती व पुनर्रचना क्षेत्रातील पॅनेलकरिता त्या क्षेत्रातील किमान ३ वर्षांचा अनुभव व स्ट्रक्चरल इंजिनियरच्या सेवांची उपलब्धता असणे आवश्यक राहील.

४. अर्जासोबत किमान ५ गृहनिर्माण प्रकल्पांचे जरूर ते तपशील जसे की, प्लॅन, एलिव्हेशन, सेक्शन व फोटोग्राफर्स् जोडण्यात यावे. इमारत दुरुस्ती व पुनर्रचना क्षेत्रातील कामाचा तपशील देण्यात यावा.

५. सदर अर्जाची छाननी करण्यासाठी लावण्यात येणारे निकष ठरविण्यासाठी खालील सदस्यांची समिती नेमण्यात यावी.

| | |
|---|---|
| १. मुख्य अभियंता/प्राधिकरण | नियंत्रक |
| २. मुख्य अभियंता/मुंबई मंडळ | सदस्य |
| ३. संबंधित मंडळाचे मुख्य अधिकारी (मुंबई खेरीज करून) | सदस्य |
| ४. वास्तुशास्त्रज्ञ/मुंबई मंडळ | सदस्य |
| ५. सल्लागार/प्राधिकरण श्री. आपटे | सदस्य |
| ६. मुख्य नियोजक श्री. एम. आर. डी. ए. | सदस्य |
| ७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सिडको | सदस्य |
| ८. श्री. जोगळेकर, कार्यकारी संचालक, हडको | सदस्य |
| ९. वास्तुशास्त्रज्ञ/प्राधिकरण | सदस्य/सचिव |

६. अशा प्रकारची जाहिरात देणे, अर्जाचा नमुना ठरविणे याबद्दलचा कालबद्ध कार्यक्रम ठरविणे इत्यादी बाबी संदर्भातील अधिकार मुख्य अभियंता/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत. याबाबतची कार्यवाही

३० जून १९९१ पर्यंत पूर्ण करावी.

७. तद्नंतर वरीलप्रमाणे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यामधून व्यावसायिकांची निवड करून नोंदणी करण्यासाठी खालील समिती नियुक्त करण्याचा प्रस्ताव आहे.

| | |
|---|---|
| १. मुख्य अभियंता/प्राधिकरण | नियंत्रक |
| २. मुख्य अभियंता/मुंबई मंडळ | सदस्य (मुंबई मंडळाकरिता) |
| ३. मुख्य अधिकारी/प्रादेशिक मंडळ | सदस्य (संबंधित मंडळाकरिता) |
| ४. वास्तुशास्त्रज्ञ/मुंबई मंडळ | सदस्य |
| ५. वास्तुशास्त्रज्ञ/प्राधिकरण | सदस्य/सचिव. |

**Item No. 17 Resolution No. 1904**

विषय : श्री. पी. के. रामचंद्रन्, अर्थतज्ज्ञ/जा. बँ. प्र. यांची कंत्राटी नेमणूक वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. पी. के. रामचंद्रन्, अर्थतज्ज्ञ/जागतिक बँक प्रकल्प यांच्या सेवेचा कालावधी दिनांक ३.४.१९९१ मध्यान्ह पूर्व पासून ६ महिन्यांच्या कालावधीसाठी त्यांच्या नेमणूकीच्या मूळ अटी व शर्तीच्या अधीन राहून वाढविण्यास मान्यता देण्यात येते.

प्राधिकरणाच्या विचारार्थ ठेवण्यात आलेले प्रस्ताव संपल्यानंतर प्राधिकरणाचे सदस्य डॉ. सुरेश खेडेकर यांनी प्राधिकरणाच्या निदर्शनास आणले की, प्राधिकरणाची आगामी होणारी बैठक १०० वी असल्या कारणाने, प्राधिकरणातर्फे त्यानिमित्ताने लोककल्याणकारी योजना राबविण्याचे दृष्टीने मुंबई शहरात प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीवर ज्या गलिच्छवस्ती झोपडपट्ट्या वसलेल्या आहेत, त्यांचा पुनर्विकास करण्याची योजना जाहीर करण्यात यावी. या चर्चेमध्ये भाग घेताना मा. अध्यक्षांनी 'ही सूचना स्तुत्य आहे' असे सांगितले. मुंबई शहरामध्ये प्राधिकरणाच्या जमिनीवर अशा प्रकारच्या झोपडपट्ट्यांची एकूण संख्या ५५ आहे, त्याची प्रथम पाहणी करण्यात यावी.

डी. सी. रेग्युलेशनमध्ये करण्यात आलेल्या फेरबदलानुसार प्राधिकरणाच्या जमिनीवरील गलिच्छ वस्तींना पुनर्विकास करण्याचे कार्य प्राधिकरणास करावे लागणार आहे.

मुंबई शहरात प्राधिकरणाच्या जमिनीवर एकूण ५५ गलिच्छ वस्त्यांच्या झोपडपट्ट्या आहेत. त्याचा पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी प्राधिकरणासमोर मांडला. या झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास कशा पद्धतीने करण्यात यावा, याची उपाध्यक्षांनी माहिती करून दिली. गलिच्छ वस्ती पुनर्विकास योजना राबविण्याच्या प्रस्तावावर विचार विनिमय करण्यात येऊन प्राधिकरणाने,

**Meeting No.** **100** **Meeting Date** **18-Apr-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २८.२.१९९१ रोजी मुंबई येथे झालेल्या खास बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २८.२.१९९१ रोजी मुंबई येथे झालेल्या खास बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ८ मार्च, १९९१ रोजी मुंबई येथे झालेल्या ९९ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **3** **Resolution No.** **1906**

विषय : कन्नमवार नगर येथे शुश्रुषा रुग्णालयास वाटप करण्यात आलेल्या भूखंडाच्या अधिमूल्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शुश्रुषा सहकारी रुग्णालय या संस्थेचे कार्य लक्षात घेऊन कन्नमवार नगर, विक्रोळी येथील त्यांनी मागितलेला भूखंड त्यांना वितरित करण्यात यावा. तसे करताना शासकीय रुग्णालयांना ज्या पद्धतीने अधिमूल्य आणि भाडेपट्टा आकारण्यात येतो, त्या पद्धतीने या संस्थेस तो आकारण्यात यावा. परंतु असे करण्यापूर्वी मागील भाड्याची थकबाकी आणि वसूलीबाबत संस्था चालकांशी चर्चा करावी व तो प्रश्न प्रथम सोडवावा.

**Item No.** 6 **Resolution No.** 1909

विषय : गृहनिर्माण योजनांच्या अंदाजितांना तांत्रिक मंजूरी देण्यासाठी उपमुख्य अभियंता/मुख्य अधिकारी यांचे वित्तीय अधिकार वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण योजनांचा अंदाजितांना तांत्रिक मंजूरी देण्यासाठी उपमुख्य अभियंता तथा मुख्याधिकारी यांचे वित्तीय अधिकार प्रति इमारत रु. १० लक्षावरून प्रति इमारत रु. २५ लक्षापर्यंत वाढविण्यात यावेत.

---

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : सोलापूर येथील विडी कामगारांच्या योजनेअंतर्गत गाळेधारकांकडून नियमाधीन वसूली होत नसल्यामुळे प्राधिकरणास नुकसान होत असल्यास्तव प्राधिकरणाच्या माहितीसाठी बाब सादर.

ठराव :

---

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : विशिष्ट परिस्थितीत काम विभागून करण्यासाठी अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागातर्फे समुद्र आणि खाडीलगतच्या ५०० मीटर जागेवरती विकास कामास प्रतिबंध.

ठराव :

---

**Item No.** 10 **Resolution No.** 1910

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्प योजनेअंतर्गत नागरी नूतनीकरण इमारत क्र. २५-२७, ३१-३३, उमरखाडी 'ब' विभाग, टप्पा - ३ (उत्तर) या इमारतींच्या निविदामध्ये एस्कलेशनचा अंतर्भूत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, इमारत क्र. २५-२७, ३१-३३, उमरखाडी 'ब' विभाग, टप्पा - ३ (उत्तर) (भाग) या इमारतींच्या निविदामध्ये एस्कलेशनचा अंतर्भूत करण्याबाबत मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** **11** **Resolution No.** **1911**

विषय : माजिवडे-ठाणे येथे मध्यम उत्पन्न गट - २ अंतर्गत ४८ गाळे अधिक १२ दुकाने बांधण्यासंबंधीच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, माजिवडे-ठाणे येथे मध्यम उत्पन्न गट - २ अंतर्गत ४८ गाळे अधिक १२ दुकाने बांधावयाच्या कामास मे. अंबरुतलाल सुखदानी यांच्या निविदेत दाखविलेल्या अंदाजित किंमतीच्या (रु. ३१,१८,१५७/-) व पुढे वाटाघाटीने आलेल्या ४५.९ टक्के अधिक (पंचेचाळीस पूर्णांक नऊ दशांश जास्त) दराची निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी. वाटाघाटीने आलेली निविदेची रक्कम रु. ४५,४९,३९१/- (रु. पंचेचाळीस लक्ष एकोणपन्नास हजार तीनशे एक्याण्णव फक्त) एवढी आहे त्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** **12** **Resolution No.** **1912**

विषय : सिडको, नवीन औरंगाबाद येथे उच्च उत्पन्न गटातील ७२ गाळ्यांच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, आर-४३, एन-७ सिडको, नवीन औरंगाबाद या जमिनीवर उच्च उत्पन्न गट अंतर्गत ७२ गाळ्यांसाठी मे. के. एस. गुरू आणि कंपनी यांची निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमतीवर म्हणजेच रु. ६७,४६,२५६/- (सदुसष्ट लक्ष सहेचाळीस हजार दोनशे छप्पन्न फक्त) यावर वाटाघाटीने कमी करून दिलेल्या २४.२५ अधिक (चोवीस पूर्णांक पंचवीस शतांश टक्के अधिक) दराची एकमेव निविदा स्वीकारण्यात यावी, त्यानुसार निविदा रक्कम रु. ८३,८२,२२३/- (रुपये त्र्याऐंशी लक्ष ब्याऐंशी हजार दोनशे तेवीस फक्त) आहे. त्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** **13** **Resolution No.** **1913**

विषय : सर्व्हे क्र. ७, धारिवली, डोंबिवली या जमिनीवर मध्यम उत्पन्न गट - २ अंतर्गत (आता उच्च उत्पन्न गटात मोडणाऱ्या) ४० गाळ्यांच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्र. ७ धारिवली, डोंबिवली या जमिनीवर मध्यम उत्पन्न गट - २ अंतर्गत (आता उच्च उत्पन्न गटात मोडणाऱ्या) ४० गाळ्यांसाठी मे. सतीश कन्स्ट्रक्शन यांची निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमतीवर रु. १९,२६,६८२/- (रु. एकोणीस लक्ष सव्वीस हजार सहाशे ब्याऐंशी फक्त) व वाटाघाटीने कमी करून दिलेल्या ४५.९९ (पंचेचाळीस पूर्णांक नव्याण्णव टक्के) अधिक दराची निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी. त्यानुसार निविदा रक्कम रु. २८,१२,७६३/- (अठ्ठावीस लक्ष बारा हजार सातशे त्रेसष्ट फक्त) आहे. त्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 14 **Resolution No.** 1914

विषय : सर्व्हे क्र. ७ (भाग) मुकुंदवाडी, औरंगाबाद येथे उच्च उत्पन्न गटातील ८३ गाळ्यांच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्र. ७ (भाग) मुकुंदवाडी, औरंगाबाद या जमिनीवर उच्च उत्पन्न गटातील ८३ गाळ्यांसाठी मे. ज्योती कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमतीवर (रु. ७७,७६,९३४/-) २७.३५ टक्के अधिक (सत्तावीस पूर्णांक पस्तीस दशांश टक्के अधिक) दराची निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी. त्यानुसार निविदा रक्कम रु. ९९,०३,९२५/- (रु. नव्याण्णव लक्ष तीन हजार नऊशे पंचवीस फक्त) आहे. त्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : निविदांचे वैध कालावधीसंबंधी

ठराव :

---

**Item No.** 16 **Resolution No.** 1915

विषय : इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स, मुंबई केंद्र यांनी प्रस्तावित केलेल्या 'स्टडी टूर' करिता श्री. पी. डी. वाणी, मुख्य अभियंता, मुंबई मंडळ यांना पाठविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. पी. डी. वाणी, मुख्य अभियंता/मुंबई मंडळ यांना स्टडी टूरसाठी दिनांक २२.५.१९९१ ते दि. ६.६.१९९१ या १५ दिवसांच्या कालावधीसाठी प्राधिकरणाच्या खर्चाने शासनाने मंजूरी दिल्यास पाठविण्यास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे यासाठी येणाऱ्या रु. ३४,५००/- व ३०० अमेरिकन डॉलर्स या खर्चासही मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 17 **Resolution No.** 1916

विषय : श्री. एस. एस. तांबे, ऐच्छिक सेवानिवृत्त झालेले सहाय्यक संचालक नगर रचना यांची प्राधिकरणामध्ये कंत्राटी पद्धतीवर २ वर्षांकरिता नेमणूक करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. एस. एस. तांबे यांची प्राधिकरणात सहाय्यक संचालक नगर रचना म्हणून २ वर्षांकरिता प्रस्तावात नमूद केलेल्या वेतनश्रेणीवर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे त्यांना प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार रजेचे रोखीकरण, प्रवास भत्ता, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती तसेच मागणी केल्यास सेवा-सदनिका बाब टिप्पणात नमूद केल्याप्रमाणे देण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 18 **Resolution No.**

विषय : मालवणी सर्व्हे नं. २६३ येथील ४३.३० जमिनीवरील विभाग १ व २ च्या भरावयाच्या कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 19 **Resolution No.**

विषय : वांद्रे येथील भूखंड क्र. ७ व ८ यावर इमारत बांधण्यासाठी स्थापत्य शास्त्रज्ञांची नेमणूक करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 20 **Resolution No.**

विषय : भूकर पाहणी क्र. २४९, ताडदेव विभाग, डॉ. मडकमकर मार्ग या मालमत्तेवरील इमारत क्र. ४५ अे. बी. सी. (गांजावाला कंपाऊंड) च्या पुनर्विकासाकरिता 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 21 **Resolution No.**

विषय : कांदिवली व मुलुंड येथील मोकळे भूखंड उच्च उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट योजनेखाली विक्री करण्यासाठी तीन क्रमांकापुढील निविदा विचारात घेण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 22 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणारा पोईसर गृहनिर्माण महाप्रकल्प बांधकाम व्यवस्थापन सल्लागार मे. प्रेमनाथ ॲन्ड असोसिएट यांचेकडून घेण्यात येणाऱ्या अतिरिक्त सेवेबद्दल सेवाशुल्क ठरविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 23 **Resolution No.**

विषय : एअरमेट सहकारी गृहनिर्माण संस्थेस कोलेकल्याण, सांताक्रुझ येथील जमीन देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 23 **Resolution No.**

विषय : एअरमेट सहकारी गृहनिर्माण संस्थेस कोलेकल्याण, सांताक्रुझ येथील जमीन देण्याबाबत.

ठराव :

| **Meeting No.** | **101 Stay** | **Meeting Date** | **31-May-1** |
|---|---|---|---|

| **Item No.** | **Resolution No.** |
|---|---|

विषय :

ठराव :

| **Item No.** 1 | **Resolution No.** |
|---|---|

विषय :

ठराव :

**Meeting No.** 101 **Meeting Date** 04-Jun-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १८.४.१९९१ रोजी मुंबई येथे झालेल्या १०० व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : श्री. ना. द. दंडवते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांची वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्याबाबतची विनंती.

ठराव :

---

**Item No.** 3 **Resolution No.** 1917

विषय : श्री. ए. एन. खर्डेनविस, उप अभियंता यांनी दाखल केलेल्या रिट अर्ज क्रमांक ९२३/१९८० मधील मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर न्यायापीठाचा निकाल.

ठराव : एकमताने खाली प्रस्तावित केल्याप्रमाणे निर्णय घेतला.

अ) श्री. ए. एन. खर्डेनविस यांना दिनांक १.४.१९८० च्या आदेशान्वये उप अभियंता या पदावर पदोन्नती मिळाली आहे असे समजून त्यांना पदोन्नतीची मानीव तारीख देण्यात यावी.

ब) दिनांक १.४.१९८० ते प्रत्यक्ष पदोन्नती मिळालेल्या दिनांकापर्यंतच्या (६.१.१९८२) कालावधीकरिता त्यांना वेतननिश्चिती व वेतन भत्त्याची थकबाकीचा लाभ देण्यात यावा.

क) श्री. खर्डेनविस दिनांक १.४.१९८० पासूनच्या मानीव तारखेपासून पदोन्नतीचा लाभ देण्याकरिता दिनांक १.४.१९८० ते ६.१.८२ या कालावधीकरिता उप-अभियंत्याचे रु. ६००-११५० (जुनी वेतनश्रेणी) या वेतनश्रेणीतील एक अधिसंख्य पद पुणे मंडळाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात यावे.

---

**Item No.** 4 **Resolution No.** 1918

विषय : गृहनिर्माण मंडळातील सुभाष नगर येथील दुकानी गाळा क्रमांक - ५.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

सुभाष नगर, चेंबूर या वसाहतीमधील दादर सार्वजनिक वाचनालयास १९६२ साली वितरित करण्यात झालेले दोन दुकानी गाळे स्वयंसिद्ध इंडस्ट्रियल को. ऑ. सोसायटीच्या नावे गाळे वितरण विषयक नियमातील नेहमीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे सदर दोन गाळ्यांना लागूनच असलेला रिकामा गाळा क्र. ५ चे नेहमीच्या विहित अटीवर त्या संस्थेस देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 5 **Resolution No.** 1919

विषय : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून वांद्रा-कुर्ला संकुलातील १२४२७ चौ. मीटरच्या निवासी भूखंड लीज रेंटवर घेणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून वांद्रा-कुर्ला संकुलातील १२४२७ चौ. मीटर क्षेत्रफळाचा निवासी भूखंड वार्षिक लीज रेंट रु. ४४,७३,७२०/- पहिल्यांदा एकदाच भरून ३० वर्षांच्या लीजवर रीतसर करार करून घेण्यास बाब टिप्पणात नमूद केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाच्या अधीन राहून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत मालकी हक्क तत्वावर राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेत अंतर्भूत झालेल्या नोंदणीकृत संस्थांना कार्यालयीन कामासाठी जागा देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : बालविकास विद्यामंदिर या संस्थेला मेघवाडी, जोगेश्वरी येथे देण्यात आलेल्या भूखंडाच्या अधिमूल्यावरील भरपाईची रक्कम कमी करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : एअरमेट सहकारी गृहनिर्माण संस्थेस कोले कल्याण, सांताक्रुझ येथील जमीन देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : कांदिवली व मुलुंड येथील मोकळे भूखंड उच्च उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट योजनेखाली विक्री करण्यासाठी तीन क्रमांकापुढील निविदा विचारात घेण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 1920

विषय : श्री. ए. एस. गोखले, खाजगी सचिव, अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या कंत्राटी नेमणूकीचा कालावधी वाढविणेबाबत.

ठराव : श्री. ए. एस. गोखले, खाजगी सचिव, अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या कंत्राटी पद्धतीच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक ५.५.१९९१ पासून दिनांक ३१.७.१९९१ पर्यंत पुनर्नेमणूकीच्या नेहमीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 11 **Resolution No.** 1921

विषय : प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणारा पोईसर येथील गृहनिर्माण महाप्रकल्प बांधकाम व्यवस्थापन सल्लागार मे. प्रेमनाथ ॲन्ड असोसिएट यांचेकडून घेण्यात येणाऱ्या अतिरिक्त सेवेबद्दल सेवाशुल्क ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतले.

१) पोईसर येथील गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या सध्या प्राप्त झालेल्या सर्व निविदा रद्द करण्यात याव्यात.

२) पोईसर येथील कामाची दोन किंवा अधिक प्रकल्पात विभागणी करण्यात यावी.

३) महाप्रकल्पाच्या १९ पूर्वपात्र विकसकांसह मुंबई मंडळाचे व इतर शासकीय व निमशासकीय खात्यात पंजीकृत केलेल्या वर्ग-१ च्या कंत्राटदारास निविदा भरण्याची परवानगी देण्यात येते.

४) बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे व्यवस्थापन सल्लागार मेसर्स प्रेमनाथ ॲन्ड असोसिएटस् यांना संपणू कामाच्या किंमतीच्या ३.५ टक्के मोबदला त्यांनी देऊ केलेल्या जास्तीच्या सेवेसह, प्रस्तावित केलेल्या टप्प्यामध्ये अदा करण्यास मंजूरी देण्यात येते.

मुंबई मंडळाने सत्वर मेसर्स प्रेमनाथ ॲण्ड असोसिएटस् व्यवस्थापन सल्लागारास कार्यादेश द्यावेत असे ठरविण्यात आले.

---

**Item No.** 12 **Resolution No.**

विषय : सर्व्हे क्रमांक ७ आणि ८ ब्लॉक सी, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स या जमिनीच्या योजनेसाठी खाजगी वास्तुशास्त्रज्ञ नेमण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 13 **Resolution No.**

विषय : गोराई रोड, बोरिवली (पश्चिम) येथील २२ दुकानी गाळ्यांच्या इमारतीची विक्री करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **14** | **Resolution No.** | **1922** |
|---|---|---|---|

विषय : एकसर बोरिवली (पश्चिम) येथे केंद्र शासनाचे कर्मचारी, जे कर्मचारी गट विमा गृहनिर्माण योजनेचे सदस्य असतील अशांना ८० अधिक ४० गाळ्यांचे वितरण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, हुडकोने मंजूर केलेल्या योजनेप्रमाणे केंद्र शासकीय कर्मचारी, जे कर्मचारी गट विमा गृहनिर्माण योजनेचे सदस्य आहेत अशा केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांस जाहिरात न देता या योजनेतील १२० गाळे केंद्र शासनाच्या केंद्रीय लोकनिर्माण खात्यास (सी. पी. डब्ल्यू. डी.) निवास स्थानाच्या उपयोगासाठी एक रकमी पद्धतीने वितरित करण्यास मान्यता देण्यात येते.
तथापि, अशा प्रकारच्या वितरणाचे नियम सुधारित करून घ्यावेत असे उपाध्यक्ष/प्राधिकरण तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचविले.

| **Item No.** | **15** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : समुद्र किनाऱ्यालगतच्या क्षेत्रामधील विकास कामावरील पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून घालण्यात आलेली बंधने व त्याचा प्राधिकरणाच्या कार्यवाहीशी संबंध.

ठराव :

| **Item No.** | **16** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : गाळे हस्तांतरण प्रकरणी ५ वर्षे वास्तव्याची सांकेतिक अट विचारात न घेता अनधिकृत गाळेधारकांच्या नावे गाळा नियमित करणे.

ठराव :

**Item No.** **17** **Resolution No.** **1923**

विषय : म्हाडा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती लाभ योजना लागू करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २८.२.१९८९ रोजी झालेल्या खास बैठकीमध्ये प्राधिकरणाने म्हाडा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन लाभ योजना म्हाडाच्या स्वबळावर लावण्याच्या मंजूर केलेल्या प्रस्तावास अनुसरून महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १६ मार्च १९९१ च्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या सर्व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम व शिस्त अपील नियम व त्या अनुषंगाने वेळोवेळी ठरविण्यात येणारे सर्व नियम लागू करण्यास कर्मचारी संघटनेने लेखी अनुमती दिली असल्याने म्हाडा कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियमाच्या तरतुदी लागू करून निवृत्ती वेतन लाभ योजना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे हे लाभ म्हाडा कर्मचाऱ्यांना दिनांक १.४.१९८७ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तथापि या संदर्भातील सविस्तर बाब टिप्पण तयार करून प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत विचारार्थ ठेवण्यात यावे असे ठरविण्यात आले.

त्यानंतर मुंबई मंडळाचे माजी सदस्य श्री. भाऊराव पाटील व त्यांचे काही नातेवाईक मुंबई, पुणे महामार्गावर ट्रक दुर्घटनेत मृत पावल्याचे समजताच प्राधिकरणाच्या बैठकीत शोक व्यक्त करून मृतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 102 **Meeting Date** 29-Jun-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मे, १९९१ रोजी झालेल्या परंतु स्थगित झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ४ जून, १९९१ रोजी मुंबई येथे झालेल्या १०१ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 1924

विषय : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवर तात्पुरते निर्माण करण्यास आलेल्या वाहन चालकाच्या अधिसंख्य पदास मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. फ्रान्सिस पॉल पंडित यांच्यासाठी पुणे मंडळाच्या आस्थापनेवर दि. २ मे, १९९० (म.पू.) पासून १ वर्षाच्या कालावधीसाठी निर्माण करण्यात आलेल्या वाहन चालकाच्या अधिसंख्य पदाचा कालावधी आणखी १ वर्षाकरिता किंवा पुणे मंडळाच्या समापती या पदावर श्री. विठ्ठल लडकत हे कार्यरत असेपर्यंत यापैकी जो कालावधी आधी संपेल त्या कालावधीपर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 4 **Resolution No.** 1925

विषय : वित्त नियंत्रक/प्राधिकरण या पदावर चार्टर्ड अकाऊंटंटची अथवा वित्त व्यवस्थापनाची पदवी धारण केलेल्या व्यक्तीची नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, घरबांधणी कार्यक्रमाचा वाढता व्याप आणि प्राधिकरणाने वित्त व्यवस्थापन सुस्थितीत असण्यासाठी वित्त नियंत्रक/प्राधिकरण या पदावर रु. ४,५००-१५०-५,७०० या वेतनश्रेणीत चार्टर्ड अकाऊंटंट अथवा वित्त व्यवस्थापनाची पदवी आणि १० वर्षाचा अनुभव जमेस असलेल्या आणि ज्यांचे वय ५० वर्षापेक्षा कमी असलेल्या (अपवादात्मक प्रकरणामध्ये वयाची अट शिथिल करून) योग्य उमेदवाराची जाहिरातीद्वारे थेट नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 5 **Resolution No.** 1926

विषय : मंत्रालयाबाहेरील कार्यालयात उच्चश्रेणी लघुलेखकाच्या पदोन्नतीच्या स्तराची 'स्वीय सहाय्यक' पद निर्माण करणे.

प्राधिकरणातील उच्चश्रेणी लघुलेखक या संवर्गातील एका पदाची श्रेणीवाढ करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६ ऑक्टोबर, १९९० एसआरव्ही-१०८९/प्र.क्र. १५/८९/बारा या क्रमांकाच्या शासन निर्णयातील तरतूदी, त्यामधील अटींच्या अधीन राहून स्वीकारण्यात येत आहेत. त्यानुसार लघुलेखक (उच्चश्रेणी) या संवर्गातील एका पदाची श्रेणीवाढ रुपये २३७५-७५-३२००-द.रो.-१००-३५०० या वेतनश्रेणीमध्ये रुपांतरित करून एक पदोन्नतीचे पद मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते. त्या पदाचे 'स्वीय सहाय्यक' असे पदनाम राहील व ते पद राजपत्रित अधिकारी वर्ग-२ च्या समान राहील. प्राधिकरणातील ज्येष्ठ व योग्य उच्चश्रेणी लघुलेखकाला विहित कार्यपद्धती अनुसरून पदोन्नती देण्यात यावी.

---

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांना एल.पी.जी. सिलिंडर गोडाऊनसाठी वांद्रे (पूर्व) येथे भूखंड देणे.

ठराव :

---

**Item No.** 7 **Resolution No.** 1927

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणास जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनासाठी हुडकोकडून एकूण रु. ११९.३८ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

---

**Item No.** 8 **Resolution No.** 1928

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ, मुंबई (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर बाब टिप्पणास जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या हुडको अर्थसहाय्यित बीड, नांदेड जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता ग्रामीण योजनांसाठी एकूण रु. ४३.८३ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

---

**Item No.** 9 **Resolution No.** 1929

विषय : भारताचे मूतपूर्व पंतप्रधान श्री. राजीवजी गांधी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी प्राधिकरणातर्फे वर्तमानपत्रांत देण्यात आलेल्या जाहिरातींकरिता झालेल्या अंदाजे रु. १.४३ लाख खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, भारताचे मूतपूर्व पंतप्रधान श्री. राजीवजी गांधी यांना त्यांच्या दु:खद निधनामुळे जाहीररित्या केली त्याची माहिती होण्यासाठी प्राधिकरणातर्फे 'मे. कांटूर ॲडव्हर्टायजिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनी' मार्फत वर्तमानपत्रामध्ये देण्यात आलेल्या जाहिरातीसाठी झालेल्या अंदाजे रु. १.४३ लाख एवढ्या खर्चास मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : कांदिवली व मुलुंड येथील मोकळे मूखंड, उच्च उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट योजनेखाली विक्री करण्यासाठी तीन क्रमांकापुढील निविदा विचारात घेण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.** 1930

विषय : श्री. जे. पी. धारप, सेवानिवृत्त लघुलेखक यांची प्राधिकरणामध्ये कंत्राटी पद्धतीवर १ वर्षाकरिता नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. जे. पी. धारप यांची मुंबई मंडळात लघुलेखकाच्या रिक्त पदावर खालील अटी व शर्तीवर रु. ३,५००/- दरमहा या एकत्रित वेतनावर १ वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. श्री. धारप यांच्या पुनर्नेमणूकीमुळे प्राधिकरणात काम करणाऱ्या लघुलेखकांच्या पदोन्नतीवर विपरीत परिणाम होणार नाही.

१. श्री. जे. पी. धारप यांची मासिक रु. ३५००/- या एकत्रित वेतनावर लघुलेखकाच्या रिक्त पदावर नेमणूक करण्यात यावी.
२. श्री. जे. पी. धारप यांच्या कंत्राटी पद्धतीचा कालावधी १ वर्षासाठी राहील. मात्र उमय बाजूच्या १ महिन्याच्या नोटीशीने सदर कंत्राटी नेमणूक संपुष्टात येईल.
३. पुनर्नेमणूकीच्या कालावधीत त्यांना नैमित्तिक रजेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही रजेचे फायदे अनुज्ञेय राहणार नाही.
४. पुनर्नेमणूकीच्या कालावधीमध्ये वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे भविष्य निर्वाह निधी, उपदान इ. अन्य कोणतेही फायदे त्यांना अनुज्ञेय राहणार नाहीत.

**Item No.** 12 **Resolution No.**

विषय : सोलापूर (एस. पी. ओ.-१) येथील १५ उच्च, ४८ मध्यम व ९९ अल्प उत्पन्न गाळे बांधकामाची निविदा मंजूर करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** **13** **Resolution No.** **1931**

विषय : महाराष्ट्र विद्या विकास मंडळ या शैक्षणिक संस्थेस नेहरूनगर, कुर्ला येथे ११ व १२ क्रमांकाच्या कार्यालयीन इमारती असलेला भूखंड इमारतीसह देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे 'महाराष्ट्र विद्या विकास मंडळ' या शैक्षणिक संस्थेची विनंती विचारात घेऊन संस्थेच्या ताब्यात असलेले १९ गाळे परत करण्याच्या अटींवर सदर संस्थेस नेहरूनगर, कुर्ला येथील कार्यालयीन इमारत क्रमांक ११ व १२ यांची विक्री करून त्या इमारती असलेला सुमारे ७२३.०० चौ. मीटर आकारमानाचा भूखंड ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार किंमत आकारून नेहमीच्या अटी व शर्तीनुसार देण्यास मान्यता देण्यात येते.
मात्र सदर भूखंडावर विकास आराखड्यानुसार खेळांच्या मैदानाचे असलेले आरक्षण सदर संस्थेने प्रथमतः बदलून घ्यावे, या कामी मुंबई मंडळाचे सहकार्य घेण्यात यावे.

---

**Item No.** **14** **Resolution No.** **1932**

विषय : मुंबईतील गृहनिर्माण महाप्रकल्पाची कामे बांधकाम सल्लागारांच्या निविदेतील अट क्रमांक ३.५ च्या अर्थविषयकाराबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सिडकोमार्फत गृहबांधणी प्रकल्पावर नेमण्यात येणाऱ्या सल्लागाराबरोबर सिडकोने केलेल्या कराराचा मसुदा विचारात घेऊन प्राधिकरणाच्या गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या बांधकामावर नेमण्यात आलेल्या सल्लागाराबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्यातील अट क्रमांक ३.५ प्रमाणे व्यवस्थापन सल्लागारांनी त्यांना एकूण देय असलेल्या रकमेइतकी विमा पॉलिसी राष्ट्रीयीकृत विमा कंपनीकडून घेण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** **15** **Resolution No.**

विषय : पवई येथील गृहनिर्माण महाप्रकल्प.

ठराव :

---

**Item No.** **16** **Resolution No.**

विषय : समुद्र किनाऱ्यालगतच्या क्षेत्रामधील विकास कामावरील पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून घालण्यात आलेली बंधने व त्याचा प्राधिकरणाच्या कार्यवाहीशी संबंध.

ठराव :

---

**Meeting No.** 103 **Meeting Date** 16-Aug-1

| **Item No.** | 1 | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २९ जून १९९१ रोजी झालेल्या १०२ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

| **Item No.** | 2 | **Resolution No.** | 1933 |
|---|---|---|---|

विषय : श्री.ना.द. दंडवते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांच्या कंत्राटी पध्दतीवरील नेमणूकीत मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री.ना.द. दंडवते, यांचा उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण या पदावरील कंत्राटी पध्दतीचा नेमणूकीचा कालावधी दिनांक २०/७/१९९१ पासून दिनांक १९/१/१९९२ पर्यंत (आणखी सहा महिने) नेमणूकीच्या पूर्वीच्या अधीन राहून वाढविण्यात मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | 3 | **Resolution No.** | 1934 |
|---|---|---|---|

विषय : श्री. ना.द.दंडवते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांची वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्याबाबतची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या वैद्यकीय नियमावली १९६८ कलम २ (ब) नुसार वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस आवश्यक असलेली १ वर्षाची अर्हताकारी सेवेची अट शिथील करण्यात येऊन व श्री.ना.द. दंडवते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांच्या पत्नीच्या आजाराचे गांभीर्य विचारात घेऊन, प्राधिकरणाच्या दिनांक २२/४/१९९१, क्रमांक: एमएच/आरईजी/१३८३/११९७/प्र.५ च्या आदेशासोबत जोडलेल्या सहपत्र 'अ' मधील मार्गदर्शक तत्वाच्या परिच्छेद ३ (१) मधील विनियमाच्या अधिन राहून विशेष बाब म्हणून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | 4 | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या सेवा वर्ग १ व २ मधील अधिकाऱ्यांची पदे पदोन्नतीने भरण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | 5 | **Resolution No.** | 1935 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवर मुख्य नियोजनकार (चिफ प्लॅनर) हे पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवर मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार हे पद रू. ४५००-१५०-५७०० या वेतनश्रेणीत निर्माण करण्यास मान्यता देण्यात येते.
त्याचप्रमाणे शासनाच्या मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा असे ठरविण्यात आले.

**Item No.** 6 **Resolution No.** 1936

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवर वर्ग १ मध्ये जनसंपर्क अधिकारी हे पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या आस्थापनेवर वर्ग १ मध्ये जनसंपर्क अधिकारी हे पद उपलब्ध नाही त्यासाठी प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील उप अभियंत्यांच्या राखीव पदापैकी १ पद मोकळे करण्यात येऊन त्या पदाचे रू. २२००-४००० या वेतनश्रेणीत श्रेणीवाढ करुन त्या पदास जनसंपर्क अधिकारी वर्ग १ म्हणून संबोधण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याप्रमाणे श्रेणीवाढीसाठी शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.

---

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : श्री.जे.के. वसावे, उपजिल्हाधिकारी यांची प्रतिनियुक्तीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे मुंबई मंडळातील उपमुख्य अधिकारी (इ. व पु.) या पदावर नियुक्ती.

ठराव :

---

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : श्री. बी.बी. राणे, निवडश्रेणी उपजिल्हाधिकारी, सक्षम प्राधिकारी.

ठराव :

---

**Item No.** 9 **Resolution No.** 1937

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दि. १ जानेवारी, १९९१ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे दिनांक १ जानेवारी १९९१ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** 10 **Resolution No.** 1938

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सेवा निवासस्थान म्हणून देण्यात आलेले गाळे कर्मचाऱ्यांना विक्री करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई मंडळ व कोकण मंडळ यांच्या अखत्यारीतील खाली दर्शविलेल्या इमारतीतील सेवानिवास स्थानाच्या गाळयांना ते विखुरलेल्या स्वरुपातील गाळे नसले तरीही विक्री योजना लागू करण्यात यावी.

| अ.क्र. | वसाहतीचे नाव | योजना | इमारत क्र. |
|---|---|---|---|
| १. | नेहरु नगर, कुर्ला | अल्प उत्पन्न गट | ३९ |
| | | —''— | ४१ |
| | | —''— | ४३ |
| २. | डी. एन. नगर, अंधेरी | गलिच्छ वस्ती निर्मुलन योजना | ३० |
| | | —''— | ३१ |
| | | —''— | ३२ |
| | | —''— | ३५ |
| | | —''— | २ |
| | | —''— | ३ |
| | | —''— | ४ |
| | | अल्प उत्पन्न गट | १४ |
| ३. | कन्नमवार नगर, विक्रोळी | गलिच्छ वस्ती निर्मुलन योजना | ९९ |
| ४. | साने गुरुजीनगर, गोरेगाव | —''— | १ |
| ५. | मच्छिमार नगर, माहिम | —''— | २० |
| ६. | टिळक नगर, चेंबुर | अल्प उत्पन्न गट | १२७ |
| ७. | राजेंद्र नगर, बोरीवली | —''— | १८ |
| ८. | वर्तक नगर, ठाणे (कोकण मंडळ) | औद्योगिक कामगार गृहनिर्माण योजना | ४७ |

२. भाडेतत्त्वावर दिलेल्या ज्या गाळ्यांना सर्वसाधारण विक्री योजना जोपर्यंत लागू केली जात नाही, तोपर्यंत सेवानिवासस्थानांच्या गाळ्यांची विक्री कर्मचाऱ्यांना करु नये.

३. प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक १०३८ दिनांक २.५.१९८५ मधील मार्गदर्शक तत्त्वापैकी तत्त्व क्र. १ ला अपवाद करुन वर क्रमांक १ मध्ये दाखविलेल्या इमारतीतील सेवानिवासस्थानांच्या गाळ्यांची विक्री करण्यात यावी. या व्यतिरिक्त त्या ठरावातील मार्गदर्शक तत्त्वात कोणताही बदल करु नये. येथे निर्देशित केलेला अपवाद वगळता विखुरलेल्या स्वरुपात नसलेल्या उपरोल्लेखित इमारतीतील सेवानिवासस्थानांची विक्री ह्या ठरावातील मार्गदर्शक तत्त्वाच्या आधीन राहून करण्यात यावी.

**Item No.** 11 **Resolution No.** 1939

विषय : बनेवाडी कराड येथील ओगले ग्लास वर्क्सच्या कामगारांना दिलेल्या १०० गाळ्यांच्या विक्रीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बनेवाडी, कराड येथील पुणे मंडळाच्या वसाहतीतील ओगले ग्लास वर्क्स कंपनीच्या कामगारांना मालकी हक्काने देण्यात आलेल्या १०० गाळ्यांच्या विक्रीच्या हप्त्यापोटी कंपनीने कामगाराकडून वसूल केलेले परंतु मंडळास जमा न केलेली रक्कम कंपनीकडून वसूल करण्याबाबत पाठपुरावा करावा व ती वसूल केली जाईल असे बघावे. उरलेल्या विक्री किंमतीच्या रक्कम संबधित गाळेधारकाकडून वसूल करण्यात यावी.

**Item No.** 12 **Resolution No.**

विषय : नांदेड येथे नोबल एज्युकेशन सोसायटी या संस्थेस शाळेसाठी देण्यात आलेला गशाळा व भूखंड याविषयी.

ठराव :

**Item No.** 13 **Resolution No.** 1940

विषय : भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांना एल.पी.जी. सिलिंडर गोडाऊनसाठी वांद्रे (पूर्व) येथे भूखंड देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्वे क्रमांक ४२८, निर्मल नगर, वांद्रे (पूर्व), येथील नियोजित विकास आराखड्यात निवासी वापरासाठी आरक्षित असलेला सुमारे ८००० चौ.फूट क्षेत्रफळाचा भूखंड भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीस, कंपनीने त्या भूखंडावरील आरक्षण बदलून तो त्यांच्या वितरकास पोटभाड्याने द्यावा या अटीवर ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने एल.पी.जी. सिलिंडर गोडाऊनसाठी द्यावा. त्यासाठी प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमत विषयक धोरणानुसार जमिनीची प्रत्यक्ष किंमत आणि त्या जमिनीच्या विकासाचा खर्च मिळून येणाऱ्या रकमेच्या दुप्पट अधिमूल्य व अधिमूल्याच्या रकमेवर १ टक्का वार्षिक भाडेपट्टी आकारण्यात यावी. त्याचप्रमाणे जमिन भाडेपट्ट्याने देण्याच्या नेहमीच्या अटी व शर्ती लावण्यात याव्यात.

**Item No.** 14 **Resolution No.** 1940

विषय : श्रीमती आकांक्षा देशपांडे, यांना लायब्ररीकरिता १० बाय १५ फूट आकारमानाचा भूखंड विशेष बाब म्हणून वाटप करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्र. १९१-अ, येरवडा पुणे येथील वसाहतीतील व्यापारी संकुलनातील १२ भूखंडापैकी वाटप करण्यासाठी शिल्लक राहिलेल्या एका भूखंडाचे वाटप जाहिरात देऊन निविदा न मागविता पुणे मंडळाने दिलेल्या दिनांक २६ मार्च १९९१ च्या जाहिरातीच्या वेळी निविदा भरणाऱ्या निविदाधारक श्रीमती आकांक्षा देशपांडे, या अपंग महिलेस, दिनांक २६.३.१९९१ च्या जाहिरातीस अनुसरुन आलेल्या सर्वोच्च निविदेच्या दराप्रमाणे किंमत आकारुन विशेष बाब म्हणून वाटप करण्यात यावे, तसेच या निर्णयाबाबत शासनाची कार्योत्तर मान्यता मिळविण्यासाठी शासनाला कळविण्यात यावे.

---

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : भू-संपादन कायद्यांतर्गत म्हाडा कायद्यांतर्गत संपादित जमिनीवरील अनधिकृत बांधकाम नियमित करुन देण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 16 **Resolution No.**

विषय : संत तुकाराम नगर, पिंपरी येथील आर.ए. एज्युकेशन सोसायटीला दिलेल्या जागे प्रित्यर्थ भरलेल्या रकमेतील नफ्याची रक्कम माफ करणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 17 **Resolution No.** 1942

विषय : सोलापूर (एसपीए-१) येथील १६ उच्च उत्पन्न गट, ४८ मध्यम उत्पन्न गट व ९९ अल्प उत्पन्न गट अंतर्गत गाळे बांधकामाची निविदा मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, क्रमांक ३१२, एस.पी.ए.-१ या जमिनीवर उच्च उत्पन्न गट १६ गाळे, मध्यम उत्पन्न गट-४८ गाळे व अल्प उत्पन्न गट-९९ गाळे बांधण्यासाठी श्री. एम.जी. शिवत्रा, यांची निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमतीवर रू.५२,३५,७३५/- (रूपये बावन्न लक्ष पस्तीस हजार सातशे पस्तीस फक्त) ०.५० (शून्य पूर्णांक पन्नास शतांश टक्के) अधिक दराची निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी. त्यानुसार निविदा रक्कम रू.५२,६१,९१४/- (रूपये बावन्न लक्ष एकसष्ट हजार नऊशे चौदा फक्त) आहे.

---

**Item No.** 18 **Resolution No.** 1943

विषय : पंतनगर घाटकोपर येथील संक्रमण शिबीरामध्ये २२४ गाळे पुनर्विकसित करुन बांधणे - दोन गटामध्ये कामाचे ६४ गाळे व १६० गाळे याप्रमाणे विभाजन करुन निविदा मागविण्यासाठी प्राधिकरणाची मान्यता मिळविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतनगर, घाटकोपर येथील संक्रमण शिबीरामध्ये २२४ गाळे पुनर्विकसित करुन बांधण्याच्या कामास ६४ गाळे व १६० गाळे या प्रमाणे दोन गटामध्ये विभाजन करुन निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 19 **Resolution No.**

विषय : सोलापूर बिडी कामगार योजना ३०३८ गाळे थकबाकी वसूलीबाबत.

ठराव :

**Item No.** 20 **Resolution No.** 1944

विषय : हुडको अर्थसहाय्यित योजनांसाठी दि. १/४/१९९१ पासून अंमलात आलेली सुधारित प्रमाणपध्दती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, हुडको अर्थसहाय्यित योजनांसाठी दि.१/४/१९९१ पासून अमलात आलेली सुधारित प्रमाणपध्दतीसंबंधी नोंद घेऊन, प्राधिकरण राबवित असलेल्या निरनिराळ्या उत्पन्न गटातील योजनासाठी कौटुंबिक मासिक उत्पन्नाचे दर, गाळ्यांची/भूखंडाची कमाल किंमत/कर्जाची कमाल रक्कम, व्याजाचा दर, परतफेडीचा कालावधी यासंबंधी हुडकोची दि.१/४/१९९१ पासून अस्तित्वात आलेली प्रमाणपध्दती प्राधिकरणाने अवलंबन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 21 **Resolution No.** 1945

विषय : श्री. ए.आर. मावे, वरिष्ठ सहाय्यक/जा.बँ.प्र. यांना जनसंपर्क अधिकारी (वर्ग-२) या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळल्याबद्दल अतिरिक्त वेतन मंजूर करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. ए. आर. मावे, वरिष्ठ सहाय्यक/जा.बँ.प्र. यांना जनसंपर्क अधिकारी वर्ग-२/जां.बँ.प्र. या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक १४/२/१९९१ पासून पुढे एक वर्षासाठी अथवा जा.बँ.प्र. विभागाची कालमर्यादा किंवा पर्यायी व्यवस्था होईपर्यंत यापैकी जो कालावधी कमी असेल त्या कालावधीपर्यंत सांभाळण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळण्याबद्दल श्री. ए.आर. मावे, यांना त्यांच्या संभाव्य वेतनाच्या १० टक्के दराने अथवा दरमहा रू. ५००/- एवढ्या मर्यादेपर्यंत जे कमी असेल ते अतिरिक्त वेतन मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **22** | **Resolution No.** | **1946** |
|---|---|---|---|

विषय : वर्सोवा सर्व्हे नं. १२० आणि मुलुंड नं. ३८६ या क्षेत्राच्या कंत्राटदारास मालमत्तेच्या देखरेखीच्या क्षेत्ररक्षण व पहारा करण्याच्या कामाचा मोबदला पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, जागतिक बँक प्रकल्पाच्या वर्सोवा येथील सर्व्हे क्रमांक १२० आणि मुलुंड येथील सर्व्हे क्रमांक ३८६ या क्षेत्राची राखण व पहारा करण्यासंबंधीची कालमर्यादा अनुक्रमे दिनांक १/१०/१९९१ ते दि. ३१/३/१९९२ पर्यंत आणि १४/८/१९९१ पासून दि. १३/२/१९९२ पर्यंत प्रत्येकी ६ महिने पर्यंत वाढविण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **23** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या एचडीएफसी या वित्तीय संस्थेकडून रू. १० कोटींचे कर्ज मिळविण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **24** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यातील निवडलेल्या चार विकास केंद्राचे ठिकाणी प्राधिकरणातर्फे गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी होकार देण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **25** | **Resolution No.** | **1947** |
|---|---|---|---|

विषय : हिंदूजा रूग्णालयात बायपास कारोनरी शस्त्रक्रिया करण्यात येणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २९/४/१९८५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वैद्यकीय रूग्णालयाच्या यादीमध्ये हिंदूजा रूग्णालयाचा समावेश करुन, अशा रूग्णालयात बायपास शस्त्रक्रियेसाठी उपचार करुन घेतल्यास त्याबाबतची वैद्यकीय खर्चाची संपूर्ण प्रतिपूर्ती प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी वर्गाला अनुज्ञय ठरविण्यास व त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २१/८/१९८५ च्या निर्णय क्रमांक एम.ए.जी.१०८३/४११९ पीएच-९ मधील अटींच्या अधीन राहून रू. ४५,०००/- या कमाल मर्यादेपर्यंत अग्रीम मंजूर करण्यास उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
त्याचप्रमाणे श्री.जी.व्ही. जोग वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांना उपरोक्त शासकीय निर्णयानुसार उपाध्यक्ष/तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांच्या मान्यतेने, प्राधिकरण आदेश क्रमांक एमएच/आरईजी/१३९१/४८३/प्र.-५, दिनांक ३१/७/१९९१ नुसार मंजूर केलेल्या रू. ४५,०००/- (रूपये पंचेचाळीस हजार फक्त) या अग्रीमाच्या रकमेस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 25 **Resolution No.** 1947

विषय : हिंदूजा रूग्णालयात बायपास कारोनरी शस्त्रक्रिया करण्यात येणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २९/४/१९८५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वैद्यकीय रूग्णालयाच्या यादीमध्ये हिंदूजा रूग्णालयाचा समावेश करुन, अशा रूग्णालयात बायपास शस्त्रक्रियेसाठी उपचार करुन घेतल्यास त्याबाबतची वैद्यकीय खर्चाची संपूर्ण प्रतिपूर्ती प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी वर्गाला अनुज्ञय ठरविण्यास व त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २१/८/१९८५ च्या निर्णय क्रमांक एस.ए.जी.१०८३/४१११ पीएच-९ मधील अटींच्या अधीन राहून रू. ४५,०००/- या कमाल मर्यादेपर्यंत अग्रीम मंजूर करण्यास उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
त्याचप्रमाणे श्री.जी.व्ही. जोग वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांना उपरोक्त शासकीय निर्णयानुसार उपाध्यक्ष/तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांच्या मान्यतेने, प्राधिकरण आदेश क्रमांक एमएच/आरईजी/१३९१/४८३/प्र.-५, दिनांक ३१/७/१९९१ नुसार मंजूर केलेल्या रू. ४५,०००/- (रूपये पंचेचाळीस हजार फक्त) या अग्रीमाच्या रकमेस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** 26 **Resolution No.**

विषय : जमिन भूखंड क्रमांक १/१६ आदर्श नगर, वरळी क्षेत्र ७९८ चौ. मीटर सीटीझन्स को.ऑ. हौसिंग सोसायटीस वितरण करण्याविषयीचे शासनाचे आदेश.

ठराव :

---

**Item No.** 27 **Resolution No.** 1948

विषय : सर्व्हे क्रमांक २४, चिकनघर, कल्याण या जमिनीवर मध्यम उत्पन्न गट अंतर्गत १२० गाळे - उच्च उत्पन्न गट अंतर्गत ८० गाळे बांधण्याच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्रमांक २४ चिकनघर कल्याण या जमिनीवर मध्यम उत्पन्न गट अंतर्गत १२० गाळे - उच्च उत्पन्न गट अंतर्गत ८० गाळे बांधण्यासाठी मे. शंकर महादेव आणि कंपनी यांची निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमतीची रू. १,४१,०६,४८५/- (रू.एक कोटी एक्केचाळीस लक्ष, सहा हजार चारशे पंच्याऐंशी फक्त) यांवर वाटाघाटींने कमी करुन दिलेल्या २९.०७ टक्के (एकोणतीस पूर्णांक सात शतांश टक्के) अधिक दराची निम्नतम निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येते. त्यानुसार निविदेची रक्कम रू. १,८२,०७,२४०/- (रू.एक कोटी ब्याऐंशी लक्ष, सात हजार दोनशे चाळीस फक्त) येते.

**Item No.** **28** **Resolution No.** **1949**

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण वाळूंज विकास खर्च वसूलीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणांत नमूद केल्याप्रमाणे विकास खर्च पूर्ण क्षेत्राच्या (ग्रॉस एरिया) अनुपाताने रू. ४८/- प्रति चौ. मी. या दराने वसूल करण्यात यावा. सदर विकास खर्च प्रस्तावाप्रमाणे रेखांकनाच्या प्राथमिक मंजूरीच्या वेळेस १/३ दराने व अंतिम मंजूरीच्या वेळेस २/३ दराने जमिन विकसित करणाऱ्याकडून वसूल करण्यात यावा. ज्या प्रकरणात रेखांकन/विभाजन मंजूर करण्याचा प्रश्न येत असेल व बांधकाम करावयाचे असेल त्या प्रकरणांत बांधकाम परवानगी द्यावयाच्या पूर्वी १/३ व प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यापूर्वी २/३ दराने पूर्ण क्षेत्रावर (ग्रॉस एरिया वर) विकास खर्च वसूल करण्यात यावा. पूर्ण क्षेत्रातून (ग्रॉस एरिया मधून) संरचनात्मक आराखड्यातील रस्त्याचे क्षेत्र व म्हाडास द्यावयाचे १५ टक्के सार्वजनिक सुविधाचे क्षेत्र मात्र वगळण्यात यावे.

सदर विकासखर्च वसूलीबाबतची अट (कन्डीशन) मंजूरीच्या पत्रात अंतर्भूत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ४५ (१) अन्वये, शासनाची परवानगी मागण्यात यावी व ती अट आतापासून अंमलात आणावी व अमलात आणण्याबाबत शासनाच्या निदर्शनास आणण्यात यावे असे ठरविण्यात आले. विकास खर्च दर दोन वर्षांनी सुधारित करण्यात यावा व नवीन परवानगी मागण्यात येणाऱ्याकडून तो त्या सुधारित दराने मागण्यात यावा. पूर्वी ज्यांच्याकडून एका टप्प्यामध्ये विकासखर्च वसूल केला असेल त्यांच्याकडून जुन्याच दराने उरलेल्या टप्प्यातील विकासखर्च वसूल करण्यात यावा.

**Item No.** 29 **Resolution No.** 1950

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण, वाळूज गृहनिर्माणासाठी भू-संपादन व सार्वजनिक सुविधासाठी लागणाऱ्या जागेबाबत.

ठराव : एकमताने खालील प्रमाणे निर्णय घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. प्राधिकरणाने गृहनिर्माण निर्माणासाठी संपादन करावयाची जागा व निजी क्षेत्रात विकास करणाऱ्यांनी सार्वजनिक सुविधा वगैरेसाठी म्हाडास द्यावयाची १५ टक्के जागा भिन्न असून त्याची गल्लत करण्यात येऊ नये अशी प्राधिकरणाची पक्की धारणा आहे. तसेच संरचनात्मक आराखड्यात दर्शविलेली रस्त्याची जागा ही वरील दोन्ही जागापासून भिन्न असून ती रस्त्याची जागा निजी विकास प्रस्तावात वेगळी दाखविणे आवश्यक आहे व ती १५ टक्के मध्ये धरण्यात येऊ नये. रस्त्याची जागा संरचनात्मक आराखड्याच्या धोरणाप्रमाणे संपादन वा वाटाघाटीने मोबदला देऊन योग्य वेळी आवश्यकतेप्रमाणे मिळविण्यात यावी.

२. निजी क्षेत्रात विकासाचे प्रस्ताव करताना प्रत्येक मिळकतीतून १५ टक्के जागा सुविधासाठी म्हाडास देण्यात यावी व त्याकरिता पूर्वी केलेला ५ हेक्टर किंवा त्याहून मोठ्या जागेबाबतचा नियम या सर्वच मिळकतीबाबतीतील लागू करण्यास व त्याप्रमाणे विकास प्रस्तावाची छाननी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ह्या संबंधात शासनाकडे प्रस्ताव विधीवत कार्यप्रणालीस अनुसरुन प्राधिकरणाचे संरचनात्मक आराखड्यास मान्यता दिल्यावर करण्यात यावा. १५ टक्के मिळालेली जागा म्हाडाने सार्वजनिक सोयी सुविधासाठी वापरावी पण एक एकरहून लहान मिळकतीपासून प्राप्त झालेल्या १५ टक्के जमिनी सार्वजनिक सुविधासाठी वापरता येण्यासारख्या नसल्या तर अशा जागा विकाव्या व आलेल्या निधीतून आवश्यकतेप्रमाणे मोठ्या क्षेत्राचे भूखंड सुविधासाठी संपादित करावे किंवा सहजोडीने विकत घ्यावे ह्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 30 **Resolution No.**

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण वाळूज विशेष नियोजन प्राधिकरणाचे कार्य सिडकोच्या सुपूर्द करण्याच्या शासनाच्या प्रस्तावाबाबत.

ठराव :

---

**Item No.** 31 **Resolution No.** 1951

विषय : नागरी नूतनीकरण योजना

अंधारचाळ क्रमांक १८-२२-२६-३० अनंत गणपत पवार मार्ग काळाचौकी येथील पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत (टप्पा दोन) योजनेतील पुनर्बांधणी इमारतींच्या बांधकामाच्या निविदा मान्यतेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत नमूद केलेले मुद्दे विचारात घेऊन मे. राहूल कन्स्ट्रक्शन कंपनी यांची रू. ६३,१४,३०३/- (रू. त्रेसष्ट लक्ष चौदा हजार तीनशे तीन फक्त) या अंदाजित रकमेपेक्षा २९.८८ प्रतिशत अधिक असलेली निविदा मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 32 **Resolution No.**

विषय : कला विद्या मंदिर हायस्कूलला मजासवाडी, जोगेश्वरी (पूर्व) येथे शाळागृहाची शेड उभारण्यास अती तात्पुरत्या काळासाठी हस्तांतरित करण्यात आलेला भूखंड कायम स्वरुपात मिळण्याविषयी संस्थेची मागणी.

ठराव :

---

**Item No.** 33 **Resolution No.** 1952

विषय : धारावी येथील नकाशात दाखविलेल्या 'ई' या भूखंडाच्या अंतर्गत रस्त्याच्या आराखड्याला मान्यता देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, धारावी पुनर्विकास योजनेच्या आराखड्यास 'ई' या भागासाठी अंतर्गत रस्त्याच्या विकास योजनेच्या आराखड्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 34 **Resolution No.**

विषय : गाळे हस्तांतरण प्रकरणी ५ वर्षे वास्तव्याची सांकेतिक अट विचारात न घेता अनधिकृत गाळेधारकांच्या नावे गाळा नियमित करणे.

ठराव :

---

**Item No.** 35 **Resolution No.** 1953

विषय : श्री. जी. कु. कुलकर्णी यांची प्राधिकरणात मुख्य नियोजनकार म्हणून नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

श्री. जी. के. कुलकर्णी यांच्या नेमणूकीसाठी जागतिक बँक प्रकल्प विभागातील रु. ३००० ते ४५०० या वेतनश्रेणीतील वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार हे रिक्त असलेले पद मुख्य नियोजनकार म्हणून निर्देशित करून ते पद प्राधिकरणाच्या आस्थापनेवर परिवर्तित करण्यात यावे.

श्री. जी. के. कुलकर्णी यांची वरिष्ठ नियोजनकार म्हणून प्राधिकरणाच्या आस्थापनेवर परिवर्तित केलेल्या पदावर प्रारंभी ६ महिन्यांच्या कालावधीसाठी रु. ७९९९/- प्रतिमास या एकत्रित वेतनावर कंत्राटी पद्धतीने नेहमीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून नेमणूक करण्यात यावी.

---

**Item No.** 36 **Resolution No.**

विषय : मुंबई, ठाणे व पुणे येथील बैलच्या गाळ्यांच्या विक्रीबाबत.

ठराव :

---

**Item No.** 37 **Resolution No.**

विषय : लोक गृहनिर्माण प्रकल्प (मास हाऊसिंग प्रोजेक्ट)..

ठराव :

---

**Item No.** **37** **Resolution No.**

विषय : लोक गृहनिर्माण प्रकल्प
(मास हाऊसिंग प्रोजेक्ट).

ठराव :

**Item No.** **38** **Resolution No.**

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेखाली उपलब्ध होणाऱ्या जादा गाळ्यांची विक्रीबाबत.

ठराव :

**Item No.** **39** **Resolution No.** **1954**

विषय : आदर्श नगर, वरळी, मुंबई येथे मुंबई मंडळाने बांधलेल्या 'स्वातंत्र सैनिक भवन' या इमारतीचा उद्घाटन समारंभ.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मुंबई मंडळामार्फत आदर्श नगर, वरळी, मुंबई येथे बांधण्यात आलेल्या 'स्वातंत्र्य सैनिक भवन' या इमारतीच्या दिनांक १५ ऑगस्ट १९९१ रोजी झालेल्या उद्घाटन समारंभासाठी रु. ७५,०००/- व प्रसिद्धी आणि निमंत्रण पत्रिकेच्या छपाईसाठी रु. ५०,०००/- याप्रमाणे झालेल्या एकूण रु. १,२५,०००/- एवढ्या रकमेच्या खर्चास मंजूरी देण्यात येते.
त्याचप्रमाणे झालेल्या एकूण खर्चाचा बिगतवार तपशील प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत माहितीसाठी सादर करण्यात यावा.
यानंतर उपस्थितांनी माननीय अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 104 **Meeting Date** 19-Sep-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १५ ऑगस्ट १९९१ रोजी झालेल्या १०३ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.** 1955

विषय : श्री. ए. डी. रणदिवे, सेवानिवृत्त लघुलेखक (उच्चश्रेणी) यांची प्राधिकरणात कंत्राटी पद्धतीवर ६ महिन्यांकरिता नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या दिनांक ५.९.१९९१ च्या एमएच/एपीटी-१५९१/१२०७७/प्र-१० क्रमांकाच्या आदेशान्वये श्री. ए. डी. रणदिवे यांची लघुलेखक (उच्च श्रेणी) या पदावर कंत्राटी पद्धतीच्या नेहमीच्या अटी व शर्तीवर करण्यात आलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** 3 **Resolution No.** 1956

विषय : हुडको संस्थेतील श्री. एस. आर. सूरीन सहाय्यक मूल्यन अधिकारी यांची महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडको संस्थेतील श्री. एस. आर. सूरीन, सहाय्यक मूल्यन अधिकारी यांची हुडकोने विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्राधिकरणाच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने दोन वर्षांच्या कालावधीकरिता नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 3 **Resolution No.** 1956

विषय : हुडको संस्थेतील श्री. एस. आर. सूरीन सहाय्यक मूल्यन अधिकारी यांची महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडको संस्थेतील श्री. एस. आर. सूरीन, सहाय्यक मूल्यन अधिकारी यांची हुडकोने विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्राधिकरणाच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने दोन वर्षांच्या कालावधीकरिता नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 4 **Resolution No.** 1957

विषय : भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने ११ महिन्यांच्या लीव्ह ॲन्ड लायसेन्स तत्त्वावर पिठाच्या गिरण्या, नित्य जीवनोपयोगी गरजेच्या वस्तूंचे स्टॉल्स इत्यादीसाठी वाटप केलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने ११ महिन्यांच्या लीव्ह ॲन्ड लायसेन्स या तत्त्वावर पिठाच्या गिरण्यांसाठी किंवा व्यापारी कारणासाठी वाटप केलेल्या भूखंडांना दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने मुदतवाढ देताना नित्य जीवनावश्यक बाब या सबबीखाली अधिमूल्याच्या किंमतीमध्ये पेट्रोलपंपाच्या भूखंडाप्रमाणे दरामध्ये सवलत देण्याबाबत सरसकट विचार करण्यास येऊ नये. अत्यावश्यक परंतु कमी नफा मिळणारे व्यवसाय या सबबीखाली सवलत द्यावयाची झाल्यास ती पिठाची गिरणी, स्टोव्ह, सायकल दुरुस्ती, बिस्कीट स्टॉल इत्यादी यांना देण्यात यावी. त्या व्यतिरिक्त इतर व्यवसाय करणाऱ्या व्यापारी स्वरुपाच्या स्टॉलच्या भूखंडाच्या बाबतीत सवलतीचा दर लावण्यात येऊ नये. त्यांच्यासाठी निवासी दराच्या दुप्पट अधिमूल्य आकारण्यात यावे. मात्र मुदतवाढ भूखंड भाडेपट्ट्याने देण्याचा निर्णय घेतलेल्या दिनांकापासून देण्यात यावी. अनधिकृतपणे गाळा व्यापला असल्याने आढळून आल्यास त्यांचेकडून प्राधिकरणाच्या निर्णयानुसार दंड वसूल करण्यात यावा.

याप्रमाणे भाडेपट्टा वाढवून देण्याची कार्यवाही फक्त भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने ११ महिन्यांच्या लीव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर पिठाच्या गिरण्या व स्टॉलसाठी (दुकाने) वाटप करण्यास आलेल्या भूखंडाच्या बाबतीत करण्याचे अधिकार मंडळाचे मुख्य अधिकारी यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.** 1958

विषय : श्रीमती गुलाबी एन. शेट्टी यांना अंधेरी सर्व्हे क्रमांक १०६ अ येथे दिलेल्या पर्यायी जागेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

श्रीमती गुलाबी एन. शेट्टी यांना अंधेरी येथील सर्व्हे क्रमांक १०६ अ वरील २७० चौ. फूट क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने खालील अटींवर करण्यास मान्यता देण्यात येते.

१) सदर भूखंडाचा वापर निवासी कारणासाठी होता हे लक्षात घेऊन निवासी कारणासाठी लावण्यात येते. त्याप्रमाणे इतर सोयींवरील खर्च वगळता येणारी जमिनीची प्रत्यक्ष किंमत व तिचा विकासावरील खर्च एवढे अधिमूल्य आकारावे.

२) अधिमूल्याच्या अडीच टक्के एवढी वार्षिक भाडेपट्टी आकारावी व उर्वरित संपूर्ण चटईक्षेत्रासह होऊ शकणाऱ्या बांधकामासाठी प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतविषयक धोरणानुसार व्यापारी स्वरूपाच्या भूखंडाला आकारण्यात येते त्याप्रमाणे जमिनीच्या निवासी वापराच्या बाजारभावाच्या दुप्पट दराने अधिमूल्य आकारावे व त्यावर एक टक्का एवढी वार्षिक भाडेपट्टी आकारावी.

३) आकारणी करून येणाऱ्या दोनही अधिमूल्याच्या रकमेच्या बेरजेएवढे अधिमूल्य व वार्षिक भाडेपट्ट्यापोटी दोन्ही भाडेपट्ट्याच्या रकमेच्या बेरजेएवढी रक्कम या संपूर्ण भूखंडाच्या व चटईक्षेत्राच्या अधिमूल्यासाठी तसेच भाडेपट्ट्यापोटी स्वीकारण्यात यावी.

४) या भूखंडावरील बांधकामाचा वापर फक्त शालेय स्टेशनरी दुकानासाठी व निवासासाठी करावा यासह नेहमीच्या इतर अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात यावा.

---

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या गृहनिर्माण सहकारी संस्थांना भूखंड वाटपाबाबत केलेला प्राधिकरणाचा दिनांक ७/८ जानेवारी १९८५ चा ९६१ क्रमांकाचा ठराव शासनाकडून विलंबित केल्याविषयी.

ठराव :

**Item No. 7** **Resolution No. 1959**

विषय : औरंगाबाद मंडळाच्या नांदेड येथील लेबर कॉलनीमध्ये सरस्वती महिला मंडळ या संस्थेस लघुउद्योग सुरू करण्याकरिता भूखंडाचे वाटप करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, "
औरंगाबाद मंडळाच्या नांदेड येथील लेबर कॉलनीमध्ये म्हाडा लॅन्ड म्हणून वसाहतीच्या आराखड्यात राखीव असलेला अंदाजे ६०० चौ. मीटर क्षेत्रफळाचा भूखंड नांदेड येथील सरस्वती महिला मंडळ, कंधार या संस्थेस, खास बाब म्हणून लघुउद्योग वाटप करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) भूखंडावरील असलेले आरक्षण सदर संस्थेने बदलून घ्यावे ही जबाबदारी संस्थेची राहील.
२) भूखंड ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यात यावा.
३) प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतविषयक धोरणानुसार जमिनीची प्रत्यक्ष किंमत आणि त्या जमिनीच्या विकासाचा खर्च मिळून येणाऱ्या रकमेच्या दुप्पट अधिमूल्य व अधिमूल्याच्या रकमेवर १ टक्का वार्षिक भाडेपट्टी आकारण्यात यावी.
४) त्याचप्रमाणे जमीन भाडेपट्ट्याने देण्याच्या नेहमीच्या अटी व शर्ती लावण्यात यावी.
५) प्राधिकरणाच्या निर्णयास शासनाची मंजूरी घ्यावी.

**Item No. 8** **Resolution No. 1960**

विषय : नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील गोधनी रोड, यवतमाळ व शांतीनगर, नागपूर येथील गाळ्यांचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गोधनी रोड, यवतमाळ व शांती नगर नागपूर येथील गाळ्याची विक्री खाली दर्शविलेल्या अटी शिथील करण्यात येऊन करण्यात यावी.

१. उत्पन्न मर्यादेची अट नसावी.
२. गाळे वाटप्यापूर्वी सुरवातीस भरावयाची ५० टक्के रक्कम स्वीकारुन बाकी रक्कम दोन वर्षात योजना दराने घेण्यात यावी व त्यानंतर न भरलेल्या रकमेवर १६ टक्के दराने व्याज आकारुन वसूल करावी.
३. अर्जदारांना त्यांच्या पसंतीनुसार गाळ्यांचे वाटप करण्यात यावे.
४. एक अर्जदारास दोन गाळे घेण्याची सवलत देण्यात यावी.

**Item No.** 9 **Resolution No.** 1961

विषय : नांदेड येथे नोबल एज्युकेशन सोसायटी या संस्थेस शाळेसाठी देण्यात आलेला गाळा व भूखंड याविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, औरंगाबाद मंडळाने, नांदेड येथे नोबल एज्युकेशन सोसायटी या संस्थेस शाळेसाठी देण्यात आलेला भूखंड प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वाच्या अधिन राहून भूखंडाचे अधिमूल्य आकारुन व वार्षिक भाडेपट्टी आकारुन देण्यात आल्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येते. तसेच संस्थेच्या ताब्यात असलेला गाळा अनिवासी गाळ्याप्रमाणे तिप्पट किंमत आकारुन संस्थेस विक्री करण्याबाबत तिप्पट केलेल्या कार्यवाही सही मान्यता देण्यात येते. अशा प्रकारच्या केसेसमध्ये निर्णय घेण्यासाठी सर्वसाधारण आदेश निश्चित करण्यात यावे असे ठरले.

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : भूसंपादन कायद्याअंतर्गत/म्हाडा कायद्याअंतर्गत संपादित जमिनीवरील अनधिकृत बांधकाम नियमित करुन देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : संत तुकाराम नगर, पिंपरी येथील आर.ए. एज्युकेशन सोसायटीला दिलेल्या जागेप्रित्यर्थ भरलेल्या रकमेतील नफ्याची रक्कम माफ करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 12 **Resolution No.** 1962

विषय : छोट्या नगरपरिषदांच्या हद्दीत योजना राबविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, औरंगाबाद मंडळाच्या अखत्यारितील लोहा, भूखंड व निलंगा या 'क' वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीत अपवादात्मक व प्रायोगिक तत्त्वावर गृहनिर्माण योजना हाती घेण्यात प्राधिकरणाने तत्त्वतः मान्यता दिली आहे. तथापि, औरंगाबाद मंडळाकडून लाभधारकाची आर्थिक कुवत (रिपेमेंटची क्षमता) तपासून घ्यावी व भाडेखरेदी हप्त्यांच्या वसुलीची जबाबदारी स्पष्टपणे उचलावी. या योजनेस अंतिम स्वरुप देण्यापूर्वी ठोस मागणी नोंदावण्याच्या दृष्टीने १० टक्के अनामत रक्कम संबंधित नगरपरिषदांकडून जमा करुन घेण्यात यावी अन्य ठिकाणी केवळ भूखंडाच्या योजना हाती घेण्यात याव्यात असे ठरले.

| Item No. | 13 | Resolution No. | 1963 |
|---|---|---|---|

विषय : सोलापूर बिडी कामगार योजना ३०३८ गाळे - थकबाकी वसुलीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गाळेधारकांकडून यापुढे नियमित भाडे खरेदी हप्त्यांची वसुली होणार की नाही यासंबंधी अनिश्चितता दिसून येत असल्यामुळे कर्जाची सव्याज परत फेडीपोटी हुडकोला भरावयाची रक्कम शासनाने प्राधिकरणाला उपलब्ध करुन द्यावी. थकबाकीची सक्तीने रक्कम वसुल करण्यासाठी पावले उचलावीत, तसे शासनास कळविण्यात यावे.

| Item No. | 14 | Resolution No. | 1964 |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे कमांक ५६, चितळकर, मानपाडा येथे संमिश्र गृहनिर्माण योजनेअंतर्गत उपकामानिहाय वेगवेगळ्या गटामध्ये कामाचे विभाजन करुन निविदा मागविण्यासाठी प्राधिकरणाची मान्यता मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्रमांक ५६ चितळकर, मानपाडा येथे संमिश्र गृहनिर्माण योजना बांधण्याच्या कामाचे विभाजन खालीलप्रमाणे सात गटामध्ये करुन निविदा मागविण्यात मान्यता देण्यात येते.

१. मध्यम उत्पन्न गट - १ अंतर्गत १८० गाळे (सेप्टीक टँकसह) बांधणे.
२. मध्यम उत्पन्न गट - २ अंतर्गत ६० गाळे (सेप्टीक टँकसह) बांधणे.
३. उच्च उत्पन्न गट अंतर्गत ४८ गाळे (सेप्टीक टँकसह) बांधणे.
४. माती भरणी, रस्त्याची कामे, घाण पाण्याच्या गटाराची कामे, निःसारण कामे.
५. बाह्य पाणी पुरवठ्याची कामे.
६. अंतर्गत विद्युतीकरणाची कामे.
७. पंपींग यंत्रणेची कामे.

| Item No. | 15 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : कला विद्या-मंदिर हायस्कूलला मजासवाडी, जोगेश्वरी (पूर्व) येथे शाळागृहाची तात्पुरती शेड उभारण्यास अति तात्पुरत्या काळासाठी हस्तांतरीत करण्यात आलेला भूखंड कायम स्वरुपात मिळण्याविषयी संस्थेची मागणी.

ठराव :

| Item No. | 16 | Resolution No. | 1965 |
|---|---|---|---|

विषय : मुंबई बेटावरील उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्रचनेच्या विशेष प्रकल्प टप्पा ३० इमारती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मूळ ३० इमारतींच्या पुनर्बांधणी योजनामधून परिशिष्ट 'क' मध्ये नमूद केलेल्या एकूण ९ इमारती वगळून त्या इमारतीऐवजी दुसऱ्या ९ इमारतींचा समावेश करुन सुधारित ३० इमारतींच्या पुनर्बांधणी प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात येते.

या इमारतीमधील काही गाळे एल.आय.सी/जी.आय यांना त्यांच्या निमशासकीय कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थान म्हणून विक्री करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 17 **Resolution No.** 1966

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पास ३१ मार्च १९९१ नंतरही मुदतवाढ देऊन अतिरिक्त अनुदानाची तरतूद करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पा अंतर्गत सुरु असलेल्या धारावी पुनर्विकास योजना, झोपडपट्टी श्रेणीवाढ योजना, झोपडपट्टीवासीयांचे पुनर्रचित इमारतीत पुनर्वसन, मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारतींचे नागरी नुतनीकरण या मुंबईच्या प्रचंड वाढलेल्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेल्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी सुरु केलेल्या परंतु अपूर्ण कामाची तसेच अद्याप हाती घ्यावयाच्या कामाची व्याप्ती फार मोठी असल्याने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाअंतर्गत 'राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्पास' या घटकास २८ फेब्रुवारी १९९२ नंतर ५ वर्षे मुदतवाढ देण्याबाबत व त्यासाठी रू. २०० कोटीचे विशेष अनुदान मिळविण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 18 **Resolution No.** 1967

विषय : कांदिवली व मुलुंड येथील मोकळे भूखंड, उच्च उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट योजनेखाली विक्री करण्यासाठी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, या प्रत्येक भूखंडासाठी उच्चतम कायदेशीर निविदा धारकांनी (हायस्ट लीगल बीडर) किंमतीपोटी नियमानुसार रक्कम भरलेली असेल तर त्यांच्या निविदा मंजूर करण्यात याव्यात, व उर्वरीत रक्कम त्यांना त्वरीत भरण्यास कळवावे. त्याखेरीज इतर भूखंडासाठी पुन्हा निविदा मागविण्यासाठी वृत्तपत्रातून जाहिरात देण्यात यावी, व पूर्वीच्या माहिती पुस्तिकेत असलेल्या त्रुटी सुधारण्यात याव्यात.
या भूखंडावर बांधकाम करण्यात येणाऱ्या इमारतींच्या गाळ्यांचे बांधकाम १०० चौ. मी. पेक्षा अधिक असू नये. ज्या निविदाधारकांनी रक्कमा भरलेल्या आहेत, पण ते पात्र ठरलेले नाहीत, त्यांना आठ टक्के व्याजाने रक्कमा परत करण्यात याव्यात असे ठरले.

**Item No.** 19 **Resolution No.** 1968

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पातर्फे राबविण्यात येणाऱ्या नागरी नुतनीकरण योजनेखाली उपलब्ध होणाऱ्या जादा गाळ्यांच्या विक्रीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाअंतर्गत बांधलेल्या इमारतीत उपलब्ध झालेले अतिरिक्त जादा गाळ्यांच्या विक्रीमध्ये मूळ भाडेकरूस दिली जाणारी २५ टक्के सूट यापुढे देण्यात येऊ नये, तसेच ज्या भाडेकरुना यापुढे बांधिलकी (कमीटमेंट) दिली आहे, अशाना जुने दर लावण्यात यावेत, व इतराना नवीन दर लागू पडतील. कोणास जुन्या दराची बांधिलकी (कमीटमेंट) दिली ह्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार संचालकांना राहील.

**Item No.** 20 **Resolution No.** 1969

विषय : जुळे सोलापूर १ व २ परिसरातील अनधिकृत बांधकामे कंपांऊंडींग फी आकारुन नियमित करणेस मान्यता मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात नमूद केल्याप्रमाणे शासनाने प्रन्यासासाठी मान्य केलेले नियम किरकोळ स्वरुपाच्या नियमबाह्य विकास नियमित करण्यास पुणे मंडळास सोलापूर १ व २ मधील क्षेत्राबाबत अधिकार देण्यास मान्यता देण्यात येत आहे. इतर विभागीय मंडळामार्फत अशा प्रकारची कार्यवाही करण्यासाठी मुख्य अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.
विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर आयत्यावेळी खालील प्रस्ताव विचारार्थ घेण्यात आले.

**Item No.** 21 **Resolution No.** 1670

विषय : बोरीवली येथे उड्डाण पुलासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस द्यावयाच्या 'राजेंद्र नगर' या प्राधिकरणाच्या वसाहतीतील जमिनीवरील गाळ्यात रहाणाऱ्यांना पर्यायी निवासी भूखंड वाटप करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बोरिवली येथील रेल्वे उड्डाण पुलासाठी महानगरपालिकेस राजेंद्र नगर बोरिवली या वसाहतीमधील पाहिजे असलेली प्राधिकरणाची जमीन एम.आर.टी.पी. कायद्याखाली हस्तांतरीत करण्याच्या दृष्टीकोनातून जी जमिन मोकळी करुन घेण्याकरिता त्या जमिनीवर असलेल्या बैठ्या चाळी क्रमांक ११, १२ आणि १७ मधील १८ गाळेधारकांना पर्यायी जागा म्हणून तेथे रेखांकित केलेले २३७.७५ चौ. मीटर आणि ४६९ चौ.मीटर क्षेत्रफळाचे २ भूखंड भाडेपट्टयाने प्राधिकरणाच्या जमीनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार वाटप करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 22 **Resolution No.** 1971

विषय : सर्व्हे क्रमांक ७३१/१ करवीर कोल्हापूर येथे मध्यम उत्पन्न गट-२ अंतर्गत १०० गाळे बांधकामाची निविदा मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्रमांक ७३१/१ करवीर कोल्हापूर येथे मध्यम उत्पन्न गट-२ अंतर्गत १०० गाळे बांधण्यासाठी मे. शिवप्रसाद कन्स्ट्रक्शन यांची निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमतीत रू. ४५,२६,३९३/- (रू.पंचेचाळीस लक्ष सव्वीस हजार तीनशे त्र्याण्णव फक्त) २५ टक्के (पंचवीस टक्के) अधिक दराची निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी त्यानुसार निविदा रक्कम रू. ५६,५७,९९१/- (रू. छप्पन्न लक्ष, सत्तावन्न हजार नऊशे एक्याण्णव फक्त) आहे.

**Item No.** 23 **Resolution No.** 1972

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण-वाळूज-अधिसूचित क्षेत्रातील विकासावर नियंत्रण तसेच जमिनीचा वापर यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ चे कलम २९ (१) (क) अन्वये प्राधिकरणाच्या वतीने नगररचना अधिनियमाखाली विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्य/कर्तव्ये पार पाडण्याकरिता औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास निर्देशन देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, (महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे प्रकरण (४) प्रमाण) विशेष नियोजन प्राधिकरण वाळूज अधिसूचित क्षेत्रातील विकासावर नियंत्रण तसेच जमिनीचा योग्य वापर यासाठी प्राधिकरणाच्या वतीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ चे कलम २९ (१) (क) अन्वये नियोजन प्राधिकरण म्हणून प्राधिकरणापर्फे कार्य करण्याचे अधिकार औरंगाबाद मंडळास प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.
त्याचप्रमाणे या ठरावान्वये मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी दिनांक १७/९/१९९१ रोजी मा.अध्यक्षांच्या संमतीने प्राधिकरणाची अनुमती गृहीत धरुन याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या कार्यालयीन आदेशासोबतच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 24 **Resolution No.** 1973

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना नैमत्तिक रजेचे रोखीकरण करण्यास परवानगी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्रशासक/प्राधिकरण यांचा ठराव क्रमांक १४९७ दिनांक २८.१२.१९८७ नुसार अत्यावश्यक सेवेतील कामगारांना त्यांच्या खाती वर्षअखेर शिल्लक असलेल्या किरकोळ रजेचे रोखीकरण करण्याबाबत घेतलेल्या आलेला निर्णयानुसार रोखीकरण चालू ठेवावे. मात्र याबाबतचा सुधारित प्रस्ताव शासनाला पाठविण्यात यावा.

**Item No.** 25 **Resolution No.** 1974

विषय : जागतिक बँक प्रकल्प अंतर्गत ९४६५ विकसित भूखंडाचे वाटप कोड नं. ०९१ व ०१२ चारकोप – अपील अधिकारी नेमण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणांतर्गत जागतिक बँक प्रकल्पाच्या आस्थापनेवर प्राधिकरणाच्या सेवेतून वर्ग १ व २ या श्रेणीमधून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांमधून कंत्राटी पद्धतीने अपील अधिकारी म्हणून १५ कार्यक्षम अशा सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची दरमहा रु. ४,५००/- या एकत्रित वेतनावर कंत्राटी पद्धतीच्या नेहमीच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रथम ३ महिन्यांच्या कालावधीसाठी दिनांक १.१०.१९९१ पासून नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र अशा अधिकाऱ्यांची नेमणूक करताना संचालक, जा. बँ. प्र. यांनी याबाबत सचिव/प्राधिकरण व मुख्य अधिकारी मुं. मं. यांच्याशी विचारविनिमय करून नंतरच कार्यवाही करावी.

| **Item No.** | **26** | **Resolution No.** | **1975** |
|---|---|---|---|

विषय : मालवणी सर्व्हे क्रमांक २६३ येथील ४३.३० हेक्टर जमिनीवरील विभाग -१ च्या भरावयाच्या कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव : मालवणी सर्व्हे क्रमांक २६३ येथील ४३.३० हेक्टर जमिनीवरील भरावयाच्या कामाची विभाग - १ साठी, मे. एस. एन. ठक्कर यांची पर्याय १ साठी रु. ३,२५,४८,७१७/- (रु. तीन कोटी पंचवीस लक्ष अठ्ठेचाळीस हजार सातशे सतरा फक्त) निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **27** | **Resolution No.** | **1976** |
|---|---|---|---|

विषय : मालवणी सर्व्हे क्रमांक २६३ येथील ४३.३० हेक्टर जमिनीवरील विभाग - २ च्या भरावयाच्या कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, मालवणी सर्व्हे क्रमांक २६३ येथील ४३.३० हेक्टर जमिनीवरील भरावयाच्या कामाची विभाग - २ साठी मे. राधाकृष्णन केवलराम यांची पर्याय १ साठी रु. ३,१७,८०,६२६/- (रु. तीन कोटी सतरा लक्ष ऐंशी हजार सहाशे सव्वीस फक्त) ची निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

विषय सूचीवरील व आयत्यावेळी विचारार्थ ठेवण्यात आलेले प्रस्ताव संपल्यानंतर मुंबई मंडळामार्फत (वास्तुशास्त्रीय विभाग) कार्यालयीन इमारतींचा विचार करण्यासाठी नेमलेल्या द्विसदस्य समितीचा अहवाल प्राधिकरणाच्या माहितीसाठी सादर करण्यात आला त्याची प्राधिकरणाने नोंद घेतली.

या विषयाच्या प्रस्तावावर चर्चा करताना मुख्य अभियंता/प्रा. यांनी कार्यालयीन वापरासाठी बांधलेल्या इमारतीचे २ संवर्ग असावेत असे सुचविले. या चर्चेत प्राधिकरण सदस्य डॉ. खेडेकर व श्री. मांजरेकर यांनी भाग घेतला. मुंबई मंडळाचे वास्तुशास्त्रज्ञ श्री. मंडलेकर यांनी दिनांक २.८.१९९१ च्या पत्राचे अनुषंगाने थोडक्यात माहिती करून दिली. या विषयाचे महत्व लक्षात घेऊन समितीच्या अहवालावर निर्णय घेण्यासाठी हा विषय प्राधिकरणाच्या विचारार्थ पुन्हा ठेवण्यास यावा असे ठरविण्यात आले.

यानंतर उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 105 **Meeting Date** 23-Oct-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १९.९.१९९१ रोजी झालेल्या १०४ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १९.९.१९९१ रोजी झालेल्या १०४ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करावयाच्या कार्यवाहीचा पाठपुरावा.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 1977

विषय : लेखाधिकारी वर्ग-१ च्या वेतनश्रेणीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
लेखाधिकारी वर्ग-१ अथवा मुख्य लेखाधिकारी (प्रादेशिक मंडळे) यांचे सध्याचे वेतन जे रु. २२००-७५-२८००-द.रो.-१००-३७०० यात सुधारणा करून उपमुख्य अधिकारी या पदास असलेले रु. २२००-७५-२८००-द.रो.-१००-४००० एवढे वेतनमान दिनांक १.१.१९८६ पासून देण्यास प्राधिकरण मान्यता देते. तथापि, शासनाकडे पाठविण्यात येणाऱ्या प्रस्तावास महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटनेच्या पत्राचा उल्लेख करण्यात यावा.

**Item No.** 4 **Resolution No.** 1978

विषय : डॉ. अे. टी. वागळे, यांच्या रिटेनर पद्धतीवर केलेल्या नेमणूकीस मुदतवाढ देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाने डॉ. ए. टी. वागळे यांची मासिक रु. २००/- वर रिटेनर म्हणून केलेली नेमणूक योग्य असल्याने त्यांना प्राधिकरणाच्या दिनांक १.१०.९१ च्या आदेशान्वये रिटेनर म्हणून पुढील आदेशापर्यंत देण्यात आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.** 1979

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवर विशेष कार्य अधिकारी दर्जाच्या पदास १ वर्षाची मुदतवाढ मिळण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवर विशेष कार्य अधिकारी या पदाचा कालावधी दिनांक २७.९.९१ पासून आणखी १ वर्षाने दि. २६.९.९२ पर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याप्रमाणे शासनास कळविण्यात यावे.

---

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : चिकणघर कल्याण येथील सर्व्हे क. ४१, हिस्सा क. ६ व सर्व्हे क. ४२, हिस्सा क. १२ येथील ९६० चौ. मी. जमीन त्यांच्या मालकांना भाडेपट्ट्याने देण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 7 **Resolution No.** 1980

विषय : सोलापूर सोशल असोसिएशन या शैक्षणिक संस्थेला सोलापूर भाग - २ येथे माध्यमिक शाळेसाठी वाटप केलेल्या भूखंडाच्या अधिमूल्यावरील व्याज कमी करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शैक्षणिक संस्थेचे काम असल्यामुळे अपवादात्मक बाब म्हणून संस्थेची विनंती मान्य करून पुणे मंडळाने २१ टक्के व्याजाप्रमाणे आकारलेली रक्कम रु. ३१,७७६/- माफ करण्यास मान्यता देण्यात येत आहे असे ठरले.

---

**Item No.** 8 **Resolution No.** 1981

विषय : कलाविद्या मंदिर हायस्कूलला मजासवाडी, जोगेश्वरी (फ) येथे शाळागृहाची तात्पुरती शेड उभारण्यास अतितात्पुरत्या काळासाठी हस्तांतरित करण्यात आलेला भूखंड कायम स्वरुपात मिळण्याची संस्थेची मागणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कलाविद्या मंदिर हायस्कूलला मजासवाडी, जोगेश्वरी येथील प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेच्या अभिन्यासातील भूखंड क. अ-१० क्षेत्र ५८० चौ. मी. खालील अटींवर ३० वर्षे मुदतीच्या भाडेपट्टा कराराने वितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
१. संस्थेत अती तात्पुरत्या कालावधीसाठी भूखंड ताब्यात दिल्याच्या दिनांकापासून प्राधिकरणाने ३० वर्षे मुदतीच्या भाडेपट्ट्याने भूखंड वितरण करण्यास मंजूरी दिलेल्या दिनांकापर्यंतचे भाडे संस्थेस द्यावे लागेल.
२. प्राधिकरणाच्या किंमत विषयक धोरणानुसार भूखंड क. अ-१० साठी अधिमूल्य रक्कम इत्यादी संस्थेस द्यावी लागेल.

---

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : भू-संपादन कायद्यांतर्गत/म्हाडा कायद्यांतर्गत संपादित जमिनीवरील अनधिकृत बांधकाम नियमित करून देण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 10 **Resolution No.** 1982

विषय : नेहरू नगर, कुर्ला (पू), मुंबई ४०० ०२४ येथील इमारत क्र. ८६ मधील खो. क्र. २९८१ ते २९८८ एकूण ८ खोल्या, इमारत क्र. ८७ मधील खो. क्र. ३०३१ ते ३०३४ एकूण ४ खोल्या सर्व मिळून १२ खोल्या एकरकमी खरेदी तत्वावर मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शाळेच्या वापरासाठीच गाळ्यांचा वापर व्हावा व संस्थेने सदरहू गाळे स्वतःच्या खर्चाने दुरुस्त करून घ्यावेत या अटीवर संस्थेला ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने १२ गाळे देण्यात मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 11 **Resolution No.** 1983

विषय : केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यातील निवडलेल्या ४ विकास केंद्राचे ठिकाणी प्राधिकरणातर्फे गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी होकार देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणात नमूद केल्याप्रमाणे काम करण्यास तक्रारी असल्याचे शासनास कळविण्यात यावे.

---

**Item No.** 12 **Resolution No.** 1984

विषय : नागपूर जिल्ह्यातील व अमरावती जिल्ह्यात म्हाडाकडे देण्यात आलेल्या मोवाड, खैरगाव, आमनेर, गणेशपूर आणि वरुड येथील पूरग्रस्तांच्या गृहनिर्माण प्रकल्पासाठी मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांना रु. ५० लक्ष पर्यंत मसुदा निविदा पत्र व तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पूरग्रस्तांच्या प्रकल्पासाठी जी कामे प्राधिकरणाकडे शासनाने सोपविलेली आहेत, त्या कामांकरिता मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांना मसुदा निविदापत्रे व तांत्रिक मंजूरी यासाठी कमाल रु. ५०,००,०००/- (रु. पन्नास लक्ष फक्त) पर्यंतची मर्यादा वाढवून देण व तसेच कामाची विभागणी करून देण्याच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या आदेशात कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. मात्र ही मंजूरी फक्त पुनर्वसनांच्या प्रकल्पापुरतीच मर्यादित राहील.

---

**Item No.** 13 **Resolution No.** 1985

विषय : 'परिसर परिचय' या त्रैमासिक अंकाच्या छपाईबाबत निविदा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
'परिसर परिचय' या त्रैमासिक अंकाच्या छपाईबाबत मे. सर्वोदय प्रिंटर्स यांची निविदा मंजूर करून त्यांना १ वर्षासाठी छपाईचे काम देण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 14 **Resolution No.** 1986

विषय : एस. एम. जोशी, सोशलिस्ट फाऊंडेशन या संस्थेस पुणे येथील व्यापारी संकुल - १ लक्ष्मी नगर मधील व्यापारी गाळा क्र. ३ व कार्यालयीन गाळा क्र. १ देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सदरील संस्थेला व्यापारील संकुल १, लक्ष्मी नगर मधील व्यापारी गाळा क्र. ३ (ज्याचे क्षेत्रफळ २४० चौ. फूट आहे) प्रोरेटावर देण्याची शिफारस शासनाकडे करण्यात यावी.
विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर आयत्यावेळी खालील प्रस्ताव विचारार्थ घेण्यात आले.

---

**Item No.** 15 **Resolution No.** 1987

विषय : श्री. के. के. दानव यांना रामबाग वसाहतीमधील गाळा क्र. ९/११ यांचा फेरताबा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. के. के. दानव, यांचेकडून रामबाग वसाहतीमधील गाळा क्र. ९/११ या गाळ्याचा ताबा घेतल्यापासून परत रीतसर ताबा देण्याच्या कालावधीपर्यंतचे भाडे वसूल करून अपवाद म्हणून गाळ्याचा फेरताबा देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 16 **Resolution No.**

विषय : सर्व्हे क्र. ७ आणि ८ वांद्रे (प.) येथील प्राधिकरणाच्या जमिनीवर नियोजित योजना राबविण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 17 **Resolution No.** 1988

विषय : चारकोप स. नं. ४१ (भाग) येथील ४६.७७ हेक्टर जमिनीवरील विभाग १ च्या भरावाच्या कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
चारकोप सर्व्हे नं. ४१ (भाग) येथील ४६.७७ हेक्टर जमिनीवरील भरावाच्या कामाची विभाग - १ साठीची मे. एम. वाय. कन्स्ट्रक्शन यांची रु. ३,११,६८,४०२/- (रु. तीन कोटी अकरा लक्ष अडुसष्ट हजार चारशे दोन फक्त) (सुधारित अंदाजपत्रकाच्या ९.२० टक्के अधिक) निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 17 **Resolution No.** 1988

विषय : चारकोप स. नं. ४१ (भाग) येथील ४६.७७ हेक्टर जमिनीवरील विभाग १ च्या भरावाच्या कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
चारकोप सर्व्हे नं. ४१ (भाग) येथील ४६.७७ हेक्टर जमिनीवरील भरावाच्या कामाची विभाग - १ साठीची मे. एस. वाय. कन्स्ट्रक्शन यांची रु. ३,११,६८,४०२/- (रु. तीन कोटी अकरा लक्ष अडुसष्ट हजार चारशे दोन फक्त) (सुधारित अंदाजपत्रकाच्या ९.२० टक्के अधिक) निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 18 **Resolution No.** 1989

विषय : चारकोप स. नं. ४१ (भाग) येथील ४६.७७ हेक्टर जमिनीवरील विभाग - २ च्या भरावाच्या कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
चारकोप स. नं. ४१ (भाग) येथील ४६.७७ हेक्टर जमिनीवरील भरावाच्या कामाची विभाग - २ साठीची मे. मनोहरलाल गुप्ता आणि कंपनी यांची रु. ३,००,०७,२५५/- (रु. तीन कोटी सात हजार दोनशे पंचावन्न फक्त) (सुधारित अंदाज पत्रकाच्या ७.७५ टक्के अधिक) निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 19 **Resolution No.** 1990

विषय : पुसद, जि. यवतमाळ येथील पूरग्रस्तांच्या गृहनिर्माण प्रकल्पाखाली मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांना अभियांत्रिकी कामाचे विभाजन करण्याचे आदेश देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुसद, जि. यवतमाळ येथे पूरग्रस्त प्रकल्पासाठी जी कामे शासनाने प्राधिकरणाकडे सोपविलेली आहेत त्या कामाकरिता जिल्हा निविदा समितीच्या सल्ल्याने मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांना या कामाचे विभाजन करून देण्याच्या कृतीस मान्यता देण्यात येत आहे. मात्र ही मान्यता केवळ पुनर्वसनाच्या या प्रकल्पापुरतीच मर्यादित राहील.

**Item No.** 20 **Resolution No.** 1991

विषय : वर्धा येथील मध्यम उत्पन्न गटाच्या गाळ्यांचे वाटप करण्याच्या श्रीमती राधिकाबाई मेघे मेमोरियल मेडिकल ट्रस्ट यांची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर्धा येथील मध्यम उत्पन्न गटाच्या बाब टिप्पणात नमूद केल्याप्रमाणे ३१ गाळ्यांचे वाटप श्रीमती राधिकाबाई मेघे मेमोरियल मेडिकल ट्रस्ट या संस्थेस खालील अटींवर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. नागपूर मंडळाच्या पत्र क्र. १४०५७ दि. १६.१०.९१ च्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे गाळ्यांच्या संपूर्ण रकमेचा भरणा करावा.
२. गाळ्यांचा वापर मुलींच्या वसतिगृहासाठीच व्हावा.
३. वसतिगृहापासून वसाहतीतील रहिवाशांना उपद्रव पोहचणार नाही याची संस्थेने दक्षता घ्यावी.
४. या गाळ्यांचे अभिहस्तांतरण होईपर्यंतच्या कालावधीसाठीच सेवा आकार इ. आवश्यक त्या देय रकमा संस्थेने भरल्या पाहिजेत.

विषयसूचीवरील व आयत्यावेळी विचारार्थ ठेवण्यात आलेले प्रस्ताव संपल्यानंतर श्री. मांजरेकर, सदस्य/प्राधिकरण यांनी प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सन १९९०-९१ या वित्तीय खर्चासाठी तदर्थ बोनस देण्याची विनंती केली.

**Item No.** 21 **Resolution No.** 1992

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सन १९९०-९१ या वित्तीय वर्षासाठी तदर्थ बोनस देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सन १९९०-९१ या वित्तीय वर्षासाठी राज्य शासकीय कर्मचारी आणि इतर यांना २९ दिवसांच्या वित्तलब्धी एवढा शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना मंजूर केलेला तदर्थ बोनस प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर बोनसाची रक्कम अदा करण्यात यावी.
यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 106 Stay **Meeting Date** 29-Nov-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय :

ठराव :

**Meeting No.** 106 **Meeting Date** 11-Dec-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २३.१०.१९९१ रोजी झालेल्या १०५ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १९.९.१९९१ रोजी झालेल्या १०४ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहींचा आढावा.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 1993

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना १ जुलै १९९१ पासून वाढीव महागाई भत्ता देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे दिनांक १ जुलै १९९१ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत दिनांक २२.१०.१९९१ आदेशान्वये केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**Item No.** 4 **Resolution No.** 1994

विषय : श्री. रे. स. नंदीमठ यांना सहाय्यक संचालक नगररचना (वाळूज), औरंगाबाद मंडळ या पदाचे अतिरिक्त वेतन मिळण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. रे. स. नंदीमठ, सहाय्यक संचालक, नगररचना/प्राधिकरण यांनी त्यांच्या स्वतःच्या पदाच्या व्यतिरिक्त सहाय्यक संचालक नगररचना (वाळूज)/औरंगाबाद मंडळ या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळल्याबद्दल त्यांना एक वर्षानंतरचा म्हणजेच दिनांक १५.९.१९९० पासून दिनांक २४.५.१९९१ पर्यंतच्या वाढीव कालावधीकरिता सुधारित वेतनाच्या १० टक्के दराने किंवा दरमहा रु. ५००/- ने कमी असेल एवढ्या मर्यादेपर्यंत अतिरिक्त वेतन संजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : बालविकास विद्यामंदिर या संस्थेला मेघवाडी, जोगेश्वरी येथे देण्यात आलेल्या भूखंडाच्या अधिमूल्यावरील भरपाईची रक्कम कमी करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **9** | **Resolution No.** | **1997** |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या मजासवाडी येथील गृहनिर्माण महाप्रकल्प विकासकामे दरवाजा व खिडक्यांकरिता सागवानी लाकडाऐवजी पर्यायी लाकडाचा (मलेशियन) वापर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या मजासवाडी येथील गृहनिर्माण प्रकल्पासाठी सागवानी लाकडाच्या दरवाजा/खिडक्यांच्याऐवजी 'यलोबालाऊ लाकूड' या प्रकारात मोडणाऱ्या लाकडापासून तयार केलेल्या दरवाजे/खिडक्या वापरण्याच्या प्रस्तावास खालील अटींवर मान्यता देण्यात येते.

१) या पर्यायी वापरा प्रीत्यर्थ रु. ८५/- प्रति घनफूट सूट देण्यात यावी व ती रक्कम त्याच्या देयकातून वळती करण्यात यावी.
२) अशा प्रकारे वापरलेल्या लाकडाच्या एकूण किंमतीवर भाववाढ सार्वजनिक बांधकाम खाते ठरवील त्याप्रमाणे देण्यात यावी.

| **Item No.** | **10** | **Resolution No.** | **1998** |
|---|---|---|---|

विषय : गृहनिर्माण योजनेतील विविध वसाहतींमधील गाळ्यांच्या अभिहस्तांतरणाबाबत.

गाळ्यांची/भूखंडांची विक्रीची किंमत निश्चित करण्यासंबंधीच्या सुधारित मार्गदर्शक सूचना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या दिनांक ६.१०.१९९० च्या बैठकीतील ठराव क्रमांक १८३९ पोटकलम ५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येते.
मुंबई मंडळाबाहेर गाळ्यांची अंतिम विक्री किंमत ठरविण्यासाठी प्रादेशिक मंडळाच्या स्तरावर विभागावर समित्या नेमण्यात याव्यात व त्या समितीचे अध्यक्ष प्रादेशिक मंडळाचे सभापती राहतील. त्यामध्ये प्राधिकरणाचे मुख्य अभियंता अथवा त्यांचे प्रतिनिधी, वित्त नियंत्रक/प्रा. अथवा त्यांचे प्रतिनिधी, त्याचप्रमाणे प्रादेशिक मंडळाचे मुख्य अधिकारी व मुख्य लेखाधिकारी हे सदस्य राहतील. मुख्य लेखाधिकारी हे या समितीचे निमंत्रक म्हणून काम पाहतील, तसेच त्या क्षेत्रातील प्राधिकरणाचे सदस्यही या समितीचे सदस्य राहतील. सभापती महोदयांना इतर कोणत्याही सभासदास सहयोगी करण्याचा अधिकार असेल.

**Item No. 11 Resolution No. 1999**

विषय : दि इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ आर्किटेक्टस् या संस्थेच्या हिरक महोत्सवी समारंभाच्या प्रसंगी होणाऱ्या प्रदर्शनात भाग घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
दि इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ आर्किटेक्टस् या संस्थेच्या हिरक महोत्सवी समारंभाच्या निमित्ताने या संस्थेमार्फत वरळी, मुंबई येथे दिनांक २७.१२.१९९१ ते ७ जानेवारी १९९२ या कालावधीत 'वास्तुशास्त्रीय वारसा' या विषयावर आयोजित केलेल्या प्रदर्शनात १५ चौ. मीटर क्षेत्राचे एक दालन भाड्याने घेण्यास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे त्या भाड्यापोटी सुमारे रु. २५,०००/- व अन्य सजावट व संलग्न खर्चासाठी होणाऱ्या आणखी सुमारे रु. २५,०००/- या अंदाजित खर्चास मंजूरी देण्यात येते.

**Item No. 12 Resolution No. 2000**

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण - चंद्रपूर.

अधिसूचित क्षेत्रातील विकासाच्या दृष्टीने कार्यवाही करणेसाठी कर्मचारी वृंदाची तात्काळ निर्मिती करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विशेष नियोजन प्राधिकरण, चंद्रपूर येथील अधिसूचित क्षेत्राच्या विकासाची कामे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार वेळेप्रमाणे पार पाडण्यात सहाय्यक संचालक नगररचना यांचे अधिपत्याखाली बाब टिप्पणात प्रस्तावित केल्याप्रमाणे अधिकारी/कर्मचारी वर्गाची पदे निर्माण करण्यात येऊन कंत्राटी पद्धतीने भरण्यास मान्यता देण्यात येते. नवीन पदे निर्माण करून ती भरण्यासाठी शासनाकडे तसा प्रस्ताव पाठवून मंजूरी घेण्यात यावी. मुख्य नियोजनकार/प्राधिकरण यांनी विशेष नियोजन प्राधिकरणाचे आराखडे सहा महिन्यांच्या आत तयार करण्यात यावे.

**Item No. 13 Resolution No.**

विषय : वाळूज औरंगाबाद येथील विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून म्हाडातर्फे करण्यात येत असलेल्या प्रकल्पाचे काम हस्तांतरीत करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **14** | **Resolution No.** | **2001** |
|---|---|---|---|

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण चंद्रपूर अधिसूचित क्षेत्रातील विकासावर नियंत्रण तसेच जमिनीचा वापर यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ च कलम २९ (१)(क), अन्वये प्राधिकरणाच्या वतीने नगररचना अधिनियमाखाली विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्य/कर्तव्य पार पाडण्याकरिता नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास निर्देशन देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे प्रकरण (४) प्रमाणे विशेष नियोजन प्राधिकरण, चंद्रपूर अधिसूचित क्षेत्रातील विकासावर नियंत्रण तसेच जमिनीचा योग्य वापर यासाठी प्राधिकरणाच्या वतीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७५ चे कलम २९(१)(क) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून प्राधिकरणातर्फे कार्य करण्याचे अधिकार नागपूर मंडळास प्रदान करण्यात येत आहे.

| **Item No.** | **15** | **Resolution No.** | **2002** |
|---|---|---|---|

विषय : गोराई रोड (२अ) येथील सर्व्हे नं. १९९,२०४,२०५,२११ ह्या १३.८० हेक्टर जमिनी वरील भरावयाच्या कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गोराई रोड (२अ) येथील सर्व्हे नं. २०४,२०५,२११ ह्या १३.८० हेक्टर जमिनीवरील भरावयाच्या कामाची मेसर्स एम.वाय.कन्स्ट्रक्शन या कंपनीची रू. १,६९,३६,०७१.१६ (९.५० टक्के अधिक) निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **16** | **Resolution No.** | **2003** |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनासाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत जोडलेल्या तक्ता अ मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनासाठी हुडकोकडून एकूण रू. २३६.५३ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते. कर्जाव्यतिरिक्त उर्वरित रक्कम लाभार्थीकडून आगाऊ वसूल करण्यात यावी.

| **Item No.** | **17** | **Resolution No.** | **2004** |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेला हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर बाब टिप्पणास जोडलेल्या तक्ता अ मध्ये दर्शविलेल्या अमरावती व नागपूर, अमरावती, यवतमाळ, जालना व नाशिक जिल्ह्यातील बेघर भूमीहीनांकरिता हुडको अर्थसहाय्यित ग्रामीण गृहनिर्माण योजनासाठी एकूण रू. १८.८४ कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 17 **Resolution No.** 2004

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेला हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर बाब टिप्पणास जोडलेल्या तक्ता अ मध्ये दर्शविलेल्या अमरावती व नागपूर, अमरावती, यवतमाळ, जालना व नाशिक जिल्ह्यातील बेघर भूमीहीनांकरिता हुडको अर्थसहाय्यित ग्रामीण गृहनिर्माण योजनासाठी एकूण रू. १८.८४ कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 18 **Resolution No.** 2005

विषय : कोड क्रमांक ०९६ नवघर मुलुंड येथील मध्यम उत्पन्न गट योजनेतील गाळ्याच्या किंमतीवर व्याज आकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, कोड नं. ०९६ नवघर मुलुंड येथील मध्यम उत्पन्न गट योजनेतील शासनांच्या २ टक्के स्वेच्छा निर्णयानुसार गाळा वाटप करण्यात आलेले अर्जदार श्री.महादेव दादू कुंभार यांनी व्याज माफ करण्याबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात यावी व त्यांना कुठलीही सूट देण्यात येऊ नये व त्यांना व्याजासह संपूर्ण रक्कम भरण्याबाबत त्वरीत कळविण्यात यावे.

**Item No.** 19 **Resolution No.**

विषय : वांद्रे (पश्चिम) पुन:प्रापण येथील संक्रमण शिबीरासाठी प्रस्तावित केलेला भूखंड न्यू बॉम्बे एज्युकेशन सोसायटीला वितरण करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 20 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प

विशेष गटासाठी गृहनिर्माण योजना.

ठराव :

**Item No.** 21 **Resolution No.**

विषय : शैक्षणिक संस्थाना हस्तांतरित करण्यात आलेल्या भूखंडाचे सेवाशुल्क कमी करण्याविषयी.

ठराव :

**Item No.** 22 **Resolution No.** 2006

विषय : रमाबाई नगर, घाटकोपर येथील ४२० संक्रमण शिबीर. गाळे भूखंडासह 'जसे आहे तसे' या तत्त्वावर विक्री करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, रमाबाई नगर, घाटकोपर येथील संक्रमण शिबीरातील ४२० गाळे भूखंडासहीत सदर मालमत्ता जशी आहे त्या तत्त्वावर विकण्यासाठी बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे रू. ७६.४५ लाख भरण्यासाठी संबंधिताना ३० दिवसांची मुदत देण्यात यावी व त्याप्रमाणे संबंधिताकडून सहमती कळविणे आवश्यक राहील, पूर्ण रक्कम मात्र ६ महिन्याच्या आत भरणे आवश्यक राहील असा निर्णय घेण्यात येत आहे.

**Item No.** 23 **Resolution No.**

विषय : श्री. प्रकाश जोशी, नियंत्रक अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे यांची मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास विशेष कार्य अधिकारी म्हणून प्रतिनियुक्तीवर नेमणूक करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 23 **Resolution No.**

विषय : श्री. प्रकाश जोशी, नियंत्रक अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे यांची मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास विशेष कार्य अधिकारी म्हणून प्रतिनियुक्तीवर नेमणूक करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 24 **Resolution No.** 2007

विषय : श्री. व्ही. बी. गुंजोटीकर अपील अधिकारी (२) यांची कंत्राटी पध्दतीवरील पुनर्नेमणूकीचा कालावधी वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. व्ही. बी. गुंजोटीकर यांचा अपील अधिकारी-२/प्रा. या पदावरील पुनर्नेमणूकीचा कालावधी दिनांक ९.११.१९९१ पासून पूर्वीच्या अटी व शर्तीवर आणखी १ वर्षाने वाढविण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 25 **Resolution No.** 2008

विषय : श्री. स. म. लोखंडे, उपजिल्हाधिकारी/कोंकण विभाग यांची उपमुख्य अधिकारी (मि. व्य. १) या पदावर मुंबई व गृहनिर्माण मंडळास प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, शासनाच्या आदेशाच्या अनुषंगाने प्राधिकरण आदेश क्रमांक एमएच/डीईपी-११९१/१८५०/एडीएस-१२ दिनांक २५.११.१९९१ अन्वये, श्री. स. म. लोखंडे, उपजिल्हाधिकारी/कोंकण विभाग यांची मुंबई मंडळात उपमुख्य अधिकारी (मि.व्य.१) या रिक्त पदावर दिनांक २८.११.९१ मध्यान्ह पूर्व पासून प्रथमतः १ वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीवर प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 26 **Resolution No.** 2009

विषय : कळमेश्वर येथील स.क्रमांक १००/६ व १२८/९ मधील १०० चौ.मीटर जमिन श्री. किशोर टाकरखेडे यांना विक्रीखताने वाटप करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. किशोर टाकरखेडे यांना कळमेश्वर येथील सर्व्हे क्रमांक १००/६ व १२८/८ मधील ११०० चौ. मीटर जमिन विक्रीद्वारे वाटप करण्यास नियम ५ (अ) प्रमाणे प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठविण्यात यावा व शासनाची मंजूरी घेऊन हस्तांतरीत करण्यात यावी.

**Item No.** 27 **Resolution No.**

विषय : गोखले नगर, पुणे येथील ३२ उच्च उत्पन्न गटांतील गाळ्यांची, गाळे निर्धारण समितीने निर्धारित केलेल्या किंमतीऐवजी प्रत्यक्ष किंमत आकारण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 28 **Resolution No.**

विषय : अंतीम मूखंड क्रमांक २८ (अंशतः) आणि २३ टीपीएस-२ माहिम विभाग कटारिया मार्ग रायवाडी या मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत.

ठराव :

**Item No.** 29 **Resolution No.** 2010

विषय : सर्व्हे क्रमांक ३४३ (भाग) येथे नियोजित १२० गाळ्यांचे बांधकाम करण्यासाठी निविदा (फेज-२, भाग-२).

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्रमांक ३४३ (भाग) येथे १२० नियोजित गाळ्यांच्या बांधकामासाठी (फेज-२, भाग-२) मे. डिव्हाईन कन्स्ट्रक्शन कंपनी यांची रू. ६२,३७,४००/- (रूपये बासष्ट लक्ष सदतीस हजार चारशे फक्त) या रकमेची बोली मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 30 **Resolution No.**

विषय : डांबर कंपाऊंड, मुकुंदनगर धारावी येथे नियोजित (अे. बिल्डिंग) सत्यम सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या १२४ गाळे असलेल्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निविदा.

ठराव :

**Meeting No.** 107 **Meeting Date** 07-Jan-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २९.११.१९९१ रोजी तहकूब झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि.११.१२.१९९१ रोजी झालेल्या १०५ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २३.१०.९१ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा.

ठराव :

**Item No.** 4 **Resolution No.** 2011

विषय : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवर दूरध्वनी चालकाचे पद मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ लिपिकच्या रू. ९५०-२०-११५० द.रो.-२५-१५०० या वेतनश्रेणीतील १ रिक्त पद कमी करुन त्याऐवजी रू. ९७५-२५-११५०-द.रो.-३०-१६६० या वेतनश्रेणीतील दूरध्वनी चालकाचे एक पद पुणे मंडळाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत असून, याबाबत शासनाची मंजूरी घेण्यात यावी. त्याप्रमाणे या पदावरील नियुक्ती अंध व्यक्तीमधून करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 5 **Resolution No.** 2012

विषय : गोखले नगर, पुणे येथील ३२ उच्च उत्पन्न गटातील गाळ्यांची, गाळे निर्धारण समितीने निर्धारित केलेल्या किंमतीऐवजी प्रत्यक्ष किंमत आकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गोखले नगर, पुणे येथील ३२ उच्च उत्पन्न गटातील गाळे खालील तत्वांच्या अधीन राहून गाळ्यांची किंमत वसूल करण्यात यावी.

१. गाळ्यांच्या किंमतीपोटी भरावे लागणारे हप्ते नियोजित तारखेपूर्वी भरलेल्या सर्व लाभार्थीना गाळ्यांची किंमत रू. १,६६,५००/- याप्रमाणे लावण्यात यावी.
२. अन्य लाभार्थींना गाळ्यांची किंमत रूपये १,६६,५००/- अशी लावून प्रचलित नियमानुसार प्रलंबित काळासाठी व्याज आकारण्यात यावे.
३. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी म्हाडा व विभागीय मंडळे यांच्या मार्फत बांधण्यात येणाऱ्या विविध योजनांमधील गाळ्यांची सुधारित दराने किंमत ठरविण्यासाठी प्रस्ताव तयार करावा.

---

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : सर्व्हे क्र. ६/४ जरीपटका नागपूर येथे उच्च उत्पन्न गाळ्यातील ४८ गाळ्यांच्या निविदाबाबत.

ठराव :

---

**Item No.** 7 **Resolution No.**

विषय : मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्रचनेचा विशेष प्रकल्प.
प्रथम टप्पा-३० इमारतींबाबतचा प्रकल्प.

ठराव :

---

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : अंतिम भूखंड क्र. २८ (अंशतः) आणि २३ टीपीएस-२, माहिम, विभाग, कटारिया मार्ग, रावबाडी या मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत.

ठराव :

---

**Item No.** 9 **Resolution No.** 2013

विषय : पुनर्रचित इमारतीतील निवासी/अनिवासी गाळ्यांची अनधिकृत हस्तांतरण नियमित करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, पुनर्रचित इमारतीमध्ये अनधिकृतपणे हस्तांतरण केलेले निवासी/अनिवासी गाळ्यांचे टिप्पणात निर्दिष्ट केलेल्या बाबी विचारात घेऊन मालकी हक्काने एकरकमी किंमत घेऊन नियमित करण्यास तत्वतः मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 10 **Resolution No.** 2014

विषय : प्राधिकरणाच्या कामावर दक्षता व गुणनियंत्रण करण्यासाठी वेगळा सेल निर्माण करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अंतर्गत विविध मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांवर दक्षता व गुणनियंत्रण राखण्याच्या दृष्टीने कामात एकसूत्रीपणा यावा म्हणून मुख्य अभियंता/प्राधिकरण यांच्या शाखेत एक सेल उघडून त्यात खालील अधिकारी/कर्मचारी उपलब्ध रिक्त पदाचा वापर करून प्रचलित धोरणानुसार नेमण्यात यावेत असे ठरले.

१. उपमुख्य अभियंता १ पद
२. कार्यकारी अभियंता ३ पदे (१ उपलब्ध)
३. उप अभियंता १० पदे (२ उपलब्ध)
४. कनिष्ठ अभियंता २ पदे

सदर सेलमध्ये कार्य करणाऱ्या विविध अधिकाऱ्यांचे/कर्मचाऱ्यांचे कार्यक्षेत्र बाब टिप्पणासोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे राहील. त्याचप्रमाणे बांधकामाच्या साहित्याचे परिक्षण करण्यासाठी प्रत्येक विभागीय मंडळात पुरेशा प्रमाणात अद्यावत प्रयोगशाळा निर्माण करण्यात याव्यात, असे ठरविण्यात आले.

---

**Item No.** 11 **Resolution No.** 2015

विषय : सर्व्हे क्र. २६७/२, अमृतधाम, नाशिक येथील अल्प उत्पन्न गटाची संमिश्र गृहनिर्माण योजना (योजना क्र. ८८९७)

१. अल्प उत्पन्न गट-अ, ब बरोबर १२७ गाळे
२. अल्प उत्पन्न गट-२ क बरोबर ४८ गाळे
३. अल्प उत्पन्न गट- ड बरोबर ३३ गाळे

हुडकोकडून कर्ज घेण्यात प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर योजनेचे हुडकोकडून एकूण रुपये ५५.१६ लक्ष कर्ज घेण्यात अनुमती व अधिकृती देण्यात येते. प्रकल्पाची एकूण किंमत व हुडकोचे कर्ज यामधील फरकाची किंमत लाभार्थीकडून आगऊ वसूल करण्यात यावी.

---

**Item No.** 12 **Resolution No.** 2016

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणात नमूद केलेली आर्थिक स्थिती विचारात घेऊन, आणि मंजूरी दिलेल्या कामाची निकड लक्षात घेता आवश्यकतेनुसार इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमासाठी त्यावेळी फंडामध्ये अपेक्षित असलेल्या जमा रक्कमेपर्यंत जशी जशी आवश्यकता भासेल त्याप्रमाणे तात्पुरती उचल (ब्रीज फायनान्स) म्हणजे दरसाल दरशेकडा ११ टक्के रक्कम प्राधिकरणाच्या निधीमधून देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** **13** **Resolution No.**

विषय : दिनांक ३०.११.१९९१ रोजी कार्यालयीन वेळेत काम बंद करुन सकाळी ११ ते ३ ह्या वेळात कर्मचाऱ्यांनी केलेले आंदोलन.

ठराव :

**Item No.** 14 **Resolution No.** 2017

विषय : ओशिवरा/जोगेश्वरी येथील सर्व्हे क्र.४१ व ४२ येथील ८४ गाळ्यांपैकी ८३ गाळे बांधकाम योजनेच्या निविदा मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, ओशिवरा/जोगेश्वरी येथील सर्व्हे क्र. ४१ व ४२ येथे ८४ गाळ्यांपैकी ८३ गाळ्यांच्या बांधकाम योजनेच्या मेसर्स स्वस्तिक कॅन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या १८.५७ टक्के जास्त असल्यामुळे प्रथम निम्नतम देण्यास मान्यता देण्यात येते. उपरोक्त ठराव मंजूर झाल्यानंतर निविदासंबंधी सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.

मुंबई मंडळाच्या मुख्य अभियंत्यांनी निविदांची तपासणी केल्यानंतर त्यावर मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनी परत छाननी करण्याची गरज आहे का, हे तपासून पहावे. तसेच निविदांच्या तपासणीमध्ये अनेक अधिकारी गुंतलेले असल्यामुळे, ठराविक जबाबदार अधिकाऱ्यांच्या पातळीवर कशी छाननी करुन घेता येईल, व अनावश्यक विलंब कसा टाळता येईल, याबाबत विचार व्हावा. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी, असे मा. मंत्रीमहोदयांनी सूचित केले. मागील सहा महिन्यात किती निविदांचा कालावधी वाढवून दिला, ह्याची माहिती मुख्य अभियंता/प्राधिकरण ह्यांनु प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत घ्यावी, असे सूचविण्यात आले.

विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर खालील बाबी चर्चेसाठी आल्या.

१. प्राधिकरणाने केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी ठरावाचे स्थायीकरण झाल्याशिवाय पुढील कार्यवाही करणे शक्य होत नाही. हा विलंब टाळण्यासाठी ज्या विषयावर तातडीने कार्यवाही करावयाची असेल असे विषय प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूर झाल्यानंतर स्थायीकरणाची वाट न पहाता, मान्य झालेल्या कार्यवृत्ताप्रमाणे संबंधित तातडीच्या विषयावर शीघ्रतेने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव/प्राधिकरण यांचेकडे संबंधित अधिकारी यांनी पाठवावा, असे सूचविण्यात आले. तसेच, याबाबत एक सर्वसाधारण प्राधिकरणाचा ठराव मंजूर करण्यात यावा. त्याप्रमाणे बाब टिप्पण पुढील बैठकीसाठी तयार करुन ठेवावे.

२. मा. मंत्रीमहोदयांनी प्राधिकरणामध्ये वास्तुशास्त्र, नेमण्याबाबत विचारणा केली. त्यावर सध्या प्रादेशिक मंडळाचे, प्राधिकरणाचे, जागतिक बँक प्रकल्प व राजीव गांधी प्रकल्पामध्ये कार्यरत असलेल्या वास्तुशास्त्रज्ञांची माहिती दिली. वास्तुशास्त्रज्ञ विभागाला परिणामकारक करण्यासाठी यापूर्वीच संचालक, जागतिक बँक प्रकल्प, राजीव गांधी प्रकल्प व सर्व मुख्य अधिकारी यांचेकडून त्यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. यावर सविस्तर विचार करुन वास्तुशास्त्रज्ञ विभाग परिणामकारक कसा करता येईल, ह्यावर विचार व्हावा. प्राधिकरणाच्या आस्थापनेवर असलेले वास्तुशास्त्रज्ञ ओपन मार्केटमध्ये असलेल्या घरांची डिझाईन देऊ शकणार नाहीत. त्यासाठी बाहेरच्या वास्तुशास्त्रज्ञांकडून अशा डिझाईन करुन घ्याव्या लागतील असे मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनी सांगितले. सध्या कार्यरत असलेल्या वास्तुशास्त्रज्ञांच्या कामाबाबत मंत्रीमहोदयांनी

नाराजी व्यक्त केली.

३. श्री. विरेंद्र बक्षी यांनी खालील विषय चर्चेसाठी आणले.

अ. शासकीय पातळीवर भारत पेट्रोलियमसाठी देण्यात येणाऱ्या जागेबाबत त्याठिकाणी जवळजवळ ५०० निवासी गाळे बांधण्याची व्यवस्था होऊ शकेल असे त्यांनी चर्चेत सांगितले.

ब. घाटकोपर, बैल्याच्या चाळीबाबतचा शासन निर्णय राजीव गांधी प्रकल्पाला कळविण्यात आल्याचे मुख्य अभियंता, राजीव गांधी प्रकल्प यांनी सांगितले.

क. प्राधिकरणाच्या विविध वसाहतीमध्ये ॲमिनिटीज प्लॉट म्हणून ठेवण्यात येणाऱ्या जागा यापूर्वी काही संस्थांना देण्यात आल्या आहेत. त्याचा वापर अद्याप झालेला नाही. ह्या संदर्भात मुंबई मंडळाने या सर्व प्रकरणांची माहिती घ्यावी.

ड. झोपडपट्टी सुधार कार्यक्रमाखालील ७०० गाळे अद्याप वितरीत करण्यात आलेले नाहीत. याबाबत मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी शासनाला शासकीय स्तरावर बैठक आयोजित करण्यासाठी कळविण्यात यावे.

ई. प्राधिकरणाच्या जागेवर मुंबई मध्ये एकूण ५२ झोपडपट्ट्या असल्याचे सांगण्यात आले. त्यापैकी ३ झोपडपट्ट्यांच्या वसाहतीत एस.यू.पी.चा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. तथापी, नाहरकत प्रमाणपत्र, गृहनिर्माण संस्था स्थापन केल्यानंतर त्यांचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी मिळत नाही. त्यासाठी राजीव गांधी प्रकल्पाकडून, मुंबई मंडळाकडून तात्काळ कार्यवाही व्हावी.

४. श्री. मांजरेकर, सदस्य यांनी दिनांक २ जानेवारी, १९९२ रोजी अध्यक्ष/प्राधीकरण यांना पत्र देऊन खालील दोन विषय प्राधिकरणासमोर आणण्याची विनंती केली.

अ. भू-मापक या संवर्गाला शासन निर्णयाप्रमाणे १,२००/- ते १,८००/- वेतनश्रेणी द्यावी. याबाबत प्राधिकरणाने दिनांक १३.३.८९ रोजी ठराव क्र. १६४३ शासनाकडे पाठविला होता. तथापी, शासनाने दिनांक १४.५.९० रोजीच्या पत्रान्वये त्यास मान्यता देता येत नसल्याचे कळविले आहे. असे बैठकीत सचिव/प्राधिकरण यांनी सांगितले. त्यावर पुनर्विचार करून परत ही बाब हाताळावी, असे उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी सूचीत केले.

ब. प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चासाठी ५००/- रूपये दरवर्षी प्रतिपूर्ती करण्यात येते. सदरहू प्रतिपूर्तीची रक्कम १,२००/- रूपयांपर्यंत दरवर्षी करण्यात यावी, अशी त्यांची मागणी आहे. या संदर्भात यापूर्वीच कार्यवाही करण्यात आली असून, वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांचे अभिप्राय सचिव/प्राधिकरण यांचेकडे आलेले आहेत. व त्यावर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. असे सचिव/प्राधिकरण यांना सांगितले. हे करित असताना वैद्यकीय नियमातील कलम ६ प्रमाणे मधुमेह या रोगाचा समावेश शासकीय कर्मचाऱ्यांना प्रतिपूर्तीसाठी लागू पडतो, त्याच आधारावर सदरहू शासन निर्णय प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यासाठी पाऊले

उचलावीत, असे श्री. मांजरेकर यांनी सुचविले.

बैठकीवरील विषय संपल्यावर उपस्थितांनी मा. अध्यक्षांचे व बैठकीसाठी विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित केलेल्या मा. गृहनिर्माण मंत्रीमहोदयांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** **108** **Meeting Date** **27-Jan-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ७ जानेवारी १९९२ रोजी झालेल्या १०७ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ११.१२.१९९१ रोजी झालेल्या १०६ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती.

ठराव :

**Item No.** **3** **Resolution No.** **2018**

विषय : प्राधिकरणाने केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करण्यासंबंधी.

तातडीच्या विषयावर कार्यवाही करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, ज्या विषयावर तातडीने कार्यवाही करावयाची असते असे विषय प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूर झाल्यानंतर कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता मान्य झालेल्या कार्यवृत्ताप्रमाणे संबंधित विषयावर ठरावाप्रमाणे त्वरीत कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सचिव/प्राधिकरण यांचे शाखेकडे पाठविण्यात यावा. ज्या विषयास स्थायीकरणाची गरज आहे, ते उपाध्यक्ष/प्रा. ह्यांचे नजरेस आणून द्यावेत.

**Item No.** **4** **Resolution No.** **2019**

विषय : श्री. एम.एम. सोनावणे, अर्हताराहित बेलीफ यांना माडेवसूलीकार पदावर पदोन्नती देणे आणि त्याबरोबर अभिलेखपाल व तत्सम पदावर काम करणाऱ्या इतर अर्हताराहित कर्मचाऱ्यांना वरिष्ठ लिपिक/माडेवसुलीकार या पदावर किमान एक पदोन्नती देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या दिनांक २.४.१९८३ च ६५३ या क्रमांकाचा ठराव कायम ठेवून आणि गिंडे समितीने केलेल्या शिफारशीमध्ये काही फेरफार करुन, श्री. एम.एम. सोनावणे, अर्हताराहित बेलीफ व कनिष्ठ लिपिक, अभिलेखपाल, बेलिफ या तत्सम समकक्ष कनिष्ठ लिपिक संवर्गातील पदावर काम करणाऱ्या अर्हताराहित कर्मचाऱ्यांना खालील अटी व शर्तीवर वरिष्ठ लिपिक/माडेवसुलीकार या पदावर फक्त एक पदोन्नतीचा लाभ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. कनिष्ठ लिपिक अभिलेखपाल व बेलिफ व तत्सम संवर्गात किमान १५ वर्षे पूर्ण सेवा असणे आवश्यक आहे.
२. कर्मचाऱ्यांच्या वयाची ४५ वर्षे पूर्ण होणे आवश्यक राहील.
३. एस.एस.सी. (इ. ११ वी) पर्यंत शिक्षण म्हणजे एस.एस.सी. परिक्षेत बसला, अशा आशयाचा सरकार मान्य शाळेचा दाखला सादर करावा लागेल.
४. ज्येष्ठता व गुणवत्ता विचारात घेऊन प्रचलित पद्धतीनुसार पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी प्राधिकरणाने दि. २०.११.१९८९ च्या परिपत्रकानुसार पात्रतेसाठी निश्चित केलेले आवश्यक गुण संबंधितांना प्राप्त करावे लागतील.
५. कनिष्ठ लिपिक संवर्गातील पदोन्नत होणाऱ्या अर्हताराहित कर्मचाऱ्यांना वरिष्ठ लिपिक/माडेवसूलीकार ही एकच पदोन्नती देण्यात येत असून त्यांना भविष्यात त्यावरील पुढच्या पदावर पदोन्नतीचा हक्क राहणार नाही. या गोष्टीची स्पष्ट जाणीव देण्यात यावी.
६. मात्र इतर प्रकरणात हे पूर्वोदाहरण ठरू नये.

मान्य करण्यात आलेला ठराव शासनाच्या माहितीसाठी पाठविण्यात यावा.

**Item No.** 5 **Resolution No.** 2020

विषय : वॉर्ड क्रमांक अ-२६, सर्व्हे क. ४१ (भाग) ओशिवरा, जोगेश्वरी (पश्चिम) शॉपिंग सेंटर बांधण्याबाबत - निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

सर्व्हे क. ४१ (भाग) प्लॉट ए-२५, ओशिवरा, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई येथील जमिनीवर शॉपिंग सेंटर बांधण्यासाठी मेसर्स स्वस्तिक कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमतीवर रक्कम रु. १,६०,४५,०६९/- २२ टक्के अधिक दराच्या सुधारित निम्नतम निविदा स्वीकारण्यात आली. त्यानुसार निविदा रक्कम ठेकेदारांची सुधारित टक्केवारी धरून रु. १,९५,७४,९८४/- (रुपये एक करोड पंच्याण्णव लाख चौऱ्याहत्तर हजार नऊशे चौऱ्याऐंशी) यास खालील अटींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१) मुख्य अभियंता/प्रा., मुख्य अभियंता/मुं. मं., मुख्य अभियंता/राजीव गांधी प्रकल्प/प्रा. यांच्या म्हणण्यानुसार पुनर्निविदा दिल्यास सध्याच्या निविदेतील दरापेक्षा अधिक दर प्राधिकरणाला द्यावे लागतील त्यामुळे प्राधिकरणाचे नुकसान होईल. कोणाच्या पातळीवर निविदा मंजूर करून घेण्यासाठी विलंब झाला आहे की ज्यामुळे प्राधिकरणाला रु. ६.७० लाखापेक्षा अधिक भूर्दंड सहन करावा लागणार आहे. संबंधितांवर जबाबदारी कायम करून त्याप्रमाणे पुढील कारवाई करावी.

२) कंत्राटदाराने निविदेत दिलेले दर कमी करण्याबाबत प्रयत्न करण्यात आले, परंतु दर कमी करण्यास ठेकेदार तयार झाले नाहीत.

३) अशी किती प्रकारच्या निविदा प्रकरणी पूर्वी कालमर्यादा वाढविल्याने प्राधिकरणास भूर्दंड पडला याची सन १९९१-९२ या कालावधीतील प्रकरणाची छाननी करून प्राधिकरणास माहिती सादर करण्यात यावी.

४) यापुढे भविष्यामध्ये अशा प्रकारची चूक होणार नाही याबाबत मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनी अस्तित्वात असलेल्या सध्याच्या पद्धतीमधून सुधारणा सुचविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी व कुठल्याही परिस्थितीत निविदेची छाननी करण्यासाठी एकूण ९० दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागणार नाही याची जबाबदारी घ्यावी. या ९० दिवसांपैकी निविदेची छाननी करण्याकरिता संबंधित विभागीय मंडळासाठी युनीटस्साठी एकूण ४५ दिवसांचा कालावधी व त्यानंतर पुढील छाननी करण्यासाठी मुख्य अभियंता/प्राधिकरण यांना ३० दिवसांचा कालावधी देण्यात यावा. अंतिम छाननी नंतर निविदा मंजूर झाल्यानंतर त्यावरील बाब टिप्पण्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या मंजूरीने प्राधिकरणाच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यासाठी सचिवालयीन शाखेकडे बैठकीच्या १५ दिवस अगोदर प्रशासन विभागाकडे पाठविण्यात याव्यात.

**Item No.** 6 **Resolution No.** 2021

विषय : पवई येथील गृहनिर्माण प्रकल्पासाठी प्रस्तावित योजनेच्या आराखड्यातील गाळ्यांच्या प्रमाणात सुधारणा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पवई येथील गृहनिर्माण प्रकल्पासाठी प्रस्तावित योजनेच्या आराखड्यातील गाळ्यांच्या प्रमाणात बाब टिप्पणीत नमूद केलेल्या आणि कंत्राटदाराने प्रस्तावित केल्याप्रमाणे सुधारणा करण्यास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे. विलंबाची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

---

**Item No.** 7 **Resolution No.** 2022

विषय : टागोर नगर, विक्रोळी (पूर्व) येथे १५ दुकाने अधिक २८ वाणिज्य गाळे अधिक २० उच्च उत्पन्न गटाचे गाळे बांधण्याच्या योजनेची दोन गटात विभाजन करून पाईल फाऊंडेशन कामाच्या निविदा मागविण्यास परवानगी मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
टागोर नगर, विक्रोळी (पूर्व) येथे १५ दुकाने अधिक २८ वाणिज्य गाळे अधिक २० उच्च उत्पन्न गटाचे गाळे बांधण्याच्या कामाची पाईल फाऊंडेशन व जोत्यावरील बांधकाम अशा दोन गटात विभाजन करून पाईल फाऊंडेशन निविदा बोलाविण्यास मान्यता देण्यात येते. याबाबत सर्वसाधारण अधिकार प्रदान करण्यासाठी मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनी प्रस्ताव सादर करावा, असे ठरविण्यात आले.

---

**Item No.** 8 **Resolution No.** 2023

विषय : पुणे येथी ४०व्या टाऊन ॲण्ड प्लॅनिंग सेमिनारमध्ये सहभागी होण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
इन्स्टिट्यूट ऑफ टाऊन प्लॅनर्स या संस्थेने महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने पुणे येथे दिनांक १५ जानेवारी १९९२ ते १७ जानेवारी १९९२ या कालावधीमध्ये आयोजित केलेल्या सेमिनारमध्ये प्राधिकरणाने सहभाग घेतला होता. त्यासाठी झालेल्या रु. २५,०००/- या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No.** 9 **Resolution No.** 2024

विषय : मजासवाडी, जोगेश्वरी येथील महाप्रकल्पाचे विकास कामावर बांधकाम साहित्यासाठी सी. एस. आर. च्या ७५ टक्के अग्रिम देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मजासवाडी, जोगेश्वरी येथील महाप्रकल्पाचे विकास कामावर बांधकाम साहित्यासाठी पहिल्या बारा महिन्यांकरिता जुन्या सी.एस.आर.वर आधारित (ज्यावर निविदा मंजूर झाल्या त्या वर्षाच्या) त्यांच्या ७५ टक्के व त्यानंतर प्रचलित सी.एस.आर प्रमाणे ७५ टक्के अग्रिम देण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या चांदिवली येथील गृहनिर्माण महाप्रकल्प विकासकाने दरवाजे व खिडक्याकरिता सागवानी लाकडाऐवजी पर्यायी मलेशियन लाकडाचा (पिवळे बलाऊ) वापर करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.** 2025

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प.
ओशिवरा व गोरेगाव मेसर्स बी. जी. शिर्के आणि कंपनीने साधन सामुग्रीसाठी दिलेली बँक हमी पत्रे परत करण्याबाबत.

ठराव : एकमताने
खालीलप्रमाणे निर्णय घेतला.
१) जून १९९१ च्या प्रकल्पाच्या सुधारित कार्यक्रमानुसार दरविलेले काम व आता झालेले काम त्याची वित्तीय तुलना करून त्याप्रमाणात जी अग्रिम रक्कम विकसकाने मंडळास परत करावयास पाहिजे होती तितक्या रकमेच्या मोबिलायझेशन अग्रिमा प्रित्यर्थ दिलेल्या बँक हमी पत्राचे रोखीकरण करण्यात यावे.
२) ठेकेदारास बांधकामासाठी आगाऊ रक्कम देण्यात आली आहे ही विहित पद्धतीप्रमाणे दिली नसल्याने ठेकेदाराला कायदेशीर नोटीस देऊन सदरहू रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावी.
३) शिर्के यांच्या कंत्राटामध्ये अग्रिम देण्याबाबतच्या अटी घातल्या आहेत त्यात प्राधिकरणाच्या दृष्टीने सुरक्षा उपाय हवे आहेत..

**Item No.** 12 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 13 **Resolution No.** 2026

विषय : गोराई रोड (२) विभाग १ येथील उपलब्ध असलेल्या जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या (पाणीपुरवठा, मलनिस्सारण, रस्ते, गटारे, वीजपुरवठा तसेच गाभाघराचे जोत्यापर्यंत बांधकाम करणे) उरलेल्या कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गोराई रोड (२) विभाग १ येथील उपलब्ध असलेल्या जमिनीवर भूखंड विकसित करण्यासाठी मेसर्स गणेश कन्स्ट्रक्शनची अंदाज पत्रकापेक्षा (रु. ४९,१३,५९५/-) ३.०० टक्के अधिक असलेली (रु. ५०,६१,००२.८५) निम्नतम निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| Item No. | 14 | Resolution No. | 2027 |
|---|---|---|---|

विषय : आकुर्ली, कांदिवली येथील स. नं. ८८ (भाग) ८९, ९०, ९१ (भाग), आणि ९२ (भाग) येथील ९.६४ हेक्टर जमिनीवर भूखंड (१३५१) विकसित करावयाच्या (पाणीपुरवठा, मलःनिस्सारण, रस्ते, गटारे, वीजपुरवठा इत्यादी सुविधा पुरविणे तसेच गाभाघराचे जोत्यापर्यंत बांधकाम करणे) कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत (विभाग - १)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
आंकुर्ली, कांदिवली येथील सर्व्हे नं. ८८ (भाग), ८९, ९०, ९१ (भाग) आणि ९२ (भाग) येथील ९.६४ हेक्टर जमिनीवर भूखंड विकसित करण्यासाठी मेसर्स परेश कन्स्ट्रक्शनची रु. ८५,३१,६८९.०० ची निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| Item No. | 15 | Resolution No. | 2028 |
|---|---|---|---|

विषय : आकुर्ली, कांदिवली येथील स. नं. ८८ (भाग) ८९, ९०, ९१ (भाग) आणि ९२ (भाग) येथील ९.६४ हेक्टर जमिनीवर भूखंड विकसित (१३५१) करावयाच्या (पाणीपुरवठा, मलःनिस्सारण, रस्ते, गटारे, वीजपुरवठा, इत्यादी सुविधा पुरविणे तसेच गाभाघराचे जोत्यापर्यंत बांधकाम करणे कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत. (विभाग - २)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
आकुर्ली, कांदिवली येथील सर्व्हे नं. ८८ (भाग) ८९, ९०, ९१ (भाग) आणि ९२ (भाग) येथील ९.६४ हेक्टर जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या कामासाठी मेसर्स परेश कन्स्ट्रक्शनची रु. ९४,९५,३०९.०० ची निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| Item No. | 16 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे क. ५६, चितळसर, मानपाडा, जि. ठाणे या जमिनीवर मध्यम उत्पन्न गटांतर्गत २८० गाळे बांधण्याच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव :

| Item No. | 17 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे क. ५६, चितळसर, मानपाडा, जि. ठाणे या जमिनीवर मध्यम उत्पन्न गटांतर्गत ६० गाळे बांधण्याच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव :

| Item No. | 18 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे क. ५६, चितळसर, मानपाडा, जि. ठाणे या जमिनीवर उच्च उत्पन्न गटांतर्गत ८८ गाळे बांधण्याच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव :

**Item No.** 19 **Resolution No.** 2029

विषय : नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत ना. म. जोशी मार्गावरील हेंद्रे इमारतींच्या पुनर्बांधणी योजनेमधील कामाची विभागणी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत ना. म. जोशी मार्गावरील हेंद्रे इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेमधील कामाची बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे तीन विभागात विभागणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No.** 20 **Resolution No.** 2030

विषय : नागपूर मंडळामार्फत पुसद येथे पूरग्रस्तांसाठी बांधलेल्या ४०० गाळ्यांच्या उद्घाटन समारंभाबाबत.

ठराव : एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला की,
१) दिनांक ७.२.९२ रोजी या कामाची मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन तसेच मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या हस्ते होणारे उद्घाटन विचारात घेऊन अभिन्यासात सुयोग्य ठिकाणी तात्काळ एक २० बाय ३० फूटाचे तात्पुरती शेड उभारण्यात यावी व त्यामध्ये प्राथमिक उपाचाराची पेटी उपलब्ध करावी तसेच पोष्टाशी संपर्क साधून टपाल वितरण व्यवस्थेची सोय करावी शिवाय गाळे धारकांच्या अडीअडचणी ऐकून त्या सोडविण्यासाठी काही दिवसांपुरती तात्पुरती सोय करण्यात यावी.
२) सदर अभिन्यासात एक प्राथमिक शाळा बांधण्यात यावी याबाबत मा. मुख्यमंत्र्यांनी सुचविले होते. याबाबत आयुक्त अमरावती यांचेकडून लेखी पत्र आले तरच प्राधिकरणाने शाळेच्या बांधकामासाठी रक्कम गुंतवावी, मात्र त्याची परतफेड शासनातर्फे होईल याची हमी घ्यायला हवी.
३) उपलब्ध असलेल्या कूपनलिकांच्या जवळच हौद आहे त्या ठिकाणी कपडे धुण्यासाठी प्लॅटफॉर्म तयार करण्यात यावा व हौदाच्या भिंती १.५ ते २ फूटाने वाढविण्यात याव्यात.
४) वसाहत सुशोभित करण्यासाठी सामाजिक वनीकरणाचे काम म्हाडातर्फे पावसाळ्यामध्ये घेण्यात यावे. मात्र उद्घाटनाच्या ठिकाणी मान्यवर नेत्यांच्या हस्ते वृक्षारोपण तात्पुरते दोन-तीन खड्डे (१.५ बाय १.५) तयार करण्यात यावेत.
५) योजनेतील मोकळ्या जागेवर लहान मुलांसाठी घसरगुंडी, सी-सॉ, गोल झोके इत्यादी खेळाची साधने उपलब्ध करून द्यावीत. परंतु ही साधने शाळेच्या जवळ असावीत याची दक्षत घ्यावी.
बाब टिप्पणीतील नमूद केलेले वीजपुरवठा देणे, कूपनलिका बसविणे ही कामे मंजूर करण्यात आली नाहीत.
वरील ठरावाप्रमाणे कार्यवाही करून खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी शासनाकडे पाठपुरावा करावा.
मा. अध्यक्षांचे उपस्थितांनी आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

---

**Meeting No.** 109 **Meeting Date** 17-Feb-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २७ जानेवारी १९९२ रोजी झालेल्या १०७ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ७.१.९२ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती.

ठराव :

---

**Item No.** 3 **Resolution No.** 2031

विषय : प्राधिकरणाच्या अखत्यारीतील पुणे/औरंगाबाद/नागपूर मंडळाच्या आस्थापनेवरील सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार या वर्ग-२ मधील पदांची वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार वर्ग-१ या पदात श्रेणीवाढ करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुणे/औरंगाबाद व नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळात सध्या अस्तित्वात असलेल्या वर्ग-२ मधील सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ नियोजनकार या रु. २०००-६०-२३००-द. रो. -७५-३२००-१००-३५०० या वेतनश्रेणीतील पदाची वर्ग-१ मध्ये वास्तुशास्त्र नियोजनकार या रु. ३१००-३५००-१२५-४५०० वेतनश्रेणीत श्रेणवाढ करण्यास मान्यता देण्यात येते.
उपरोक्त ३ पदांपैकी वर्ग-१ मधील वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकाराचे १ पद पदोन्नतीने भरण्यात यावे व उरलेली २ पदे सरळसेवा भरतीने जाहिरातीद्वारे भरण्यात यावीत असे ठरविण्यात आले.

---

**Item No.** 4 **Resolution No.** 2032

विषय : निवासी शिपायाऐवजी देण्यात येत असलेल्या रोख भत्त्यात दि. १.४.१९९० पासून झालेली वाढ मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या विशिष्ट वेतन श्रेणीतील अधिकाऱ्यांना निवासी शिपायाऐवजी देण्यात येत असलेला रोख भत्ता शासनाच्या दि. ११.३.१९९० च्या निर्णयानुसार दि. १.४.१९९० पासून खालीलप्रमाणे सुधारित दराने देण्यास मान्यता देण्यात येते.

१. मुंबईतील अधिकाऱ्यांच्याकरिता रु. २००/- प्रतिमास
२. इतरत्र अधिकाऱ्यांना रु. १५०/- प्रतिमास

तथापि, ज्या अधिकाऱ्यांना ही सवलत अनुज्ञेय समजण्यात आली आहे, अशा अधिकाऱ्यांना त्यांच्या निवासस्थानी शिपाई वापरू नये.

---

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण भवनाच्या संरक्षण भिंतीवर लोखंडी जाळ्या लावण्याच्या कामाच्या निविदांचे विभाजन करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : पुनर्रचित इमारतीमधील निवासी/अनिवासी गाळ्यांची अनधिकृत हस्तांतरणे नियमित करण्याबाबतचे धोरण.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.** 2034

विषय : गृहनिर्माण योजनेतील गाळ्यांची सोडत काढण्याच्या विनियमात सुधारणा करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गृहनिर्माण योजनेतील गाळ्यांच्या सोडत काढण्याच्या संदर्भात बाब टिप्पणीच्या पृष्ठ क्र. २ वर प्रस्तावित केलेल्या अनुक्रम नंबर १ ते ७ वर निर्देशित केलेल्या विनियमातील प्रस्तावित केलेल्या सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 11 **Resolution No.** 2035

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पातील गाळ्यांच्या तात्पुरत्या किंमती ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

गृहनिर्माण महाप्रकल्पातील गाळ्यांची किंमत निश्चित करण्याकरिता मुंबई शहरासाठी खालील निर्दिष्ट केलेल्या तत्वप्रणाली स्वीकारण्यास मान्यता देण्यात येते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ०.२५ चौ. मी. | - ० टक्के नफा. | हे गाळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांव्यतिरिक्त लोकांना वाटप, केल्यास १० टक्के नफा लावण्यात येईल. |
| २) | ०.२५ ते ४० चौ. मी. | - १५ टक्के नफा | |
| ३) | ४० ते ५० चौ. मी. | - ३० टक्के नफा | |
| ४) | ५० चौ. मी. च्या वर | - ५० टक्के नफा | |

मुंबई बाहेरील विभागासाठी गाळ्यांची किंमत निश्चित करताना खालील निर्दिष्ट केलेली तत्त्वप्रणाली स्वीकारण्यात यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ०.२५ चौ. मी. | - ० टक्के नफा. | हे गाळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांव्यतिरिक्त वाटप, केल्यास ५ टक्के नफा लावण्यात येईल. |
| २) | ०.२५ ते ४० चौ. मी. | - १० टक्के नफा | |
| ३) | ४० ते ५० चौ. मी. | - २५ टक्के नफा | |
| ४) | ५० चौ. मी. च्या वर | - ४० टक्के नफा | |

अर्जासोबत आगाऊ रक्कम म्हणून बाब टिप्पणीत प्रस्तावित केलेल्या रकमेवर १ टक्का दरमहा व्याज देऊन शेवटच्या हप्त्यात जुळवून घेण्यात यावे, असे ठरविण्यात आले.

**Item No.** 12 **Resolution No.**

विषय : विशेष नियोजन/प्रा. १ सोलापूर अधिसूचित क्षेत्रातील ११७४.२५ चौरस मीटर क्षेत्राचा भूखंड प्रा. वडवान यांना देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 13 **Resolution No.**

विषय : पाईल फाऊंडेशनचे काम व जोत्यावरील काम असे विभाजन करण्याचे अधिकार संबंधित मुख्य अभियंत्यांना प्रदान करण्याबाबत.

ठराव :

**Item No. 11 Resolution No. 2047**

विषय : एस. पी. नगर, अंबरनाथ जि. ठाणे येथे मध्यम उत्पन्न गट योजनेअंतर्गत ८० गाळे बांधण्याच्या कामाच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एस. पी. नगर, अंबरनाथ, जि. ठाणे येथे मध्यम उत्पन्न गट योजनेअंतर्गत ८० गाळे बांधण्यासाठी मे. आशिर्वाद कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमती रु. ६०,५२,७९६/- (रु. साठ लक्ष बावन्न हजार सातशे शहाण्णव फक्त) यावर वाटाघाटीने कमी करून दिलेल्या ४१.७३ प्रतिशत आहे व त्याची अधिक दराची निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी. त्यानुसार निविदेची रक्कम ८५,७८,६२८/- (रु. पंच्याऐंशी लक्ष, अठ्याहत्तर हजार सहाशे अठ्ठावीस फक्त) आहे. ही निविदा वाजवी दरापेक्षा ०.२५१ टक्के कमी ही योजना आगाऊ अंशदान योजनेअंतर्गत राबविली जाईल असे ठरले.

**Item No. 12 Resolution No. 2048**

विषय : प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणारा गृहनिर्माण महाप्रकल्प निविदांची तपासणी करून शिफारस करण्यासाठी उपसमिती नेमण्याबाबत प्रस्ताव.

ठराव : बाब टिप्पणी क्र. ११०/९२ मधील बाबींचा विचार करून, प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेऊन, गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या विकसकांबरोबर निविदांच्या किंमती खाली आणण्यासाठी वाटाघाटी करून अंतिम निर्णय घेण्यासाठी प्राधिकरणापुढे प्रस्ताव सादर करतील व त्याबाबतची उपसमिती खालीलप्रमाणे असेल.

१. अध्यक्ष/प्राधिकरण
२. उपाध्यक्ष/प्राधिकरण
३. श्री. बाळासाहेब जाधव/सदस्य, प्रा.
४. वित्त नियंत्रक/पा.
५. मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ
६. मुख्य अभियंता/मुंबई मंडळ - निमंत्रक
७. मुख्य अभियंता/प्रा.

**Item No. 13 Resolution No. 2049**

विषय : राजीव गांधी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या नागरी नूतनीकरण योजनेखाली उपलब्ध होणाऱ्या जादा गाळे वितरणाबाबत.

ठराव : बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित करण्यात आलेले दर लाभार्थींनी आपल्या ऑफरप्रमाणे पूर्ण पैसे भरलेले आहेत, त्यांना जुन्या दराने जागा देण्यात यावी. ज्या लाभार्थींनी आपल्या ऑफरप्रमाणे पूर्ण पैसे भरलेले नाहीत, त्यांना सुधारित नव्या दराने जागा देण्यात यावी. लाभार्थींकडून विहित मुदतीच्या म्हणजे एक महिन्याच्या आत प्रतिसाद न मिळाल्यास सुधारित दराप्रमाणे अतिरिक्त गाळे वाटप करण्यात यावे असे ठरविण्यात आले.

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या कामाचा प्रगती अहवाल.

ठराव :

---

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : नागपूर, अमरावती, रायगड व कोल्हापूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी घरे व घरकुले बांधण्यासाठी हुडकोकडून कर्ज घेण्याविषयी प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 16 **Resolution No.** 2050

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळण्याबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रुपये २८.६९ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते. कर्जाव्यतिरिक्त उर्वरित रक्कम लाभार्थीकडून आगाऊ वसूल करण्यात यावी.

---

**Item No.** 17 **Resolution No.**

विषय : सर्व्हे क्र. ३८, ७० आणि ७८ शिवगंगा अंबरनाथ, जि. ठाणे या जमिनीवर मध्यम उत्पन्न गट - १ अंतर्गत १५२ गाळे, मध्यम उत्पन्न गट - ३ अंतर्गत ९६ गाळे आणि ९ दुकाने बांधण्याच्या कामाच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव :

---

**Item No.** 18 **Resolution No.** 2051

विषय : डांबर कंपाऊंड, मुकुंद नगर, धारावी, येथे नियोजित सत्यम सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या ('ए' बिल्डींग) १२४ गाळे असलेल्या इमारतीचे जोत्यावरील बांधकाम करण्यासाठी मागविण्यात आलेली निविदा रद्द करणेबाबत.

ठराव : एकमताने निविदा रद्द करण्याबाबत बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

---

**Item No.** 19 **Resolution No.**

विषय : सि. टी. एस. क्र. २४९/अ/१/३२ नागलापार्क, कोल्हापूर येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत ५२ गाळे बांधणे निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव :

---

**Item No.** 20 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प पोईसर पोलीस विभागाकरिता गृहनिर्माण योजना.

ठराव :

**Item No.** 21 **Resolution No.** 2052

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पातील गाळ्यांच्या तात्पुरत्या किंमती ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत येता जुलै ९२ पर्यंत तयार होऊन वाटपासाठी उपलब्ध होणाऱ्या एकूण ३२०० गाळ्यांच्या किंमतीस प्रस्तावित केल्यानुसार मंजूरी देण्यात आली. तसेच नेहमीच्या अल्पगटाच्या वर्गवारीवर न करता गाळ्यांच्या क्षेत्रफळाच्या विहित केलेल्या वार आकारमानानुसार उत्पन्न रु. ३७०० द. म. पर्यंत व रु. ३७०० चे दर अशा दोन उत्पन्न गटामध्ये वर्गीकरण करून गाळ्याचे वाटप करण्याचे प्रस्तावासही मंजूरी देण्यात आली.

**Item No.** 22 **Resolution No.** 2053

विषय : प्रधान लेखापाल, महाराष्ट्र राज्य (प्रिन्सिपल अकौंटन्ट जनरल) व राष्ट्रीय गृहनिर्माण बँक (नॅशनल हौसिंग बँक) यांची बृहन्मुंबईत पश्चिम उपनगरामध्ये गाळे वितरणाची विनंती.

ठराव : प्रस्तावित केल्याप्रमाणे खालील ठिकाणी बाब टिप्पणीत जोडलेल्या तक्त्यात दर्शविलेल्या दराप्रमाणे गाळे विक्री करण्यास मान्यता देण्यात येते.

| | | प्रति गाळे दर |
|---|---|---|
| टिळक नगर, चेंबूर | ८ ड्युप्लेक्स गाळे (प्रशस्त गाळे) | रु. ९,८७,६००/- |
| आराम नगर, वर्सोवा | २८ गाळे (प्रशस्त गाळे) | रु. ८,४०,०००/- |
| गोराई रोड, बोरिवली | ८ गाळे (प्रशस्त गाळे) | रु. ७,६२,४२०/- |
| | ८ गाळे | रु. ८,०७,०४०/- |

**Item No.** 23 **Resolution No.** 2054

विषय : गौरीशंकर वाडी नं. २, घाटकोपर (पूर्व), येथील इंद्रायणी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या भू-भागाला लागून असलेल्या रस्त्यांपर्यंतचा भू-भाग भाडेपट्ट्यावर देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गौरीशंकर वाडी नं. २, घाटकोपर (पूर्व), येथील इंद्रायणी सहकारी गृहनिर्माण संस्थेला रस्त्यांपर्यंतचा अतिरिक्त भू-भाग परिच्छेद ६ मध्ये सुचविलेल्या व इतर नेहमीच्या अटींवर भाडेपट्ट्यावर देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. याचे अंदाजे क्षेत्रफळ २९४ चौ. मी. एवढे आहे.

**Item No.** 24 **Resolution No.**

विषय : महाप्रकल्पा व्यतिरिक्त इतर लहान मोठ्या गृहनिर्माण योजनांमधून तयार होत असलेल्या गाळ्यांच्या तात्पुरत्या विक्री किंमत ठरविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 24 **Resolution No.**

विषय : महाप्रकल्पा व्यतिरिक्त इतर लहान मोठ्या गृहनिर्माण योजनांमधून तयार होत असलेल्या गाळ्यांच्या तात्पुरत्या विक्री किंमत ठरविण्याबाबत.

ठराव :

**Meeting No.** 111 **Meeting Date** 09-Apr-19

**Item No.** 12 **Resolution No.** 2055

विषय : बृहन्मुंबई येथील पूर्ण वेळ शिक्षकांसाठी विशेष गृहनिर्माण योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाच्या आदेशानुसार बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे शिक्षकांसाठी ५७४ गाळ्यांची योजना राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.
त्यानंतर विषयसूचीवरील इतर विषय स्थगित ठेवण्यात यावे, असे ठरविण्यात येऊन प्राधिकरणाचे सदस्य व संबंधित अधिकारी यांनी मुंबई शहरात गृहनिर्माण महाप्रकल्प योजना ज्या ठिकाणी राबविण्यात येत आहे त्या जागेची पहाणी करण्यात यावी.
त्याचप्रमाणे प्राधिकरणाचे सदस्य व संबंधित अधिकारी यांनी सदर जागेची पहाणी केली.
विषयसूचीवरील स्थगित ठेवण्यात आलेले विशय प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत विचारार्थ घेण्यात यावे, असे ठरविण्यात आले.
त्यानंतर उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 112 **Meeting Date** 23-Apr-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २६-३-१९९२ रोजी झालेल्या ११० व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ९-४-९२ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 2056

विषय : वयाधिक झालेल्या कर्मचाऱ्यांना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्याची सूट देण्याबाबतचे श्शासकीय नियम स्वीकृत करणे.
श्री. पी. एन. जे. कुरुप, उपअवेक्षक (इंग्रजी मजकूर), मुंबई मंडळ यांचे पदोन्नतीचे प्रकरण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. पी. एन. जे. कुरुप, उपअवेक्षक, मुंबई मंडळ हे वयाधिक झाले असल्याने त्यांना शासकीय निर्णयानुसार, अभियांत्रिकी अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विहीत केलेली व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देऊन त्यांना अध्याच्या पदावर कायम करून कनिष्ठ अभियंता या पदावर त्यांच्या मागील ५ वर्षांच्या गोपनीय अहवालांची तपासणी करून ते जर पात्र ठरले तर त्यांना पदोन्नती देण्यात यावी.
तसेच, वयाधिक कर्मचाऱ्यांना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटींपासून सूट देण्याच्या संदर्भातील सामान्य प्रशासन विभागाचे दि. १-११-१९७७ क्र. इएक्सडी १०७६/१९४५/१३७/१७, दि. २८-११-१९७९ क्र. इएक्सडी - १०७६/४५२/१७ चा शासन निर्णय व दि. १७-५-१९८० चे क्र. इएक्सडी - १०८०/३४/१७ चे परिपत्रक या मधील तरतूदी प्राधिकरणाच्या इतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.** 2057

विषय : प्राधिकरणांतर्गत स्वतंत्र उद्यान विभाग तयार करणे व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या कर्मचारी वर्गाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या वसाहतीत उद्यान विकसित करणे, झाडे लावणे, इ. कामासाठी स्वतंत्र उद्यान विभाग निर्माण करण्यासाठी बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे खालील पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येते. उपलब्ध रिक्त पदांचा वापर करून सदरहू पदे भरण्यात यावीत.

| | | |
|---|---|---|
| १. | कार्यकारी अधिकारी (वर्ग-१) (उद्याने वा उपवने) | १ पद (रु. ३०००-१००-३५००-१२५-४५००) |
| २. | उद्यान पर्यवेक्षक वर्ग-३ | ४ पदे (रु. १४००-४०-१६००-५०-२३०० द.रो.-६०-२६००) |

उपरोक्त निर्माण करण्यात येणाऱ्या पदांपैकी कार्यकारी अधिकारी (उद्याने व उपवने) हे पद मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर व उद्यान पर्यवेक्षकाचे प्रत्येकी एक पद मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर मंडळाच्या आस्थापनेवर ठेवण्यात यावे. तसेच मुंबई मंडळाच्या आस्थापनेवरील उद्यान पर्यवेक्षक हे कोंकण मंडळाचेही काम पाहतील. सदर पदे सरळसेवा भरतीने जाहिरातीमार्फत भरण्यात यावीत.

**Item No.** 5 **Resolution No.** 2058

विषय : मोवाड प्रकल्पांतर्गत काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना विशेष भत्ता मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत नागपूर अमरावती जिल्ह्यातील मोवाड, खरगाव, देवळी, आसनेर, वरुण व गणेशपूर येथील पूरग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी गृहबांधणीच्या कामावर कार्यरत असलेल्या विविध संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांचे कार्यक्षेत्र जिल्हा मुख्यालयाच्या बाहेर असल्याने दैनंदिन कामकाज सुलभ रीतीने पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्येकी रु. १०/- प्रतिदिन याप्रमाणे दिनांक १५.४.९२ पासून दोन महिन्यांच्या कालावधीसाठी विशेष भत्ता मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **6** | **Resolution No.** | **2059** |
|---|---|---|---|

विषय : वैद्यकीय कारणास्तव श्रीमती कंकू वसंत मकवाना यांना 'सम्राट' या पुनर्रचित इमारतीतील गाळ्याऐवजी 'शत्रुघ्न' या पुनर्रचित इमारतीतील गाळा क. ५०५ देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्रीमती मकवाना यांना त्यांच्या मुलाचा विशिष्ट आजार विचारात घेऊन 'शत्रुघ्न' या पुनर्रचित इमारतीतील क्रमांक ५०५ चा गाळा खालील अटींवर वितरित करण्यास मान्यता देण्यात येते.

अ) श्रीमती मकवाना यांच्याकडून 'सम्राट' या इमारतीतील गाळा क्रमांक ५०७ चा गाळा मुंबई मंडळाने तात्काळ परत घ्यावा.

ब) 'शत्रुघ्न' या इमारतीतील गाळा क. ५०५ च्या जादा क्षेत्रफळाचे नियमानुसार अधिमूल्य श्रीमती मकवाना यांच्याकडून वसूल करण्यात यावे.

वरीलप्रमाणे मुंबई मंडळाच्या स्तरावर कार्यवाही केल्यानंतर त्याबाबतचा अहवाल शासनाला सादर करण्यात यावा.

| **Item No.** | **7** | **Resolution No.** | **2060** |
|---|---|---|---|

विषय : अमरावती येथे व्यापारी उद्योगाच्या दृष्टीने नागपूर मंडळाने बांधलेल्या प्रशासकीय इमारतीतील जागा नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, अमरावती यांना भाडेतत्वावर देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अमरावती येथील व्यापारी उपयोगाच्या दृष्टीने बांधलेल्या प्रशासकीय इमारतीतील पहिला व दुसरा मजला प्रत्येकी रु. ११.५० लाख इतक्या रकमेस एकरकमी तत्वावर 'दि महाराष्ट्र स्टेट को. ऑप. हौसिंग फायनान्स कार्पोरेशन लि.' व 'धर्मदाय आयुक्त महाराष्ट्र शासन' यांना विक्री करण्यास अध्यक्ष व उपाध्यक्ष/प्रा. यांनी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.
त्याचप्रमाणे या इमारतीतील दुसऱ्या मजल्याऐवजी तिसरा मजला उपसंचालक नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, अमरावती यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या व नगररचना विभागाने मान्य केलेल्या प्रतिमास रु. १२,३१०/- इतक्या दराने भाड्याने देण्यापूर्वी एकरकमी विक्री योजनेद्वारे विक्री करण्याचा प्रथम प्रयत्न करण्यात यावा.

**Item No.** 8 **Resolution No.** 2061

विषय : गिरीपेठ, नागपूर येथील नागपूर मंडळाद्वारा बांधण्यात आलेल्या प्रश्शासकीय इमारत आदिवासी विभागास विक्री करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गिरीपेठ, नागपूर येथील नागपूर मंडळामार्फत बांधण्यात आलेली प्रशासकीय इमारत प्राधिकरणाच्या किंमतीविषयक धोरणानुसार २५ टक्के आकारण्यात येणाऱ्या नफ्याचे प्रमाण कमी करून ते सर्वसाधारण २० टक्के करण्यात येऊन सदर इमारत आदिवासी विकास विभागास रु. ६५.३१ लाख एवढ्या किंमतीस अध्यक्ष/प्रा. व उपाध्यक्ष/प्रा. यांच्या मान्यतेने विक्री केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 9 **Resolution No.** 2062

विषय : पुनर्रचित इमारतीतील निवासी गाळ्यांची अनधिकृत हस्तांतरणे नियमित करताना अनधिकृत व्यक्तींना आकारावयाची किंमत

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई बेटातील पुनर्रचित इमारतीतील गाळ्यात राहणाऱ्या अनधिकृत व्यक्तींच्या नावे त्यांचे गाळे नियमित करताना खाली दर्शविलेल्या तत्वांनुसार काढलेली किंमत आकारण्यात यावी.
१) गाळ्यांच्या बांधकामाची प्रत्यक्ष किंमत अधिक प्रतिवर्षी १२ टक्के दराने किंमतीतील अधिमूल्यन (ॲप्रीसिएशन) - दरवर्षी २ टक्के पसारा.
२) जमिनीच्या किंमती (जमिनीच्या संपादनाची प्रत्यक्ष किंमत) अधिक दरवर्षी १२ टक्के दराने किंमतीतील अधिमूल्यन.

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : श्रीमती आकांक्षा देशपांडे यांना लायब्ररीकरिता १०/१५ फूट आकारमानाचा भूखंड विशेष बाब म्हणून वाटप करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.** 2063

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पातील गाळ्यांच्या तात्पुरत्या किंमती ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गृहनिर्माण महाप्रकल्पांतर्गत दिनांक ३०.९.९२ पर्यंत तयार होऊन वाटपासाठी उपलब्ध होणाऱ्या गाळ्यांच्या किंमती बाब टिप्पणीसोबत [illegible]
मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** **12** **Resolution No.** **2064**

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण-१ सोलापूर, अधिसूचित क्षेत्रातील ११७४.२५ चौ. मी. क्षेत्राचा भूखंड प्रा. वाडवान यांना देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विशेष नियोजन प्राधिकरण-१ सोलापूर, अधिसूचित क्षेत्रातील ११.७४.२५ चौरस मी. क्षेत्राचा भूखंड प्रा. वाडवान यांना देण्याबाबत खाली दर्शविलेले दोन पर्याय मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.

पर्याय - १ : श्री. वाडवान यांना परत करावयाच्या जागेबाबत बाह्यविकास खर्चापोटी रु. ६२/- प्रतिचौरस मीटर व प्रत्यक्ष जागेच्या विकासापोटी रु. १०/- प्रतिचौरस मीटर असे एकूण रु. ७२/- प्रति चौरस मीटर वार्षिक भुईभाड्यासह वसूल करण्यात यावेत. जमिनीचा भाडेपट्टा प्रचलित नियमानुसार ३० वर्षे कालखंडाचा असावा व तसेच परत करावयाच्या जमिनीसाठी पूर्वी मोबदला दिला असल्यास तो श्री. वाडवान यांच्याकडून व्याजासह वसूल करण्यात यावा. भाडेपट्ट्याच्या कालखंडात जर जमीन हस्तांतरण करावयाची असेल तर त्याकरिता नियमाप्रमाणे व भाडेपट्ट्यातील अटींप्रमाणे प्राधिकरणाची परवानगी घेणे श्री. वाडवान यांच्याकरिता आवश्यक असेल.

पर्याय - २ : जर श्री. वाड्वान यांना जमीन पूर्ण मालकी हक्काने (फ्री होल्ड तत्वाने) हवी असेल तर त्यांनी सदर विकसित जमिनीची चालू बाजारभावाप्रमाणे होणारी किंमत भरण्याची तयारी प्राधिकरणास कळवावी. श्री. वाडवान यांची वरीलप्रमाणे तयारी असल्यास सदर विकसित जमिनीची बाजारभावाप्रमाणे होणारी किंमत स्थानीय नगररचना व मूल्यनिर्धारण विभागामार्फत निश्चित करून घ्यावी व जमीन श्री. वाडवान यांना परत करण्यासाठी प्राधिकरणाद्वारे मंजूरी मिळविण्यात यावी.

वरीलप्रमाणे प्राधिकरणाने मंजूर केलेले दोन्ही पर्याय श्री. वाडवान यांना कळविण्यात यावेत व श्री. वाडवान यांच्याकडून होकार प्राप्त झाल्यावर आवश्यक ती पाऊले उचलावीत, असे ठरविण्यात आले.

**Item No.** **13** **Resolution No.** **2065**

विषय : सर्व्हे क्र. १९१/(अ) येरवडा, पुणे येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत ७२ गाळे बांधणे - निविदांबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्व्हे क्रमांक १९१ (अ) येरवडा, पुणे येथील उच्च उत्पन्न गटांतर्गत ७२ गाळे बांधण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदा अस्वीकृत करण्याबाबत मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयात कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

**Item No.** **14** **Resolution No.** **2066**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने महानगरीय विकास प्राधिकरण संघाचे सदस्यत्व स्वीकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महानगरीय विकास प्राधिकरण संघावर म्हाडाच्या वतीने उपाध्यक्ष/प्रा. आणि मुख्य अभियंता/प्रा. हे समासद नेमण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.
तसेच महानगरीय विकास प्राधिकरण संघाच्या अधिमंडळाने ठरवून दिलेली वार्षिक वर्गणी भरण्याचे व म्हाडाच्या वतीने प्रतिनिधीत्व करण्याचे अधिकार उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** **15** **Resolution No.**

विषय : नॅशनल हौसिंग बँक (राष्ट्रीय आयात बँक) भारत सरकारच्या वित्त संस्थेस मुंबई पूर्व व पश्चिम उपनगरातील गाळ्यांचे वाटप.

ठराव :

**Item No.** **16** **Resolution No.** **2067**

विषय : महाप्रकल्पाव्यतिरिक्त इतर लहान मोठ्या गृहनिर्माण योजनांमधून तयार होत असलेल्या गाळ्यांच्या तात्पुरती विक्री किंमत ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गृहनिर्माण महाप्रकल्पाव्यतिरिक्त इतर लहान मोठ्या योजनांमधून बांधण्यात येणाऱ्या गाळ्यांच्या तात्पुरत्या किंमती बाब टिप्पणाच्या सोबत जोडलेल्या तक्त्यामधील रकाना क्र. १३ मध्ये दर्शविलेल्याप्रमाणे प्रति चौरस मीटर दराने ठरविण्यास मान्यता देण्यात येत. तथापि, २५ चौरस मीटरपेक्षा कमी क्षेत्र असलेल्या शिक्षकांसाठी द्यावयाच्या गाळ्यांना १० टक्के लोकेशन प्रॉफिट लावण्यात येऊ नये.
त्याचप्रमाणे बाब टिप्पणाच्या सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये दर्शविलेल्या खालील ठिकाणी बांधण्यात येत असलेले लोटे आणि मध्यम स्वरुपाचे एकूण ५४० गाळे शिक्षक संवर्गासाठी राखून ठेवण्यास मान्यता देण्यात येते.

| अ. क्र. | ठिकाण | गाळ्यांची संख्या |
|---|---|---|
| १) | ओशिवरा | १२० गाळे |
| २) | मजासवाडी | ५० गाळे |
| ३) | विनोबा भावे नगर | २०० गाळे |
| ४) | सिद्धार्थ नगर | १०० गाळे |
| ५) | मजासवाडी | २० गाळे |
| ६) | राजेंद्र नगर | २० गाळे |

**Item No.** 17 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा संक्षिप्त अहवाल.

ठराव :

**Item No.** 18 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण प्रकल्पाचा दिनांक ३१ मार्च, १९९२ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 19 **Resolution No.** 2068

विषय : मुंबई नागरी विकास प्रकल्प-१ अंतर्गत चारकोप-३, सर्व्हे नं. १५७ आणि आकुर्ली येथील सर्व्हे नं. ८८ (पार्ट) ९२ (पार्ट) येथील भूखंड विकसित करणे यासाठी मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी लि. यांना कर्जपुरवठा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी लिमिटेड यांना रु. २२५/- लक्ष कर्ज बाब टिप्पणीत निर्देशित केलेल्या अटी व शर्तीवर मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते. मात्र परतफेडीसाठी विलंब (डिफॉल्ट) झाल्यास जेवढ्या रकमेची परतफेड करण्यास विलंब होईल तेवढ्या रकमेवर विलंब झालेल्या तारखेपासून १६ टक्के दराने व्याज आकारण्यात यावे, ही अट विद्युत कंपनीस घालण्यात यावी, असे ठरविण्यात आले.

**Item No.** 20 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या सक्तीच्या सेवानिवृत्ती योजनेची अंमलबजावणी.

ठराव :

**Item No.** 21 **Resolution No.**

विषय : सुधारित विकास योजना, पुणे येथील आरक्षण क्र. ९० कोथरूड, पुणे येथील दुर्बल घटक योजनेसाठी आरक्षित जमिनीबाबत संपादनाची कार्यवाही पुन्हा सुरू करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 22 **Resolution No.** 2070

विषय : सर्व्हे क्र. ३८, ७० व ७८ शिवगंगा, अंबरनाथ, जिल्हा ठाणे या जमिनीवर मध्यम उत्पन्न गट - १ अंतर्गत १५२ गाळे, मध्यम उत्पन्न गट ३ अंतर्गत ९६ गाळे आणि ९ दुकाने बांधण्याच्या कामाच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्व्हे क्र. ३८, ७० व ७८ शिवगंगा, अंबरनाथ, जिल्हा ठाणे या जमिनीवर मध्यम उत्पन्न गट - १ अंतर्गत १५२ गाळे, मध्यम उत्पन्न गट - ३ अंतर्गत ९६ गाळे आणि ९ दुकाने बांधण्याच्या कामासाठी मेसर्स परेश कन्स्ट्रक्शन यांची निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमती रु. १,३७,५८,४४२/- (रु. एक कोटी सदतीस लाख अठ्ठावन्न हजार चारशे बेचाळीस फक्त) यावर वाटाघाटीने कमी करून दिलेली टक्केवारी ३३.०० प्रतिशत आहे. त्यांनी सदर निविदा (३३ टक्के अधिक) नाकारण्यात यावी.

**Item No.** 23 **Resolution No.** 2071

विषय : सी. टी. एस. क्र. २४९/अ/१/३२ नागला पार्क, कोल्हापूर येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत ५२ गाळे बांधणे - निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, सी. टी. एस. क्र. २४९/अ/१/३२, नागला पार्क, कोल्हापूर येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत ५२ गाळे बांधण्यासाठी मेसर्स परेश कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमतीवर रु. ४७,८३,५३१/- (रुपये सत्तेचाळीस लाख त्र्याऐंशी हजार पाचशे एकतीस फक्त) यावर २७.७१ (सत्तावीस पूर्णांक एकाहत्तर दशांश) दराची निम्नतम निविदा स्वीकारण्यात यावी. त्यानुसार निविदेची रक्कम रु. ६१,०९,०४७/- (रु. एकसष्ट लाख नऊ हजार सत्तेचाळीस फक्त) आहे.

**Item No.** 24 **Resolution No.**

विषय : नागपूर, अमरावती, रायगड व कोल्हापूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी घरे व घरकुले बांधण्यासाठी हुडकोकडून कर्ज घेण्याविषयी प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव :

**Item No.** 25 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प, पोईसर विभागाकरिता गृहनिर्माण योजना.

ठराव :

**Item No.** 26 **Resolution No.**

विषय : संत तुकाराम नगर, पिंपरी येथील आर. ए. एज्युकेशन सोसायटीला दिलेल्या जागेप्रित्यर्थ भरलेल्या रकमेतील नफ्याची रक्कम माफ करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **27** | **Resolution No.** | **2072** |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे क्र. ५६, चितळसर, मानपाडा, जिल्हा ठाणे या जमिनीवर मध्यम उत्पन्न गटांतर्गत ६० गाळे बांधण्याच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्व्हे क्र. ५६, चितळसर, मानपाडा, ठाणे या जमिनीवर मध्यम उत्पन्न गटांतर्गत ६० गाळे बांधण्यासाठी मे. आशीर्वाद कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमती रु. ३९,९९,७७१/- (रु. एकोणचाळीस लाख नव्याण्णव हजार सातशे एकाहत्तर फक्त) यावर वाटाघाटीने कमी करून दिलेल्या ४६.६८ प्रतिशत अधिक दराची निम्नतम निविदा अस्वीकृत करण्यात यावी. सदरहू निविदेची रक्कम रु. ५८,६६,८६४/- (रु. अठ्ठावन्न लाख सहासष्ठ हजार आठशे चौसष्ठ फक्त) आहे.

| **Item No.** | **28** | **Resolution No.** | **2073** |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे क्र. ५६, चितळसर, मानपाडा, जिल्हा ठाणे या जमिनीवर -
अ) २८० मध्यम उत्पन्न गटांतर्गत गाळे बांधण्याच्या निविदा स्वीकृतीबाबत.
ब) ४८ उच्च उत्पन्न गटांतर्गत गाळे बांधण्याच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्व्हे क्र. ५६, चितळसर, मानपाडा, जिल्हा - ठाणे या जमिनीवर मध्यम उत्पन्न गटांतर्गत २८० गाळे बांधण्यासाठी निम्नतम कंत्राटदार मे. शंकर महादेव कन्स्ट्रक्शन कंपनी व उच्च उत्पन्न गटांतर्गत ४८ गाळे बांधण्यासाठी निम्नतम कंत्राटदार मे. न्यु. महाराष्ट्र कंपनी यांच्या निविदा अस्वीकृत करण्यात याव्यात.

| **Item No.** | **29** | **Resolution No.** | **2074** |
|---|---|---|---|

विषय : एस. पी. नगर, अंबरनाथ, जिल्हा ठाणे येथे मध्यम उत्पन्न गटांतर्गत ८० गाळे बांधण्याच्या कामाच्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
एस. पी. नगर, अंबरनाथ, जिल्हा ठाणे येथे मध्यम उत्पन्न गटांतर्गत ८० गाळे बांधण्यासाठी मे. आशीर्वाद कन्स्ट्रक्शन यांची निविदेत दर्शविलेल्या अंदाजित किंमती रु. ६०,५२,७९६/- (रुपये साठ लक्ष बावन्न हजार सातशे शहाण्णव फक्त) यावर वाटाघाटीने कमी करून दिलेल्या ४१.७३ प्रतिशत आहे व त्याची अधिक दराची निम्नतम निविदा अस्वीकृत करण्यात यावी. निविदेची रक्कम रु. ८५,७८,६२८/- (रुपये पंच्याऐंशी लक्ष अठ्ठ्याहत्तर हजार सहाशे अठ्ठावीस फक्त) आहे. तसेच यापुढील आकर्षक जाहिरातीचे प्रारुपही दुरुस्तीसह मंजूर करण्यात आले.

**Item No.** 30 **Resolution No.** 2075

विषय : प्राधिकरणामध्ये प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांची वैद्यकीय खर्चाची देयके प्रमाणित करण्यासाठी डॉ. ए. टी. वागळे यांना विशेष मानधन देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणात प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांनी सादर केलेली वैद्यकीय खर्चाची देयके प्रमाणित करण्यासाठी डॉ. ए. टी. वागळे यांना प्राधिकरणाच्या निधीमधून दरमहा ५००/- रुपये एवढे मानधन देण्यास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी वैद्यकीय तपासणीसाठी डॉ. वागळे यांचेकडे गेल्यास त्यांची वैद्यकीय तपासणी मोफत करण्यात यावी.
उपरोक्त खर्चाची तरतूद सन १९९२-९३ या अर्थसंकल्पात केलेली नसल्याने वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांनी सदर खर्चाची तरतूद पुरवणी अर्थसंकल्पात करण्याबाबतची कार्यवाही त्वरित करावी, असे ठरविण्यात आले.

**Item No.** 31 **Resolution No.** 2076

विषय : नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या दुरुस्ती व पुनर्रचना मंडळासाठी संचालक हे पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर दुरुस्ती व पुनर्रचना विभागाचे काम हाताळण्यासाठी रु. ३७००-१२५-४७००-१५०-५००० या वेतनश्रेणीत भारतीय प्रशासन सेवेतील एक अधिकारी नेमण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 32 **Resolution No.** 2077

विषय : प्राधिकरणाच्या घरबांधणी विकसित भूखंड अशा योजना रु. ३५ लाख व त्यापेक्षा कमी अशा तुकड्यात अनुमती देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुख्य अधिकारी (मुंबई मंडळ वगळता इतर विभागीय मंडळ) यांना गृहनिर्माण योजना व भूखंड विकास योजनांची रु. २५ लाखांपेक्षा कमी विभागात विभाजन करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. तथापि, विभाजन करताना ठोस मागणी विचारात घ्यावी तसेच स्थानिक संस्थेकडे पाठपुरावा करून बाह्य सुविधांची परिपूर्ती करून घ्यावी व असे विभाजन मुख्य अधिकाऱ्यांनी त्या विभागीय मंडळाकडून मंजूर करून घ्यावे.
बैठक संपल्यानंतर सदस्य श्री. मांजरेकर यांनी कला व क्रीडा मंडळासाठी १५,०००/- रुपये वर्ग करण्यासाठी बाब टिपण आलेले नाही, असे निदर्शनास आणून दिले. या संदर्भात बाब टिपण तयार करून आगामी बैठकीत सादर करावे, असे सुचविण्यात आले.
यानंतर उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 113 **Meeting Date** 14-May-1

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २३-४-१९९२ रोजी झालेल्या ११२ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २६.३.१९९२ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 2078

विषय : प्राधिकरणाच्या व प्रादेशिक मंडळामधील कर्मचाऱ्यांच्या क्रीडा महोत्सवांना अनुदान मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रत्येक प्रादेशिक मंडळास रु. ५,०००/- क्रीडावृद्धीसाठी मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते. सदर निधीचा उपयोग मुख्याधिकारी यांनी क्रीडावृद्धीसाठीच करावा, असे ठरविण्यात आले. त्याचप्रमाणे मुख्याधिकारी यांनी प्रादेशिक मंडळाच्या स्तरावर कर्मचाऱ्यांमधील खेळाडूंची स्थानिक समिती स्थापन करावी.

**Item No.** 4 **Resolution No.** 2079

विषय : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवर तात्पुरते निर्माण करण्यात आलेल्या वाहनचालकाच्या अधिसंख्य पदास मुदतवाढ देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, श्री. फ्रान्सिस पॉल पंडित यांच्यासाठी पुणे मंडळाच्या आस्थापनेवर दि. २ मे, १९९० पासून १ वर्षाच्या कालावधीसाठी निर्माण करण्यात आलेल्या वाहनचालकाच्या अधिसंख्य पदाचा कालावधी दि. २ मे, १९९२ पासून दि. १६.१०.१९९२ पर्यंत किंवा पुणे मंडळाचे सभापती श्री. विठ्ठल लडकत या पदावर कार्यरत आहेत तोपर्यंत किंवा यापैकी जो कालावधी आधी संपेल त्या कालावधीपर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात येते.

| Item No. | 5 | Resolution No. | 2080 |
|---|---|---|---|

विषय : मुख्य अभियंता, राजीव गांधी प्रकल्प हे पद नागपूर मंडळाच्या आस्थापनेवर परिवर्तित (डायवर्ट) करणे आणि उपमुख्य अभियंता संवर्गातील २ पदे प्रत्यार्पित (सरेंडर) करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवास प्रकल्पाच्या आस्थापनेवरील मुख्य अभियंता हे पद नागपूर मंडळात परिवर्तित (डायवर्ट) करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मुख्य अभियंता या पदावर काम करणारे श्री. महाजन यांची नियुक्ती नागपूर मंडळाच्या आस्थापनेवर मुख्य अधिकारी म्हणून मुख्य अभियंता श्रेणीमध्ये करण्यात यावी. तसेच श्री. महाजन हे नागपूर व औरंगाबाद मंडळाचे मुख्य अभियंता म्हणून तांत्रिक काम पाहतील.
त्याचप्रमाणे बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे जागतिक बँक प्रकल्पाच्या आस्थापनेवरील उपमुख्य अभियंता संवर्गातील १ रिक्त पद श्री. केदारे, मुख्याधिकारी, नागपूर मंडळ यांची सेवा दिनांक ३१.५.९२ पासून प्रत्यावर्तित केल्यानंतर उपमुख्य अभियंता या संवर्गातील रिक्त होणारे पद अशी एकूण २ पदे प्रत्यार्पित (सरेंडर) करण्यात यावीत. जागतिक बँक प्रकल्प व राजीव गांधी प्रकल्प या विभागातील मुख्य अभियंत्याचे काम मुख्य अभियंता/प्रा. यांनी त्यांचे नियमित कर्तव्य म्हणून पहावे व दोन्ही प्रकल्पातील उपमुख्य अभियंता यांनी मुख्य अभियंता/प्रा. यांच्या तांत्रिक नियंत्रणाखाली व पर्यवेक्षणाखाली कामे पहावीत.

| Item No. | 6 | Resolution No. | 2081 |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रु. २२४.९१ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.
कर्जाव्यतिरिक्त उर्वरित रक्कम लाभार्थीकडून आगाऊ वसूल करण्यात यावी.

| Item No. | 7 | Resolution No. | 2082 |
|---|---|---|---|

विषय : हुडको अर्थसहाय्यित क्र. ७, ३४ व ३५ मुकुंदवाडी, औरंगाबाद येथील संमिश्र गृहनिर्माण योजना -
(योजना क्र. १०५८)
१) अल्प उत्पन्न गट १२१८ गाळे.
२) मध्यम उत्पन्न गट २४४ गाळे
३) उच्च उत्पन्न गट - अ ४१ गाळे
४) उच्च उत्पन्न गट - ब ४२ गाळे
हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
उपरोक्त योजनेस हुडकोकडून एकूण ६३९.०४ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते. प्रकल्पाची एकूण किंमत व हुडकोचे कर्ज यामधील फरकाची रक्कम लाभार्थींकडून आगाऊ वसूल करण्यात यावी.

| Item No. | 8 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : पूरग्रस्तांचे पुनर्वसन - नागपूर व अमरावती जिल्ह्यातील घरे व घरकुलाच्या कामाच्या प्रगतीबाबत.

ठराव :

| Item No. | 9 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : प्रस्तावित अमरावती व नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ स्थापन करण्याबाबत.

ठराव :

| Item No. | 10 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : पोलीस गृहयोजनेकरिता कांदिवली, पोईसर येथील भूखंड पोलीस खात्याला देणेबाबत.

ठराव :

| Item No. | 11 | Resolution No. | 2083 |
|---|---|---|---|

विषय : पूर्ण वेळ शिक्षकांसाठी विशेष गृहनिर्माण योजना-
गाळ्यांच्या विक्री किंमतीची निश्चिती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीच्या पृ. क्र. ३ वर प्रस्तावित केल्याप्रमाणे रकाना नं. १० मध्ये दर्शविलेल्या किंमतीनुसार शिक्षण प्रवर्गासाठी विशेष गृहनिर्माण योजना राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.
याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे माहितीसाठी पाठवावा.

**Item No.** 12 **Resolution No.** 2084

विषय : मुंबई पत्रकार संघ व मंत्रालय, वार्ताहर संघ यांच्या वार्ताहर सदस्यांना मुंबई मंडळाचे गाळे वितरित करण्याबाबतचा प्रस्ताव.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीच्या पृ. क्र. ४ व ५ वर निर्देशित केल्याप्रमाणे पत्रकारासाठी खालील निर्दिष्ट केलेल्या योजनेतील २९३ गाळे विक्री करण्यास अनुमती देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १) | धारावी | ७२ गाळे |
| २) | चांदिवली (महाप्रकल्प) | ११२ गाळे |
| ३) | राजेंद्रनगर, बोरिवली | ९४ गाळे |
| ४) | उन्नत नगर | १५ गाळे |
| | एकूण | २९३ गाळे |

तथापि, पत्रकारांसाठी २.५ टक्के या राखीव गटातूनच हे गाळे दर्शविण्यात यावे. त्याचप्रमाणे विक्री किंमतीबाबत व २.५ टक्के या आरक्षित गटात हे गाळे दाखविण्यासाठी शासनाचे आदेश प्राप्त करून घेण्याबाबत व त्याचप्रमाणे महाप्रकल्पांतर्गत चांदिवली येथील गाळे किंमत कमी करून वितरित करावयाचे असल्या कारणाने किंमतीच्या अनुरुप गाळ्यांच्या बांधकामामध्ये फरक व भिन्नता ठेवावी, यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** **13 (A)** **Resolution No.** **2085**

विषय : गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या मजासवाडी, चांदिवली व ओशिवरा-गोरेगाव प्रकल्पास मुदतवाढ.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

महाप्रकल्प गृहनिर्माण अंतर्गत राबविण्यत येणाऱ्या मजासवडी, चांदिवली व ओशिवरा-गोरेगाव येथील प्रत्येक प्रकल्पांना खालीलप्रमाणे टप्प्याटप्प्याने मुदतवाढ देण्यात खालील अटींवर मंजूरी देण्यात येते.

१) प्रस्तावित मुदतवाढ

| प्रकल्प | ३०.५.९२ | ३१.७.९२ | ३१.८.९२ | ३०.९.९२ | ३१.१०.९२ | ३०.११.९२ | ३१.१२.९२ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १)मजासवाडी | १५०० गाळे | - | - | - | ९२९ गाळे | - | - |
| २) चांदिवली | - | ८४० गाळे | ४८० गाळे | ४८० गाळे | ३१४ गाळे | ४०८ गाळे | - |
| ३) ओशिवरा १,२ | - | - | - | - | - | ४९६ गाळे | - |
| ४) ओशिवरा ३ | - | १९२ गाळे | - | - | - | - | - |
| ५) गोरेगाव | - | - | - | - | - | - | १२१२ गाळे |

२) अटी -

१) विकासकाने काम पूर्ण करण्याचा सुधारित कार्यक्रम (बार चार्ट) ७ दिवसांचे आत मुख्य अभियंता/मु. सं. यांचेकडून मंजूर करून घ्यावा, जेणेकरून वर उल्लेखित मुदतवाढीत काम पूर्ण करता येईल.

२) वर विकासकाने सुधारित मंजूर कार्यक्रमानुसार बांधकामाची गती ठेवली नाही, तर त्यावर करारनाम्यातील अटींनुसार नुकसान भरपाई (पेनल्टी) लावली जाईल.

३) विकासकाकडून जी नुकसान भरपाई मुदतवाढ देणेपूर्वी वसूल करण्यात आली आहे ती मुंबई मंडळाने सस्पेन्स अकाऊंटमध्ये ठेवावी. जर विकासकाने वर उल्लेखित सुधारित कार्यक्रमानुसार काम पूर्ण केले व प्राधिकरणास टप्प्याटप्प्याने गाळे विलंब न लावता दिले तर विकासकाकडून वसूल केलेली नुकसान भरपाई त्यास काम पूर्ण झाल्यावर परत करावी.

**Item No. 13 (B) Resolution No. 2086**

विषय : महाप्रकल्पाच्या निविदेत दरवाजे व खिडक्यांकरिता नमूद केलेल्या सागवानी लाकडाऐवजी इतर साहित्याचा वापर करणेबाबत.

ठराव : ओशिवरा गोरेगाव प्रकल्प

या विषयावर चर्चा होऊन एकमताने निर्णय घेण्यात आला की, ओशिवरा, गोरेगाव येथील प्रकल्पाकरिता सागवानी लाकडाचे चौकटीऐवजी पॉलिनॉर्मा चौकटीचा वापर करण्यास खालील अटींवर मान्यता देण्यात येते.

१) ओशिवरा-गोरेगाव प्रकल्पासाठी मे. बी. जी. शिर्के पावडर विलेपित पॉलीनॉर्म चौकटीचा वापर करतील व त्याकरिता रु. १३५/- प्रति नग किंवा रु. ११०/- प्रति घनफूट सूट देतील.

२) मेसर्स बी. जी. शिर्के हे ओशिवरा - ३ प्रकल्पाच्या १९२ गाळ्यांकरिता प्रायमल विलेपित चौकटी वापरतील. या योजनेत दार व खिडक्यांकरिता वापरण्यात येणाऱ्या चौकटी व शटरस् यांना सारखे दिसण्याकरिता एक प्रायमरचा थर (बेकड्) व दोन सिन्थेटिक इनॅमल पेंटचे थर स्प्रे पेंटींग करण्यात येईल. प्रायमर विलेपित चौकटींसाठी पावडर विलेपित चौकटीच्या मानाने अतिरिक्त रु. ६० ते ६५ सूट द्यावी लागली असती. परंतु मेसर्स बी. जी. शिर्के स्प्रे पेंटिंग केलेले दरवाजे लावणार असल्यामुळे वर उल्लेखित रु. १३५/- प्रति नग सूट घेण्यात येईल. ही व्यवस्था ओशिवरा-३ या प्रकल्पातील फक्त १९२ गाळ्यांकरिता राहील.

३) ओशिवरा-१ व २ तसेच गोरेगाव येथील कामाकरिता पावडर विलेपित चौकटींचाच वापर करण्यात येईल व त्याकरिता रु. १३५/- प्रति नग सूट वसूल करण्यात येईल.

**Item No.** 13 (C) **Resolution No.** 2087

विषय : चांदिवली प्रकल्प.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

चांदिवली येथील महाप्रकल्पासाठी सागवानी लाकडाचे दरवाजे व खिडक्यांऐवजी (चौकट व शटर्स - शटर्समधील पॅनेल मात्र निविदेप्रमाणे पार्टीकल बोर्डचे) मलेशियन पिवळे बलावू लाकडापासून तयार केलेले दरवाजे व खिडक्या (चौकटी व शटर्स - शटर्समधील पॅनेल मात्र निविदेप्रमाणे पार्टीकल बोर्डचे) वापरण्यास विकासकास अगोदर तोंडी कळविण्यात आले होते की, प्राधिकरणास त्यांचा प्रस्ताव मंजूर आहे, म्हणून खालील अटींवर मान्यता देण्यात येते.

१) विकासकावर फक्त १५०० अल्प उत्पन्न गटाच्या गाळ्यांकरिता रासायनिक प्रक्रिया व सिझनिंग केलेले मलेशियन पिवळे बलावू लाकडांचा वापर करतील. १५०० पेक्षा जास्तीच्या अल्प उत्पन्न गटाच्या गाळ्यांना निविदेतील तरतुदींनुसार सागवानी लाकडाचेच दरवाजे व खिडक्या बसविल्या जातील.

२) मलेशियन पिवले बलावू लाकडाच्या वापराकरिता विकासकाकडून रु. ८५/- प्रति घनफूटास सूट घेण्यात येईल व ही रक्कम देयकातून वळती करण्यात येईल.

३) मध्यम उत्पन्न व उच्च उत्पन्न गटांच्या गाळ्यांकरिता विकासक निविदेतील तरतुदींनुसार फक्त सागवानीच लाकडाचा वापर करतील.

**Item No.** 13 (D) **Resolution No.** 2088

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पात हस्तांतरणीय विकास हक्क (टी. डी. आर.) चा उपयोग करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

बाह्य सुविधा व आराखड्यातील डी. पी. रोडवरील सुविधांचा ५० टक्के खर्च द्यावयाचे महानगरपालिकेने मान्य केले नाही तर प्रकल्प पूर्ण करणेच विलंब होऊन प्राधिकरणास ते तोट्याचे ठरणार असल्याने सद्य परिस्थितीत हा ५० टक्के खर्च प्राधिकरण देईल. महानगरपालिकेने हा खर्च द्यावयाचे मान्य करणेसाठी प्राधिकरणाने विविध पातळीवर प्रयत्न करावेत.

तसेच, मजासवाडी येथील नाल्याच्या बांधकामाचा ५० टक्के खर्च तूर्त प्राधिकरणाने द्यावा व हा खर्च महानगरपालिकेकडून वसूल करण्यासाठी प्राधिकरणाने विविध पातळीवर प्रयत्न करावेत.

**Item No.** 13 (E) **Resolution No.** 2089

विषय : महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम खाते. ठराव क्रमांक बीडीजी-१०९१/सीआर-१२/बीएलडीजी-२, दिनांक १०.१.१९९२ नुसार माववाढ मिळणेबाबत.

ठराव : महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम खाते, ठराव क्र. बीडीजी-१०९१/सीआर-१२/बीएलडीजी-२, दिनांक १०.१.१९९२ प्राधिकरणाने अवलंबवावा व त्यातील पान क्र. ६ वरील अट क्र. ३ (१) प्राधिकरणाच्या महाप्रकल्पातील गृहनिर्माण योजनांना लागू होणार नाही. महाप्रकल्पाच्या प्रत्येक योजनेत शासन निर्णयानुसार निविदेतील तरतूदी व्यतिरिक्त माववाढ देण्यात यावी.

**Item No.** 13 (F) **Resolution No.** 2090

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या विकासकांना देण्यात आलेल्या मोबिलायझेशन अग्रिमाची वसूली करणेबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे एकमताने निर्णय घेण्यात आला.
१) ३० एप्रिल, १९९२ रोजी वसूल न झालेल्या मोबिलायझेशन अग्रिमाच्या तफावतीवर अग्रिम दिल्याच्या दिनांकापासून १५ टक्के व्याजाचा दर आकारून त्या अग्रिमाची वसूली दि. ३१ जुलै, १९९२ पूर्वी व्हावी.
२) प्रत्येक महिन्याच्या शेवटी वसूल करावयाचे मोबिलायझेशन अग्रिम व वसूल केलेली अग्रिम यांची तफावत काढावी व त्यावरील व्याज व मुद्दल प्रत्येक महिन्याच्या देयकातून वसूल करण्यात यावी. जेणेकरून व्याजापोटी वसूल करावयाची रकमेची बाकी व वसूल न केलेले मुद्दल दि. ३१.७.९२ पूर्वी वसूल करण्यात यावी. ७५ टक्के काम (जे ८० टक्के वेळेत पूर्ण होणे अपेक्षित आहे) पूर्ण होण्यापूर्वी संपूर्ण मोबिलायझेशन अग्रिम व त्यावरील व्याजाची वसूली करण्यात यावी.

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या दि. ३०.४.९२ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 15 **Resolution No.** 2092

विषय : नॅशनल हौसिंग बँकेला वाटप करण्यात आलेल्या टिळक नगर, चेंबूर येथील १८ गाळे स्टॉक होल्डिंग कार्पोरेशन लि. या संस्थेला एकरकमी विक्री पद्धतीने वाटप करण्याबाबत आणि नॅशनल हौसिंग बँकेला आरामनगर येथील वाटप केलेले ७०० चौ. फूट क्षेत्रफळाच्या २८ गाळ्यांच्या बदल्यात ६३३ चौ. फूटाचे गाळे देणेबाबत.

ठराव : नॅशनल हौसिंग बँकेला टिळक नगर, चेंबूर येथील उच्च उत्पन्न गटातील १८ गाळे विक्री केलेले होते. ते त्यांच्याकडून परत घेऊन ते स्टॉक होल्डिंग कार्पोरेशन लि. या संस्थेला, नॅशनल हौसिंग बँकेला ज्या किंमतीने विक्री केले होते त्याच किंमतीने विकण्यात यावेत. स्टॉक होल्डिंग कार्पोरेशन लिमिटेड कंपनीने १८ गाळ्यांचे पैसे मंडळाकडे भरणा केल्यानंतरच त्यांना त्या गाळ्यांची विक्री कर्मचारी निवासस्थान म्हणून करण्यात यावी व नॅशनल हौसिंग बँकेने १८ गाळ्यांची मंडळाकडे भरणा केलेली रक्कम त्यांना परत करण्यात यावी. तसेच आराम नगर, वर्सोवा येथील भूखंड क्र. 'अे' वरील वाटप करण्यात आलेल्या २८ गाळ्यांऐवजी लगतच्या भूखंड क्र. 'सी' वरील कमी क्षेत्रफळाचे बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे २८ गाळे बदली करून देण्यात यावेत. बदली करून देण्यात येणारे कमी क्षेत्रफळाचे गाळे असल्यामुळे नॅशनल हौसिंग बँकेला रु. २२,५१,२००/- खर्चाची रक्कम परत करण्यात यावी.

**Item No.** 16 **Resolution No.** 2093

विषय : गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळ्यांची विक्री हस्तांतरण व अदलाबदल) विनियम १९८१.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गाळेवाटप विनियमातील सुचविलेल्या दुरुस्तीत शासनाने पत्र क्र. एमएसजी/१९९२/२९१/का. ४, दिनांक ३०.३.१९९२ अन्वये दिलेल्या संमतीची नोंद प्राधिकरणाने घेतली. तथापि, शासनाने ज्या काही दुरुस्त्या केल्या आहेत त्यासंबंधी शासनाने फेरविचार करावा म्हणून पुन्हा शासनाकडे चर्चेत नमूद केल्याप्रमाणे प्रस्ताव पाठविण्यात यावा.
प्राधिकरणाने सुचविलेले बदल खालीलप्रमाणे आहेत :
१) विशिष्ट प्रवर्गाच्या योजनेचा प्रस्ताव प्राधिकरणाने तयार करून त्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाकडून मान्यता मिळवावी.
२) दोन वेळा जाहिरात देऊनही ज्या गाळ्यांचे/भूखंडाचे वाटप होऊ शकले नाही अशा रिक्त गाळे/भूखंडाच्या वाटपांकरिता प्राधिकरणाने प्रस्ताव तयार करावा व त्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी त्यास शासनाची मंजूरी मिळवावी.
३) वाटपासाठी अपात्र ठरलेल्या अर्जदारांचे अर्ज सोडतीच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत निकाली काढावेत आणि संपूर्ण कॅलेंडर महिन्यासाठी १ टक्का या दराने व्याज देऊन अर्जासोबत भरलेली रक्कम परत करण्यात यावी.

| **Item No.** | **17** | **Resolution No.** | **2094** |
|---|---|---|---|

विषय : राजीव गांधी प्रकल्पांतर्गत बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतींच्या रक्षणार्थ पहारेकऱ्यांच्या खर्चाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पहिल्या सहा महिन्यांऐवजी एक वर्षाच्या कालावधीसाठी होणाऱ्या पहारेकऱ्यांच्या खर्चाची परतफेड ठेकेदारास करण्यासंबंधीचे मंजूरीचे अधिकार संचालक/राजीव गांधी प्रकल्प यांना प्रदान करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.
त्याचप्रमाणे प्रादेशिक मंडळाचे मुख्याधिकारी यांनाही अशा तऱ्हेचे अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **18** | **Resolution No.** | **2095** |
|---|---|---|---|

विषय : नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्यालयासाठी खरेदी केलेल्या वाहनांसाठी झालेल्या खर्चास व खरेदीच्या कृतीस कार्योत्तर मान्यता देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नागपूर मंडळाच्या कार्यालयासाठी आवश्यक असलेल्या नवीन वाहन खरेदीची कृती नियमित करून नवीन वाहनांच्या खरेदीस व त्यासाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

| **Item No.** | **19** | **Resolution No.** | **2096** |
|---|---|---|---|

विषय : एस. एम. जोशी, सोशलिस्ट फाऊंडेशन या संस्थेस पुणे येथील लक्ष्मीनगर मधील व्यापारी संकुल-१ मधील कार्यालयीन गाळा क्र. १ एकरकमी खरेदी तत्वावर देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे एस. एम. जोशी, सोशलिस्ट फाऊंडेशन या संस्थेस पुणे येथील लक्ष्मीनगरमधील व्यापारी संकुल-१ मधील कार्यालयीन गाळा क्र. १ रु. ७५०/- प्रति चौ. फूट या दराने एकरकमी खरेदी पद्धतीने विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** **20** **Resolution No.** **2097**

विषय : मुंबईबाहेरील विभागांसाठी गाळ्यांची किंमत निश्चित करताना आकारावयाच्या नफ्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई बाहेरील गाळ्यांची किंमत निश्चित करण्यासाठी पुणे शहरासाठी ६० चौ. मीटरच्यावर क्षेत्रफळ असलेल्या गाळ्यांकरिता ४० टक्के नफा आकारण्यात यावा. नागपूर, औरंगाबाद आणि पुणे विभागातील पुणे शहर सोडून इतर गावांकरिता हा नफा ४० टक्के धरावा. परंतु अशी काढलेली किंमत त्या ठिकाणच्या बाजारभावापेक्षा जास्त असू नये. मात्र इतर बाबींसाठी प्राधिकरणाच्या दि. १७.२.१९९२ च्या ठराव क्र. २०३५ अनुसार घेण्यात आलेल्या निर्णयामध्ये कोणताही बदल होणार नाही.

**Item No.** **21** **Resolution No.** **2098**

विषय : महाराष्ट्र हौसिंग बोर्ड इम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. यांना कर्ज देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र हौसिंग बोर्ड एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड यांना रु. १० लाख कर्ज/ठेव खालील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
१) सदर कर्ज/ठेव यांची परतफेड आठ समान मासिक हप्त्यांमध्ये व्याजासह करण्यात यावी.
२) सदर कर्ज/ठेव यावर द.सा.द.शे. १२.६२ टक्के प्रतिशत दराने व्याज आकारण्यात यावे.
३) व्याजासहित येणे रकमेच्या हप्ता पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत वित्त नियंत्रक/प्रा. यांच्याकडे होणे आवश्यक राहील.
विषयसूचीवरील विषय संपल्यानंतर श्री. मांजरेकर, सदस्य यांनी सांगितले की, शासकीय कर्मचारी/अधिकारी यांचेसाठी १ जुलै १९९२ व १ जानेवारी १९९२ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत शासनाचे आदेश प्राप्त झालेले आहेत. त्याप्रमाणे प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागू करावेत व वाढीव महागाई भत्त्याची रक्कम वाटप करण्यात यावी. त्यावर सचिव/प्रा. यांनी सांगितले की शासनाकडून निर्णय नुकताच प्राप्त झालेला आहे, त्यावर कार्यवाही चालू आहे. यानंतर उपस्थितांनी मा. अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** **114** **Meeting Date** **19-Jun-19**

**Item No.** **1** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १४-५-१९९२ रोजी झालेल्या ११३ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** **2** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २३-४-१९९२ रोजी झालेल्या ११२ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती.

ठराव :

**Item No.** **3** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या जानेवारी १९९१ ते डिसेंबर १९९२ पर्यंत (बैठक क्र. ९६ ते १०६) झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

ठराव :

**Item No.** **4** **Resolution No.** **2099**

विषय : जागतिक बँक प्रकल्प विभागाच्या आस्थापनेवरील मुख्य अभियंता हे पद प्रत्यार्पित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाचे आदेश क्र. एसएच/एसटीपी१५९१/१२४५६/प्र. १०, दिनांक २९.८.१९९१ अन्वये राखीव म्हणून संचित करण्यात आलेले जागतिक बँक प्रकल्प विभागाच्या आस्थापनेवरील मुख्य अभियंत्यांचे एक पद प्रत्यार्पित (सरेंडर) करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 5 **Resolution No.** 3000

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कार्यालयातील वाहनचालक व शिपाई संवर्गातील कर्मचाऱ्यांना अतिकालिक भत्ता देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कार्यालयात काम करणाऱ्या वाहनचालक, शिपाई, चौकीदार व पहारेकरी या संवर्गातील कर्मचाऱ्यांना बाब टिप्पणीत नमूद केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे अतिकालिक भत्ता दिनांक १/७/१९९२ पासून लागू करण्यात यावा. तसेच यापूर्वी प्रलंबित असलेला अतिकालिक भत्ता प्राधिकरणाच्या दिनांक ७/४/१९८७ च्या परिपत्रकान्वये देण्यात यावा. सध्या या कर्मचाऱ्यांसाठी ज्या कामाच्या वेळा ठरवून दिलेल्या आहेत त्यामध्ये कुठलाही बदल करण्याची आवश्यकता नाही.
मात्र यापुढे शासनाने कार्यालयातील वाहनचालक, शिपाई, चौकीदार व पहारेकरी या संवर्गातील कर्मचाऱ्यांना अतिकालिक भत्त्यांत वाढ झाल्यास त्याबाबतचे शासन निर्णय प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहे.

**Item No.** 6 **Resolution No.** 3001

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या निविदा सूचना, नोकरी विषयक व गाळे वितरण विषयक जाहिराती, खाजगी जाहिरात संस्थेमार्फत प्रसिद्ध करण्यात आल्यामुळे झालेल्या जादा खर्चाचे निर्लेखन करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मे. जॉर्ज जॉन ॲडव्हरटायझिंग या खाजगी जाहिरात संस्थेमार्फत यापूर्वी प्राधिकरणाने दिलेल्या जाहिरातींसाठी जो जादा खर्च आला त्या रु. ४०,४६९/- हा खर्च निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येते. उपरोक्त चर्चेप्रमाणे एक नामांकित कंपनी जाहिरात आकर्षक करण्यासाठी कायम करण्यात यावी.

**Item No.** 7 **Resolution No.** 3002

विषय : बनेवाडी, कराड येथील १३६ गाळे अल्प उत्पन्न गटामधील शासन कर्मचाऱ्यांना वितरित करण्यात आलेल्या ४७ गाळेधारकांकडून सुरुवातीस भरावयाची रक्कम कमी करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बनेवाडी, कराड येथील ४७ शासकीय कर्मचारी गाळेधारकांकडून सुरुवातीस भरावयाची रक्कम रु. ४,७७५/- चे ऐवजी रु. १,०००/- स्वीकारणे व मासिक हप्ता रु. ७३/- वरून रु. ११०/- असा सुधारित करण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.** 3003

विषय : प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या पोईसर येथील गृहनिर्माण महाप्रकल्पाच्या निविदांबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गृहनिर्माण महाप्रकल्पातील पोईसर प्रकल्पासाठी युनिटी कन्स्ट्रक्शन कंपनीची अंतिम वाटाघाटी केल्यानंतर कमी केलेल्या किंमतीची निविदा खालील तपशीलानुसार स्वीकारण्यात यावी.एकमताने निर्णय घेतला की,
गृहनिर्माण महाप्रकल्पातील पोईसर प्रकल्पासाठी युनिटी कन्स्ट्रक्शन कंपनीची अंतिम वाटाघाटी केल्यानंतर कमी केलेल्या किंमतीची निविदा खालील तपशीलानुसार स्वीकारण्यात यावी.
सेक्टर - १ : यामध्ये बांधावयाच्या अल्प उत्पन्न गटातील प्रत्येक चौरस

फूटास बांधकाम दर सर्व बाह्य सुविधांसह रु. ३२५/- आणि मध्यम उत्पन्न गटातील बांधावयाच्या प्रत्येक चौरस फूटाच्या सर्व सुविधांसह दर रु. ३५५/- खालील तपशीलानुसार राहील. वरील दराप्रमाणे सेक्टर-१ ची निविदा रक्कम खालीलप्रमाणे येते. रु. २,५१,४४,०००/- (रु. दोन कोटी एक्कावन्न लाख चव्वेचाळीस हजार फक्त).
वरील दराप्रमाणे सेक्टर-२ ची निविदा रक्कम खालीलप्रमाणे येते. (रुपये ३,२७,६०,०००/-) (रु. तीन कोटी सत्तावीस लाख साठ हजार फक्त)
वरील दर खालील अटींवर मान्य करण्यात येत आहेत.
१) सेक्टर १ व २ चे काम कार्यादेश दिल्यापासून १२ महिन्यांत पूर्ण करावयाचे आहे.
२) वरील कामावर कोणत्याही परिस्थितीत सार्वजनिक बांधकाम खात्याने जरी भाववाढ घोषित केली तरी व कुठल्याही इतर कारणामुळे एस्कलेशन रक्कम मिळणार नाही.
३) पोलीस गृहनिर्माण संस्थेला विभाग 'अ' मधील मोठ्या आकारमानाचे गाळे रु. ६८९/- प्र. चौ. फू. दराने व लहान आकारमानाचे गाळे रु. ५५८/- या दराने देण्याचे मागणीपत्र देण्यात यावे.
४) निविदेचा वैधता कालावधी दि. ३१.७.१९९२ पर्यंत वाढवून देण्याबाबत विनंती करण्यात यावी.
५) विभाग 'ब' (भाग ३ व ४) मधील युएलसी - परिक्षण अर्ज शासनाकडून नियुक्त करून घ्यावेत आणि दोन्ही विभागातील (अ व ब) संस्थांना गाळे बांधण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

**Item No.** 9 **Resolution No.** 3004

विषय : राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प, नागरी नूतनीकरण योजना -

इमारत क्र. ३६५ अबकडई, ना. म. जोशी मार्ग, हेंद्रे बिल्डींग, जी/एस. विभाग येथील इमारत क्र. अ, ब, क या इमारतींची पुनर्बांधणी जोत्यावरील कामाच्या निविदांना कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत हेंद्रे बिल्डींगच्या न्यूनतम किंमतीच्या निविदा स्वीकारण्याच्या केलेल्या कार्यवाहीस खालीलप्रमाणे कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

१) इमारत क्र. 'अ' निविदा रक्कम रु. २८,६७,९१३.९० (निविदा रकमेच्या १० टक्के प्रतिशत कमी या दराने)

२) इमारत क्र. 'ब' निविदा रक्कम रु. ६४,३७,५१२.०० (निविदा रकमेच्या ९.५४ टक्के प्रतिशत कमी या दराने)

३) इमारत क्र. 'क' निविदा रक्कम रु. ३३,०४,०२०.३० (निविदा रकमेच्या ९.९८ टक्के प्रतिशत कमी या दराने)

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयातील वर्ग व १ व २ या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याबाबत देण्यात आलेल्या अधिकाराबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा दिनांक ३१.५.१९९२ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 12 **Resolution No.** 3005

विषय : प्राधिकरणाच्या अखत्यारीतील पुणे, औरंगाबाद, नागपूर मंडळाच्या आस्थापनेवरील सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार वर्ग-१ या पदास श्रेणीवाढ करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्रेणीवाढ करणाऱ्या वर्ग (१) या संवर्गातील वास्तुशास्त्रज्ञ आणि नियोजनकार या ३ पदांपैकी २ पदोन्नतीने आणि १ पद सरळसेवा भरतीने भरण्यात यावे. पदोन्नतीने भरण्यात येणाऱ्या पात्र अधिकाऱ्यांनी पदोन्नतीनंतर ३ वर्षांच्या आत पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करावा या अटींवर मान्यता देण्यात येत आहे. सदर अटींवर देण्यात आलेली पदोन्नती तात्पुरत्या स्वरूपाची समजण्यात यावी व विहित मुदतीत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास अशा कर्मचाऱ्यांस मूळ पदावर पदावनती देण्यात यावी.

**Item No.** 13 **Resolution No.**

विषय : पंतनगर, घाटकोपर येथे मंडळाने नियोजनानुसार जमिनीखालील पाण्याच्या टाक्या न बांधल्यामुळे नागरिकांना कमी पाणी उपलब्ध होते. त्याचप्रमाणे गटारे व रस्ते यांच्या दुरुस्त्या व देखभाली अभावी नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होतो असा उल्लेख प्राधिकरण सदस्य श्री. विरेंद्र बक्षी यांनी प्राधिकरणाच्या सभेत केल्यावरून वस्तुस्थिती दर्शविणारा खुलासा.

ठराव :

**Item No.** 14 **Resolution No.**

विषय : म्हाडाच्या निविदांमधील भाववाढीच्या बदल्यासंबंधी शासनाचे आदेश लागू करण्यासंबंधी (एस्कलेशन)

१) १९९० मध्ये आखाती देशांतील युद्धामुळे अचानक भाववाढ झाली, त्या अनुषंगाने त्यावेळी चालू असलेल्या कामास खास सवलत देण्याबाबत.

२) शासनाच्या भाववाढीसंबंधीचे नवीन सत्र म्हाडाच्या कामात अंतर्भूत करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 15 **Resolution No.** 3006

विषय : राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प, नागरी नूतनीकरण योजना

इमारत क्र. २७५, रंगारी चाळ अ, ब, ना. म. जोशी मार्ग या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या जोत्यावरील कामाच्या निविदा मंजूरीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नागरी नूतनीकरण योजनेअंतर्गत रंगारी बिल्डींगची पुनर्बांधणी कामाची मेसर्स स्वस्तिक कन्स्ट्रक्शन यांची रु. १,१६,६५,५३९.२७ (अंदाजित रकमेच्या म्हणजे रु. १,१७,८३,३७३/- च्या १ टक्का कमी) किंमतीची निविदा मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No. 16 Resolution No. 3007**

विषय : निझामपूर, भिवंडी येथील गृहनिर्माण योजना

अल्प उत्पन्न गट ३१७ गाळे, मध्यम उत्पन्न गट ४७ गाळे, वितरण करताना बांधलेल्या गाळ्यांची किंमत एकरकमी पद्धतीने वाटपासाठी मर्यादित ठेवण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या नियमित नियमानुसार कोंकण मंडळाने गाळ्यांची किंमत ठरवून गाळे वितरणाची फक्त एक जाहिरात प्रसिद्ध केली होती, असे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने असे ठरविण्यात येते की, कोंकण मंडळामार्फत सर्व अर्जदारांना लेखी कळविण्यात आले आहे की, त्यांच्याकडून मागणी करण्यात आलेल्या किंमतीनुसार त्वरित रक्कम भरणा करण्यात यावी. रक्कम न भरल्यास नियत वाटप रद्द करण्यात यावे. त्यानंतर रिकामे राहिलेल्या गाळ्यांचे वितरण करण्यासाठी नवीन जाहिरात देण्यात यावी. त्यानंतरही गाळ्यांचे वितरण होऊ शकले नाही तर अल्प उत्पन्न गट योजनेतील गाळ्यांच्या किंमती रु. ४०,०००/- ते रु. ५०,०००/- या दरम्यान व मध्यम उत्पन्न गट योजनेतील गाळ्यांच्या किंमती रु. ७५,०००/- ते रु. ८५,०००/- या दरम्यान कोणत्याही सिमित रकमेपर्यंत उपाध्यक्ष/प्रा. यांना कमी करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. कोणत्याही परिस्थितीत प्रमाणित पातळीवर किंमती गोठविण्यात याव्यात.

**Item No.** 17 **Resolution No.** 3008

विषय : प्राधिकरण कर्मचारी कल्याणकारी योजनेअंतर्गत भूखंड संपादन करून स्थापन केलेल्या कर्मचाऱ्यांना सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील समासदांच्या पात्रतेबाबत.

ठराव : प्राधिकरणाने बहुमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरण कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्थेतील समासदांची पात्रता खालील अटींवर मान्य करण्यात यावी.

१) समासदांची पात्रता ठरवितेवेळी प्राधिकरणामध्ये त्यांची किमान १५ वर्षे पूर्ण झालेली असावी. तसेच गाळ्याचा ताबा मिळाल्यानंतर त्यांनी किमान १० वर्षे प्राधिकरणाच्या सेवेत असणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांना संस्थेमार्फत मिळालेला गाळा प्राधिकरणाच्या स्वाधीन करावा लागेल. तथापि ही अट १० वर्षांच्या आत सेवानिवृत्त होत असलेल्या किंवा प्रशासकीय कारणावरून अधिकारी/कर्मचारी यांची सेवा समाप्त होत असल्यास लागू होणार नाही.

२) मागासवर्गीयांसाठी २० टक्के आरक्षण ही कायदेशीर तरतूद असल्यामुळे त्यांची पूर्तता करण्यात यावी.

३) स्वतः समासद किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या (त्यांचे पती/पत्नी किंवा अज्ञान मुले) नावे कोणत्याही प्रकारच्या मालकी हक्काचा किंवा भाडे तत्वावरील गाळा महानगरपालिकेच्या हद्दीत नसावा.

४) स्वतः समासद, त्यांची पत्नी, पती व अज्ञान मुले यांच्यापैकी कोणाच्याही नावावर महाराष्ट्रामध्ये कोठेही म्हाडाने कर्मचारी म्हणून दिलेल्या गाळ्यांचे हस्तांतरण किंवा विक्री त्याच्याकडून केली गेली असल्यास त्यासही अपात्र समजावे.

५) समासदांच्या किंवा त्यांच्या कुटुंबियांच्या नावे असलेले म्हाडाचे गाळे संस्थेतर्फे बांधण्यात येणाऱ्या गाळ्यांचा ताबा मिळाला की, सोडून देण्यात येतील अशा हमीपत्रावर गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून पात्र ठरविण्याची सवलत अपवादात्मक परिस्थितीत फक्त बांधकाम झालेल्या संस्थांपुरतीच मर्यादित ठेवावी. परंतु ही अट पाळण्यात येत नाही. हा आतापर्यंतचा अनुभव विचारात घेऊन ज्या सहकारी संस्थांनी अद्याप बांधकाम केलेले नाही त्या संस्थांतील केवळ सेवानिवासस्थानांमध्ये रहात असलेले समासद वगळता इतर कोणत्याही समासदाची पात्रता गाळे सोडण्याबाबतच्या हमीपत्रावर निश्चित करू नये.

६) दिलेली माहिती खोटी असल्याचे केव्हाही नजरेस आल्यास सहकारी संस्थेचा गाळा प्राधिकरणास खाली करून देईन व त्याबद्दल शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरेन, असे प्रतिज्ञापत्र समासदाकडून लिहून घ्यावे.

७) संस्थेमध्ये समासद होण्यासाठी प्रारंभी सादर केलेल्या उत्पन्नाच्या दाखल्यावरून समासदांच्या उत्पन्नाची मर्यादा विचारात घ्यावी.

८) प्राधिकरण/मंडळ यांचे पदाधिकारी/सदस्य व प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांना या संस्थेमध्ये १० टक्के समासदत्व द्यावे, अशी जी पूर्वी अट होती त्याऐवजी प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांना १ टक्का समासदत्व देण्यात हरकत नसावी मात्र ही अट पूर्वी बांधकाम झालेल्या किंवा बांधकाम पूर्णावस्थेत आलेल्या पाच गृहनिर्माण सहकारी संस्थांना लागू करण्यात येऊ नये.

प्राधिकरणामार्फत एखाद्या नवीन गृहनिर्माण संस्थेस भूखंड देण्यात आला तर अशा संस्थेत प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांचे नाव संस्थेत सामील करून घेणे हे प्राधिकरणाच्या अखत्यारीत राहील.

९) शासनाच्या आदेशाप्रमाणे समासदांची रिक्त पदे शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांच्या अधिकारी/कर्मचारी यांच्यामधून न भरता ती पदे केवळ प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्यामधून जाहीररित्या अर्ज मागवून व अर्ज जास्त झाल्यास सोडत काढून यशस्वी व्यक्तींमधून भरण्यात यावी व त्याबाबत शासनास कळविण्यात यावे.

१०) ज्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाने दिलेल्या स्थगितीच्या काळातही बांधकाम केले त्यांच्याविरुद्ध प्रादेशिक मंडळाच्या स्तरावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल सत्वर प्राधिकरणाकडे पाठवून द्यावा.

११) सहकारी संस्थांच्या ज्या समासदांना प्राधिकरणाने मालकी हक्काने/भाडेतत्वावर/सेवानिवासस्थान म्हणून गाळे दिलेले होते व हे गाळे सोडण्याचे त्यांनी हमीपत्र दिले होते. परंतु त्या संस्थांच्या इमारती तयार होऊन त्या इमारतींमध्ये हे कर्मचारी रहावयास गेले असूनही त्यांनी त्यांच्याजवळ असलेले प्राधिकरणाचे गाळे सोडण्यास नकार दिला, अशा कर्मचारी समासदांना अपात्र ठरवावे व प्रादेशिक मंडळाच्या स्तरावर त्यांच्यावर निष्कासन कारवाई करून संस्थेने दिलेला गाळा त्यांच्याकडून काढून घ्यावा. तसेच त्यांनी प्रतिज्ञापत्राचा भंग केला म्हणून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई चालू करावी.

१२) सर्व बाबींची पूर्तता होऊन संस्था पंजीकृत झाल्याशिवाय कुठल्याही संस्थेस बांधकामाची अगर कसलीही परवानगी देऊ नये.

१३) समासदांनी पात्रता ठरविण्याचे काम प्राधिकरणाच्या कार्यालयाकडून करण्यात यावे.

१४) शासनाच्या दि. ३.७.९१ च्या आदेशाच्या संदर्भात प्राधिकरणाच्या या ठरावातील अटींनुसार अपात्र ठरणाऱ्या समासदांची पदे (जागा) प्राधिकरणाच्या पात्र अधिकारी/कर्मचारी यांच्यामधून अर्ज मागवून सोडत काढून भरण्यास शासनाची मान्यता मिळण्यासाठी शासनाला विनंती करावी.

---

**Item No.** **18** **Resolution No.** **3009**

विषय : श्री. रझा जाफर (नौशाद जौनपुरी) यांना भारत नगर, वांद्रे येथे ८ फूट बाय ८ फूट आकारमानाचा भूखंड जनरल स्टोअर्सकरिता देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जमीन वाटप विनियम १९८२ च्या विनियम १६ मध्ये सुधारणा करण्याबाबतचा निर्णय प्राधिकरणाने पूर्वीच घेतला असल्यामुळे केवळ शासनाच्या आदेशानुसार श्री. रझा जाफर (नौशाद जौनपुरी) यांना भारत नगर, वांद्रे येथील रहिवासी झोनमधील ८ फूट बाय ८ फूट या भूखंडाचे जनरल स्टोअर्सकरिता वाटप करता येणार नाही. परंतु हा भूखंड रहिवाशांसाठी एकदम छोटा आहे. त्यामुळे त्याच्या वाटपाबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे विचारात घेऊन अपवादात्मक परिस्थितीत जमिनीच्या निवासी बाजारभावाच्या दुप्पट एवढे अधिमूल्य व त्या अधिमूल्याच्या १ टक्का वार्षिक भाडेपट्टी आकारून नेहमीच्या अटी व शर्तींवर त्याच वाटप करण्याचे मान्य करावे. मात्र भविष्यात उदाहरण म्हणून याचा अंगुली निर्देश करता येणार नाही.

---

**Item No.** 19 **Resolution No.** 3010

विषय : कोकण गृहनिर्माण मंडळाच्या अंबरनाथ येथील शामराव पाटील नगर या वसाहतीत इलेक्ट्रिक सबस्टेशनसाठी बांधण्यात आलेली एक बैठी इमारत (अदमासे २९९.०० चौ. फूट जोत्याच्या क्षेत्रफळाची परंतु महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने ती न घेतल्यामुळे) या वसाहतीतील भाडेकरूंच्या सहकारी ग्राहक भांडारास वितरण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कोकण मंडळाच्या वतीने पुन्हा पुन्हा जाहिरात देऊन जाहिरातीचा खर्च वाढत आहे. त्यामुळे बाब टिप्पणीतील नमूद केलेल्या क. २ च्या [illegible]
बी. टेनन्टस् ग्राहक संस्था, अंबरनाथ यांना म्हाडा कायदा १९७६, अधिनियम २८, उपकलम (३) (III) अन्वये कार्यवाही करण्यात यावी. तथापि, विक्रीची रक्कम ही अपसेट प्राईझपेक्षा जास्त आहे किंवा नाही, याची खात्री कोकण मंडळाने करावी.

---

**Item No.** 20 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणात नियुक्ती/बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची माहिती.

ठराव :

---

**Item No.** 21 **Resolution No.** 3011

विषय : व्ही. एम. व्ही. रोड, अमरावती येथील उच्च उत्पन्न गट योजनेतील १०९ गाळ्यांच्या वसाहतीत बांधलेल्या ७ दुकानांच्या वाटपाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
व्ही. एम. व्ही. रोड, अमरावती येथील उच्च उत्पन्न गट योजनेखालील १०९ गाळ्यांच्या वसाहतीत बांधलेल्या ७ दुकानांचे वाटप शासनाच्या आदेशानुसार खालील निर्देशित केलेल्या अटी शिथिल करून करण्यात यावे.
१) नफा न घेता येणाऱ्या किंमतीत दुकानांचे वाटप करणे.
२) दुकानांकरिता ३१ मार्च १९९१ रोजी ठरेल ती किंमत कायम करून व्याज आकारू नये.
३) भाडे खरेदी कालावधी ५ वर्षाऐवजी ८ वर्षांचा करण्यात येऊन लाभार्थीकडून व्याजासह हप्ते वसूल करण्यात यावेत.

---

**Item No.** 22 **Resolution No.** 3012

विषय : इमारत क्र. ११९-१२३ उंद्रिया स्ट्रीटच्या दुरुस्तीविषयी विशेष निधी उपलब्ध करून देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाच्या आदेशाप्रमाणे ११९-१२३ उंद्रिया स्ट्रीट, ई-विभाग, मुंबई हिच्या दुरुस्तीकरिता प्राधिकरणाच्या निधीमधून रु. ४.११ लक्ष खर्च करण्याच्या अपवादात्मक परिस्थितीत मान्यता देण्यात येते. याबाबतीत भविष्यात पूर्वोदाहरण म्हणून अंगुली निर्देश करता येणार नाही. तथापि हा खर्च जिल्हा नियोजन विकास मंडळाकडून मिळणे शक्य आहे काय, याची खात्री करावी.

**Item No.** 23 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पांतर्गत गाळे बांधणीबाबत प्राधिकरणाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांची संक्षिप्त माहिती.

ठराव :

---

**Item No.** 24 **Resolution No.** 3013

विषय : *आदर्श नगर, वरळी येथे स्वातंत्र्य सैनिकांसाठी बांधण्यात आलेल्या स्वातंत्र्य सैनिक भवनाबाबत.*

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

आदर्श नगर, वरळी येथे स्वातंत्र्य सैनिक भवन म्हणून बांधण्यात आलेल्या इमारतीचा वापर करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) स्वातंत्र्य सैनिकांसाठी निवासस्थान म्हणून बांधण्यात आलेल्या खोल्या वगळून शिल्लक भागाचा वापर प्राधिकरणाच्या कार्यालयासाठी करण्यात यावा.

२) केवळ ज्या स्वातंत्र्य सैनिकांना मध्यवर्ती सरकारी निवृत्तीवेतन देण्यात येते अशांनाच त्यांनी कार्यालयीन वेळेत इमारतीच्या संबंधित प्राधिकारी व्यक्तीकडे स्वातंत्र्यसैनिक असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास या खोल्या वापरण्याकरिता देण्यात याव्यात.

३) प्राधिकारी व्यक्तींनी परवानगी दिल्याशिवाय खोलीचा भोगवटा देण्याबाबतची कार्यवाही करू नये.

४) स्वतः स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे सोबत असलेल्या एका व्यक्तीशिवाय या सोयी-सवलतींचा उपभोग स्वातंत्र सैनिकांवर अवलंबून असलेल्या इतर व्यक्तींना घेण्यास देण्यात येऊ नये.

५) कोणत्याही स्वातंत्र्य सैनिकास एका वेळी एकापेक्षा जास्त खोल्यांचा वापर (जरी खोल्या रिकाम्या असल्या तरी) देण्यात येऊ नये.

६) जास्तीत जास्त १५ दिवस व कमीत कमी १ दिवस या खोल्या वापरण्यात देण्यात याव्या.

७) त्यासाठी प्रतिदिनी रु. ५०/- याप्रमाणे खोली भाडे व एकूण भाड्याच्या २५ टक्के एवढी अनामत रक्कम आगाऊ स्वीकारण्यात यावी. मात्र प्राधिकरणाच्या कर्मचारी/अधिकाऱ्यांसाठी प्राधिकरणाच्या प्रचलित नियमाप्रमाणे भाडे आकारावे. खोली परत ताब्यात घेतेवेळी खोलीचा वापर योग्य प्रकारे केला आहे हे तपासून अनामत रक्कम परत करावी.

---

**Item No.** 25 **Resolution No.**

विषय : मध्यम उत्पन्न गट यांचेसाठी बांधलेल्या इमारतीत सेवानिवासस्थाने म्हणून दिलेल्या विखुरलेल्या गाळ्यांची विक्री कर्मचाऱ्यांना करण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 26 **Resolution No.** 3014

विषय : ग्रामीण गृहनिर्माणसंबंधी फरीदाबाद, नवी दिल्ली, येथील आय. आर. यु. डी. (इन्स्टिट्यूट फॉर रुरल अ‍ॅन्ड अर्बन डेव्हलपमेंट) नवी दिल्लीतर्फे भरविण्यात येणाऱ्या प्रदर्शनामध्ये सहभाग घेण्याविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ग्रामीण गृहनिर्माणासंबंधी फरीदाबाद, नवी दिल्ली येथील इन्स्टिट्यूट फॉर रुरल अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट, नवी दिल्लीतर्फे भरविण्यात येणाऱ्या प्रदर्शनामध्ये ३०० चौ. वार क्षेत्रफळाचा भूखंड प्राधिकरणाने संस्थेज्या नियमानुसार घेण्यास व त्यासाठी रु. ५०,०००/- अधिमूल्य देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रदर्शनात भाग घेण्यासाठी लागणारे इतर संबंधित बाबींवरील खर्च करण्याबाबतचे सर्व अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 27 **Resolution No.** 3015

विषय : श्री. अजय दुआ, उपाध्यक्ष/प्रा. यांना मुंबईमधील दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रम या विषयावरील प्रबंध लिहिण्यासाठी आधार सामुग्रीचा पुरवठा करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. अजय दुआ, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी 'मुंबई मधील गृहनिर्माण नवीनीकरण' या विषयावरील संशोधन अभ्यास हाती घेतला असून ती प्रबंध म्हणून पी.एच.डी.साठी मुंबई विद्यापीठास सादर करावयाचा आहे. हा विषय प्राधिकरणाच्या कार्यक्रमाशी संबंधित असल्याने तो प्राधिकरणातर्फे सादर करण्यासाठी त्यांना सहाय्य करण्यात यावे. त्यासाठी लागणारी माहिती, आधार सामग्री, स्टेशनरी, संशोधन, संगणक सुविधान, वेष्टन (बाईंडिंग) वगैरे बाबींचा मोफत त्यांना मान्यता देण्यात येते.
यानंतर उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**Meeting No.** 115 **Meeting Date** 15-Jul-19

**Item No.** 1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १९-६-१९९२ रोजी झालेल्या ११४ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 2 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १४-५-९२ रोजी झालेल्या ११३व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 3 **Resolution No.** 3016

विषय : दैनिक भत्त्याच्या दरात सुधारणा

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक १.४.१९९२ च्या १०९३/सीआर-५९/सेवा-५ या क्रमांकाच्या शासन निर्णयामधील दैनिक भत्याचे सुधारित दर प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक १.४.१९९२ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच तत्वत: असा निर्णय घेण्यात आला की या विषयावर प्राधिकरणाने निर्णय घ्यावा व त्यानंतर उपाध्यक्ष/प्रा. यांना पुढील निर्णय वेळोवेळी घेण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात यावेत.

**Item No.** 4 **Resolution No.**

विषय : श्री. एस. एफ. ए. खतीब, अप्पर जिल्हाधिकारी यांच्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीबाबत.

ठराव :

**Item No.** 5 **Resolution No.**

विषय : पुणे गृहनिर्माण मंडळाने आगरकर नगर येथील प्रशासकीय इमारत बांधताना चटईक्षेत्र निर्देशांकापेक्षा जास्त बांधकाम विनापरवानगी केल्याबाबतचा चौकशीचा तपशील प्राधिकरणाच्या माहितीकरिता.

ठराव :

**Item No.** 6 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा दि. १५ जून, १९९२ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 7 **Resolution No.** 3017

विषय : गोराई रोड २, बोरिवली (प.), मुंबई ९२ येथील उपलब्ध असलेल्या जमिनीवर ५३४ भूखंड विकसित करावयाच्या (पाणीपुरवठा, रस्ते व गटारे, वीजपुरवठा तसेच गाभाघराचे जोत्यापर्यंत बांधकाम करणे) उरलेल्या कामाच्या निविदा स्वीकारण्याबाबत, विभाग - २.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गोराई रोड २, बोरिवली (प.) येथील उपलब्ध असलेल्या जमिनीवर भूखंड विकसित करावयाच्या उरलेल्या कामांसाठी मेसर्स रश्मीन कन्स्ट्रक्शन कंपनीची अंदाजपत्रकाच्या किंमतीवर (रु.,७२,४४,२१७) १.४९ टक्के अधिक असलेली (रु. ७३,५२,१५५.८३) प्रथम निम्नतम स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या सेवा वर्ग-१ व वर्ग-२ मधील अधिकाऱ्यांची पदे पदोन्नतीने भरण्याबाबत शासनाकडून प्राप्त झालेले निर्णय.

ठराव :

**Item No.** 9 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या बृहन्मुंबईतील झोपडपट्टी सुधारणेचा सर्व कार्यक्रम राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प यांचेकडे सुपूर्द करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या वसाहतीमधील अनिवासी भूखंडाच्या वाटपाबाबत घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वात बदल करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 11 **Resolution No.** 3018

विषय : श्रीमती आकांक्षा देशपांडे यांना लायब्ररीकरिता १० फूट बाय १५ फूट आकारमानाचा भूखंड विशेष बाब म्हणून वाटप करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ज्याअर्थी अर्जदारास देकार पत्र देऊनही अर्जदाराने भूखंडाचे अधिमूल्य भरले नाही. तसेच सदरहू भूखंड हा व्यापारी स्वरुपाचा असल्याकारणाने त्याचे वाटप विहित कार्यपद्धतीचे अवलंबन करून करणे आवश्यक आहे. त्यामुळे श्रीमती आकांक्षा देशपांडे यांना भूखंडाचे वाटप करण्यासाठी करण्यात आलेला प्राधिकरणाचा १९४१ क्रमांकाचा ठराव रद्दबादल समजून पुणे मंडळाने अर्जदार महिलेस दिलेला देकार रद्द करावा व सदर भूखंडाचे वाटप निविदा मागवून करण्यात यावे.

**Item No.** 12 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना नैमित्तिक रजेचे रोखीकरण करण्यास परवानगी देणेबाबत.

ठराव :

**Item No.** 13 **Resolution No.**

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्पाचा दि. ३० जून, १९९२ पर्यंतचा प्रगती अहवाल.

ठराव :

**Item No.** 14 **Resolution No.** 3019

विषय : इमारत क्र. १६-जी ते के नौशिर भरुचा मार्ग, 'डी' विभाग या इमारतीची पुनर्बांधणी इमारत क्र. ८ व ९ या दोन इमारतींसाठी वेगवेगळ्या निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१६-जी ते के, नौशिर भरुचा मार्ग, 'डी' विभाग, ताडदेव इमारतींची पुनर्बांधणी इमारत क्र. ८ व ९ या इमारतींसाठी खालीलप्रमाणे वेगवेगळ्या निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| भाग/विभाग | गाळे | निविदेत दर्शविली जाणारी कामाची अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| भाग - १ | ११९ गाळे इमारत क्र. ८ | रु. ५९,८७,०७१/- |
| भाग - २ | १०७ गाळे इमारत क्र. ९ | रु. ५३,८३,३३२/- |

**Item No.** 15 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र राज्यात 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा/नगरपालिका/ग्रामपंचायती असलेल्या छोट्या शहरात म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना हाती घेण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 16 **Resolution No.**

विषय : राजीव गांधी प्रकल्पांतर्गत आकाशगंगा सहकारी संस्था, धारावी या इमारतीच्या निविदेमध्ये एस्कलेशन अंतर्भूत करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 17 **Resolution No.** 3020

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत सर्व्हे क्र. १५७, कांदिवली (प) येथील स्थावर व जंगम मालमत्तेच्या सुरक्षा व्यवस्थेच्या एक वर्षाच्या पुढील खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्व्हे क्रमांक १५७-कांदिवली (प) येथील गलिच्छ वस्ती पुनर्वसन योजनेखाली बांधलेल्यापैकी अतिरिक्त गाळे, जोत्याचे बांधकाम तसेच विकसित भूखंड व योजनेकरिता दिलेल्या मल:निस्सारण, पाणीपुरवठा व्यवस्था, रस्ते, गटारें इत्यादी सुविधांचा तसेच क्षेत्ररक्षणाकरिता लागणाऱ्या सुरक्षा व्यवस्थेच्या दिनांक ५/१/१९९२ ते ४/१/१९९३ पर्यंतच्या होणाऱ्या रु. ९६,०००/- (रुपये शहाण्णव हजार) खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 18 **Resolution No.**

विषय : बांद्रा (प), पुन:प्रापण येथील संक्रमण शिबिराजवळील भूखंड न्यू बॉम्बे एज्युकेशन सोसायटीस वितरित करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 19 **Resolution No.** 3021

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गृहनिर्माण व नगरविकास महामंडळ (हुडको) यांनी विहित केलेल्या अटींवर बाब टिप्पणीत जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या लातूर जिल्ह्यातील बेघर भूमिहीनांकरिता अर्थसहाय्यित ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी एकूण ६२.७६ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 20 **Resolution No.** 3022

विषय : ओशिवरा, गोरेगाव येथील महाप्रकल्पाच्या कामावरील विकासकांना देण्यात आलेल्या मोबिलायझेशन अग्रिमाची वसूली न झालेल्या तफावतीच्या रकमेवर व्याज दर आकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
३० एप्रिल, १९९२ रोजी वसूल न झालेल्या मोबिलायझेशन अग्रिमाच्या तफावतीच्या रकमेवर अशी तफावत झालेल्या महिन्यापासून १५ टक्के व्याजाचा दर आकारून त्या अग्रिमाची वसूली व्याजासह दिनांक ३१ जुलै, १९९२ पूर्वी व्हावी.

**Item No.** 21 **Resolution No.** 3023

विषय : पुसद येथे पूरग्रस्तांसाठी बांधलेल्या घरांबाबत
जून १८ ते २० रोजी अतिवृष्टी झाल्याने घरांच्या छप्परातून गळती झाल्याच्या तक्रारीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुसद येथील सर्व घरे सहकारी अनुदानातून उभारलेली आहेत व त्या कामावर आता शासनाकडून काही सहाय्य मिळण्याची अपेक्षा नाही व दुरुस्तीच्या कामाची निवड लक्षात घेता दुरुस्ती प्रस्तावित खर्च रु. १.५० लाख यास म्हाडाच्या निधीतून (निधीशीर्ष - १६०) खास बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 22 **Resolution No.** 3024

विषय : रंगारी चाळ, कुर्ला, चुनामट्टी येथील महसूल व वन विभागाच्या मालकीच्या जमिनीवरील इमारतीतील २० भाडेकरूंना तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबिरात जागा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
रंगारी चाळ, कुर्ला, चुनामट्टी येथील महसूल व वन विभागाच्या मालकीच्या जमिनीवरील इमारतीतील २० भाडेकरूंना तात्पुरत्या स्वरुपात प्राधिकरणाच्या संक्रमण शिबिरात बाब टिप्पणीत नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून गाळे देण्यास तत्वत: मान्यता देण्यात येते. तथापि सदर चाळीतील रहिवाशांनी चाळीची पुनर्रचना मुंबई महानगरपालिकेकडून त्वरित हाती घेण्यात येईल व हे काम सुरू केल्याचे प्रमाणपत्र प्राधिकरणास सादर करावे. मुंबई महानगरपालिकेकडून सदर चाळीची पुनर्बांधणी करण्यात येईल, अशी परवानगी उपरोक्त चाळीतील भाडेकरूंनी घेणे आवश्यक राहील. बांधकामाची पूर्ण तयारी झाल्यावरच संक्रमण शिबिरातील गाळ्यांचा ताबा द्यावा व सदरहू ताबा २४ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी देण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे बिगर उपकर इमारतीमधील भाडेकरूंना संक्रमण शिबिरातील गाळ्यांचे वितरण करण्यापूर्वी न चुकता प्राधिकरणाची पूर्व-परवानगी घेण्यात यावी.

**Item No.** 23 **Resolution No.** 3025

विषय : पवई येथील प्राधिकरणाची जमीन आय.आय.टी., मुंबई कर्मचारी सहकारी संस्थेस देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई मंडळाच्या दिनांक १.७.१९९२ च्या पत्रानुसार व शासनाच्या दिनांक १४.७.१९९२ च्या पत्राच्चये दिलेल्या मान्यतेप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी व सदरहू सहकारी संस्थेला यथायोग्य देकार निर्गमित करण्यात यावे, असे ठरविण्यात आले.

**Item No.** 24 **Resolution No.** 3026

विषय : मुंबई मंडळाच्या मोकळ्या जागा/भूखंड यांचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यासाठी सन १९९२-९३ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

अ) बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई मंडळाच्या विविध ठिकाणी असलेल्या मोकळ्या जागा/भूखंड इत्यादींचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने तेथे प्राधिकरणाच्या निधीमधून संरक्षण भिंती बांधण्याच्या एकूण रु. २५०.०० लक्ष खर्चाच्या पुरवणी अंदाजपत्रकास (सन १९९१-९२) मान्यता देण्यात येत आहे.

ब) अनवधानाने अंदाजपत्रकात घालावयाची राहिलेली काही कामे तसेच अचानक घालावी लागणारी नवीन कामे यांचेसाठी जर अंदाजपत्रकात तरतूद नसेल व अचानक नवीन खर्च करणे आवश्यक असेल तर अशा खर्चाची आवश्यक ती तरतूद करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत. अशी प्रकरणे प्राधिकरणाच्या त्यानंतर होणाऱ्या बैठकीत अवलोकनार्थ ठेवावीत.

विषय सूचीवरील विषय संपल्यानंतर पुणे मंडळाचे सभापती श्री. विठ्ठलराव लडकत यांनी खाजगी जमिनीवरील प्रस्तावित संयुक्त क्षेत्रातील 'प्राधिकरणाच्या गृहनिर्माण प्रकल्पात सहभाग' या विषयावर माहिती दिली. या विषयाबाबत मुख्य अभियंता/प्रा. यांनी विविध सल्लागार यांची सहमती घेऊन आपले अभिप्राय द्यावेत व पुढील बैठकीत सविस्तर विषय सादर करावा असे सुचविण्यात आले.

श्री. मांजरेकर, सदस्य/प्राधिकरण यांनी प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांना मिळणारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती रु. ५००/- वरून रु. १,२००/- करण्यात यावी असे सुचविले. या संदर्भात वित्त नियंत्रक/प्रा. यांनी सविस्तर टिप्पण सादर करावे. तत्पूर्वी मागील वर्षभरात वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती आणि वैद्यकीय नियमावली प्रमाो प्रत्यक्ष झालेला खर्च आणि प्रस्तावित केलेले दरवर्षी रु. १,२००/- दिल्यानंतर होणारा खर्च त्याचा तुलनात्मक अभ्यास करून सविस्तर टिप्पण आगामी बैठकीत सादर करावे असे सुचविण्यात आले.

संघटनेच्या मागणीवर विचार करावयाचा झाल्यास सध्या अस्तित्वात असलेली वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची योजना पूर्णपणे बंद करावी लागेल. यास श्री. मांजरेकर, सदस्य/प्रा. यांनी सहमती दर्शविली.

यानंतर उपस्थितांनी मा. गृहनिर्माण मंत्री व अध्यक्ष/प्राधिकरण यांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.